जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार २७ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

३० नोव्हेंबरला लोकसभा तर २ डिसेंबरला राज्यसभेचे अधिवेशन

परिसीमन-महिला आरक्षण विधेयक येऊ शकते

सरकारकडे लोकसभेचे ४१ व राज्यसभेचे ११ खासदार कमी





नवी दिल्ली/वृत्तसंस्था- संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज पुन्हा सुरू करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. लोकसभेचे कामकाज सोमवार ३० नोव्हेंबर रोजी, तर राज्यसभेचे कामकाज बुधवार २ डिसेंबर रोजी सुरू करण्याची विनंती सरकारने लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभा सभापती यांना केली आहे. आवश्यक सरकारी कामकाज पूर्ण करण्यासाठी ही बैठक बोलावण्यात येत असून कामकाजाच्या गरजेनुसार दोन्ही सभागृहांचे अधिवेशन ३ डिसेंबर रोजी संपण्याची शक्यता आहे. या विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर डिलिमिटेशन अर्थात मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाचा मुद्दा चर्चेत आला आहे. मतदारसंघांची पुनर्रचना तसेच महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीशी संबंधित विधेयक पुन्हा सभागृहात आणण्याचा विचार केंद्र सरकार करत असल्याचं सांगितले जाते. दोन्ही सभागृहांचे कामकाज ३ डिसेंबरपर्यंत संपवले जाऊ शकते. केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी गुरुवारी वर पोस्ट करून ही माहिती दिली.दोन्ही सभागृहांच्या बैठकीत सरकार परिसीमन-महिला आरक्षण विधेयक मांडू शकते. हे विधेयक मंजूर करून घेण्यासाठी सरकारकडे लोकसभेत ४१ आणि राज्यसभेत ११ खासदार कमी आहेत.यापूर्वी एप्रिलमध्ये डिलिमिटेशन आणि संविधान दुरुस्ती विधेयक संसदेत मांडण्यात आले होते. मात्र संविधान दुरुस्ती विधेयकाला आवश्यक बहुमत मिळाले नव्हते. त्यामुळे या विधेयकांबाबत सरकारची पुढील भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. संसदेच्या या विशेष अधिवेशनात डिलिमिटेशन विधेयक मांडले जाणार का, याबाबत अधिकृत कार्यक्रम अद्याप जाहीर झालेला नाही. मात्र सरकारने आवश्यक सरकारी कामकाजाचा उल्लेख केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.डिलिमिटेशनच्या माध्यमातून लोकसभा मतदारसंघांची संख्या, राज्यांचे प्रतिनिधित्व आणि महिला आरक्षणाची अंमलबजावणी यासारखे महत्त्वाचे मुद्दे चर्चेत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे संसदेच्या या विशेष अधिवेशनाकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे या विधेयकासाठी आवश्यक दोन तृतीयांश बहुमताचा आकडा सरकारने जुळवल्याचं बोलले जाते. विरोधी इंडिया आघाडीतील काही घटक पक्ष या विधेयकावर सरकारला पाठिंबा देण्याची शक्यता वर्तवली जाते.

तिरुपतीमध्ये चेन्नईच्या दाम्पत्याने १२१ किलो सोने दान केले

■ किंमत २०८ कोटी ■ हे आतापर्यंतचे सर्वात मोठे दान

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- तिरुमला येथील तिरुपती मंदिरात चेन्नईच्या एका भक्ताने गुरुवारी १२१ किलो सोन्याचे दागिने दान केले. त्यांची किंमत सुमारे २०८ कोटी रुपये आहे. हे दान वर्धमान जैन आणि त्यांच्या पत्नी राधिका जैन यांनी दिले. हे दान मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्या उपस्थितीत करण्यात आले.या दानात ९ संचांमध्ये ठेवलेले ४५ दागिने आणि २३८.२ कॅरेटचे हिरे यांचा समावेश आहे. यामध्ये श्रीवरू (भगवान व्यंकटेश) यांचा मुकुट आणि पद्म पादालु म्हणजेच पायांचे दागिनेही समाविष्ट आहेत. TTD नुसार, तिरुमला येथील भगवान व्यंकटेश्वरांना कोणत्याही एका भक्ताने दिलेले हे आतापर्यंतचे सर्वात मोठे दान आहे.भगवान व्यंकटेशांसाठी बनवलेले हे दागिने ८ पेट्यांमध्ये भरून आणले गेले. दागिने



बनवण्यासाठी १५ महिने लागले.

९ संचांमध्ये ४५ दागिने डोक्यापासून पायापर्यंत भगवानांना सजवण्यासाठी आणले गेले आहेत. वर्धमान जैन (डाव्या बाजूला दागिन्यांच्या शेजारी) २०१९ पासून तिरुपतीला दान देत आहेत.दान केलेल्या रत्नांमध्ये आणि आभूषणांमध्ये १०६ किलो सोन्याचे दागिने भगवानासाठी होते, तर देवी श्री पद्मावती अम्मावरू यांना १५ किलो वजनाचे आभूषण/वस्त्र अर्पण करण्यात आले.जैन यांनी कंपनीतील आपला हिस्सा विकला, त्याच रकमेतून दागिने बनवले. चेन्नईतील 'वारा फ्यूचर एलएलपी'चे अध्यक्ष वर्धमान जैन यांनी १२१ किलो सोने दान केले. वर्धमान यांनी कंपनीतील आपला ६०% हिस्सा विकून ६,००० कोटी रुपये मिळवले होते. याच रकमेतून वर्धमान यांनी भगवान श्री व्यंकटेश्वरांना हे सोने दान केले.

यापूर्वीही ते अनेकदा दानाबाबत चर्चेत राहिले आहेत- २०२४: चेन्नईतील एका मंदिराच्या विस्तारासाठी १ कोटी रुपयांचे योगदान दिले. नोव्हेंबर २०२४: TTD च्या 'अन्न प्रसादम ट्रस्ट'ला १.०१ कोटी रुपये आणि 'प्रणदानम ट्रस्ट'ला १.०१ कोटी रुपये दान केले. २०२५: एक भक्ती चॅनेलला ५ कोटी रुपये ➪(पान २ वर)



मुंबई दहशतवादी हल्ल्याला १८ वर्षे पूर्ण!

मुख्यमंत्री फडणवीसांकडून शहिदांना श्रद्धांजली अर्पण

मुंबई/प्रतिनिधी- मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याला आज १८ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुंबई पोलिस आयुक्त कार्यालयात आयोजित औपचारिक परेडमध्ये सहभागी होऊन हल्ल्यात प्राण गमावलेल्या सुरक्षा रक्षकांना आणि निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी ट्वीट करत, '२६/११, क्रूरतेची काळरात्र! मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देताना, आपल्या प्राणांची आहुती देणा-या भारतमातेच्या वीरपुत्रांना व निष्पाप नागरिकांना भावपूर्ण आदरांजली' अशी पोस्ट शेअर केली आहे.

या हल्ल्यातील शहिदांना आदरांजली देण्यासाठी मुंबईत आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी ➪(पान २ वर)



पोलिसांच्या वाहनाची दुचाकीला भीषण धडक; ३ तरुणांचा जागीच मृत्यू

गोंदिया : गोंदिया जिल्ह्यातील गंगाझरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांच्या वाहनाने दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. दांडेगाव बसस्थानकाजवळ गोंदिया-तिरोडा राष्ट्रीय महामार्गावर हा भीषण अपघात घडला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिस वाहनाच्या धडकेत तीन तरुणांचा मृत्यू झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. संतप्त गावक-यांनी घटनास्थळी गर्दी करत रास्ता रोको आंदोलन केले. तसेच संबंधित पोलिस वाहन चालविणा-या कर्मचा-यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या भीषण अपघातात रितेश बावनकर (वय १७), शिवप्रसाद कांबळे (वय १७), दोघेही रा. खळबंदा, तालुका गोंदिया आणि कार्तिक बिसेन (वय २०), रा. सेजगाव, तालुका तिरोडा अशी मृतांची नावे आहेत. एकाच अपघातात तीन तरुणांचा अंत झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.



'रामायण'च्या टीमने घेतली अमित शहांची भेट

नवी दिल्ली : अभिनेता रणबीर कपूर आणि अभिनेत्री साई पल्लवी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'रामायण' चित्रपटाची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. चित्रपटाला देशासह परदेशातही प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. अशातच या चित्रपटाच्या टीमने दिल्लीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीचे फोटो सोशल मीडियावर शेअर झाल्यानंतर चाहत्यांमध्ये त्याची चर्चा रंगली आहे. रणबीर कपूर, साई पल्लवी, दिग्दर्शक नितेश तिवारी आणि निर्माते नमित मल्होत्रा या भेटीदरम्यान उपस्थित होते. मात्र या भेटीदरम्यान चित्रपटातील इतर काही महत्त्वाचे कलाकार अनुपस्थित होते. यात लक्ष्मणाची भूमिका साकारलेला अभिनेता रवी दुबे आणि भरतच्या भूमिकेतील मराठमोळा अभिनेता आदिनाथ कोठारेही तिथे उपस्थित नव्हता. 'रामायण'च्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून या भेटीचे फोटो शेअर करण्यात आले आहेत. या पोस्टमध्ये टीमने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्याचा सन्मान मिळाल्याची भावना व्यक्त केली. देशभरात आणि जगभरातील चित्रपटगृहांमध्ये 'रामायण'ला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळत असल्याचेही पोस्टमध्ये नमूद करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, अमित शहा यांनी चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. भारतीय संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाच्या महाकाव्याला इतक्या भव्य स्वरूपात मोठ्या पडद्यावर आणण्याच्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं.



पवार पुन्हा ब्रीच कँडीत दाखल

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. निर्जलीकरणामुळे तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आल्याचे सुप्रिया सुळे यांनी एक्स पोस्टच्या माध्यमातून सांगितले आहे. पूर्ण आराम करण्यासाठी सांगितले तरी ते आराम करत नाहीत. ते कुणाचे ऐकत नाहीत. त्यांचे त्यांच्या कामावर प्रेम आहे, असेही सुप्रिया सुळे यांनी पोस्टमध्ये लिहिले. सुप्रिया सुळे यांनी पोस्टमध्ये लिहिले, डिहायड्रेशनचा त्रास झाल्याने बाबांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी त्यांना प्रवास कमी करण्याचा तसेच विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. पण बाबा ऐकत नाहीत. त्यांना कामात रमून जायला आवडते. खोकला आणि छातीत दुखण्याचा त्रास जाणवू लागल्याने शरद पवार यांना २ नोव्हेंबर रोजी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले होते. राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागाचा दौरा सुरू केला होता. मात्र त्यापूर्वीच त्यांना अस्वस्थ वाटू लागले.



महसूल कार्यालयांचा नकाशा आता मोबाईलवर!

तलाठी ते जिल्हाधिकारी कार्यालयांचे लोकेशन एका क्लिकवर

पुणे/प्रतिनिधी- शासकीय कामासाठी महसूल कार्यालयात जायचे आहे; पण संबंधित कार्यालय नेमके कोठे आहे, त्याचे कार्यक्षेत्र कोणते आणि आपले काम कोणत्या कार्यालयात होणार, याची माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना आता कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत. राज्यातील तलाठी कार्यालयांपासून ते जिल्हाधिकारी कार्यालयांपर्यंत सर्व महसूल कार्यालयांचे अचूक ठिकाण आणि त्यांचे अधिकार क्षेत्र आता नागरिकांना थेट मोबाईलवर पाहता येणार आहे.भौगोलिक माहिती प्रणाली अर्थात जीआयएस नकाशाच्या माध्यमातून राज्यातील महसूल कार्यालयांची डिजिटल माहिती उपलब्ध करून देण्याचा पहिला पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीच्या (यशदा) वतीने हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर पहिल्या टप्प्यात पुणे जिल्ह्यात या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाणार आहे.त्यानंतर टप्प्याटप्प्याने संपूर्ण महाराष्ट्रात हा प्रकल्प विस्तारित करण्यात येणार आहे. राज्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, खातेदार, जमीनधारक तसेच विविध शासकीय दाखले मिळविण्यासाठी महसूल प्रशासनाशी संपर्क साधणा-या नागरिकांना या उपक्रमाचा मोठा फायदा होणार आहे. विशेषत: वाढती वाहतूक कोंडी, शहरांमध्ये वाढणारी स्थलांतरित लोकसंख्या आणि बदलती कार्यालयीन व्यवस्था, यामुळे अनेकांना शासकीय कार्यालये शोधताना अडचणींचा सामना करावा लागतो.ग्रामीण भागातून शहरात किंवा शहरातून एखाद्या गावात शासकीय कामासाठी जाणा-या नागरिकांचीही यामुळे गैरसोय होते. या पार्श्वभूमीवर राज्यातील तलाठी कार्यालये, मंडल अधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी (प्रांत) कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि महसूल प्रशासनाशी संबंधित अन्य महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांची माहिती एकाच डिजिटल नकाशावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

असा होणार पथदर्शी प्रकल्प- केवळ कार्यालयाचे ठिकाणच नव्हे, तर संबंधित कार्यालयाच्या अधिकार क्षेत्राची सीमाही नकाशावर दर्शविण्यात येणार आहे. एखाद्या गावचा किंवा परिसराचा महसुली कारभार कोणत्या कार्यालयाच्या अखत्यारीत येतो, हे नागरिकांना सहज समजू शकणार आहे. पुणे जिल्ह्यातील प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर राज्यातील सर्व जिल्ह्यांचा डिजिटल डेटा तयार केला जाईल. महसूल कार्यालयांचे अचूक लोकेशन आणि अधिकार क्षेत्राची माहिती नागरिकांना मोबाईलवर उपलब्ध होईल. महसूल प्रशासनाच्या कामकाजात सुलभता येण्याबरोबरच नागरिकांना शासकीय सेवा मिळविण्यासाठी होणारी धावपळही कमी होण्यास मदत होणार आहे.

कौटुंबिक वादातून बहिणीकडून भावाची चाकूने भोसकून हत्या

मुंबई/प्रतिनिधी- कौटुंबिक वादातून एका महिलेने आपल्या सख्ख्या भावाची चाकूने भोसकून हत्या केल्याची घटना वसईत घडली. बुधवारी मध्यरात्री वसईतील आनंदनगर परिसरात हा प्रकार घडला. याप्रकरणी माणिकपूर पोलिसांनी गुरुवारी गुन्हा दाखल करून आरोपी बहिणीला अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणपत मुकणे (३०) हा वसई पश्चिमेतील नौपाडा येथे राहत होता. त्याची घटस्फोटित बहीण सुनीता भोईर (३४) ही आपल्या मुलांसह त्याच्यासोबत राहत होती. मात्र, किरकोळ कारणांवरून दोघांमध्ये वारंवार वाद होत असत. गणपतला दारूचे व्यसन होते. बुधवारी मध्यरात्री तो मद्यपान करून घरी आला. यावरून त्याचे बहिणीसोबत भांडण झाले. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. संतापलेल्या सुनीताने घरातील चाकूने गणपतवर वार केले. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

भावाने केली भावाची हत्या संशयित ताब्यात

बाभुळगाव (यवतमाळ) : कौटुंबिक वादातून लहान भावाने मोठ्यावर कुर्हाडीने घाव घालून त्यांची हत्या केली. ही घटना गुरूवारी सायंकाळी घडली. जगदीश राठोड (२८, रा. तरोडा) असे मृताचे नाव आहे. दोघेही भाऊ शेजारीच राहत होते. त्यांचे कडाक्याचे भांडण झाल्याने लहान भाऊ प्रमोद राठोड याने थेट कुऱ्हाडीने वार केले. यात जगदीश गंभीर जखमी होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने गावात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती गावचे पोलिस पाटील यांनी बाभुळगाव पोलिसांना दिली. त्यानंतर ठाणेदार दिपमाल भेंडे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. गुन्ह्यातील संशयित म्हणून प्रमोद राठोड याला ताब्यात घेतले. वृत्तलिहिस्तोवर या प्रकरणी गुन्हा दाखल झाला नव्हता. कुटुंबातीलच एकाचा जीव गेला तर दुसरा कारागृहात जाण्याच्या मार्गावर असल्याने राठोड कुटुंब पूर्णतः हादरले आहे. मृतक जगदीश राठोड याला दारूचे व्यसन होते. यामुळे तो घरी आला की वाद घालायचा, यातूनच सायंकाळी सात वाजताच्या दरम्यान नेहमीप्रमाणे जगदीशने लहान भाऊ प्रमोद राठोड याच्याशी वाद घातला. नेहमीच्या वादाला कंटाळून प्रमोदने कुऱ्हाडीचे घाव घालून मोठ्या भावाला घराच्या अंगणातच संपविल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

१ डिसेंबरपासून राज्यातील प्राथमिक शिक्षकांचे असहकार आंदोलन

पुणे/प्रतिनिधी- ऑनलाईन माहिती भरणे, विविध शासकीय उपक्रमांची अंमलबजावणी आणि सातत्याने येणा-या प्रशासकीय आदेशांमुळे अध्यापनावर परिणाम होत असल्याच्या निषेधार्थ राज्यातील प्राथमिक शिक्षकांनी असहकार आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. येत्या १ डिसेंबरपासून अध्यापनात अडथळा निर्माण करणारी ऑनलाईन कामे न करण्यासह प्रशासनिक व्हॉट्सअ?प ग्रुपमधून बाहेर पडण्याची भूमिका शिक्षक संघटनांनी घेतली आहे. पुण्यातील शिक्षक भवन येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत विविध शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत आंदोलनाची दिशा निश्चित केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकविण्यापेक्षा ऑनलाईन माहिती संकलन, विविध योजनांचे अहवाल आणि प्रशासकीय कामांमध्ये अधिक वेळ खर्च करावा लागत असल्याची तक्रार या वेळी करण्यात आली. प्रशासनाकडून व्हॉट्सअ?प ग्रुपवर रात्री-अपरात्रीही सूचना आणि आदेश पाठविले जात असल्याने शिक्षकांवरील मानसिक ताण वाढत आहे. परिणामी, वर्गातील अध्यापनाकडे पुरेसे लक्ष देता येत नसल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून मुक्त करण्याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट केली असली, तरी प्रत्यक्षात जिल्हास्तरावर विविध कामांची जबाबदारी शिक्षकांवर सोपवली जात असल्याचा आरोप करण्यात आला. याशिवाय संचमान्यता धोरण, शिक्षक पात्रता परीक्षा संदर्भातील शासनाची भूमिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबतची धोरणे, शाळांमधील अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांवरही बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात आली.



शुक्रवार २७ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संविधान भारतीय लोकशाहीचा आधारस्तंभ

जिल्हाधिकारी आशिष येरेकर

अमरावती/प्रतिनिधीः-
भारतीय संविधानातील लोकशाही मूल्यांचा जागर आणि संविधानाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने अमरावती जिल्हा संविधान दिन आयोजन समितीच्या वतीने अमरावतीत सलग ११ व्या वर्षी संविधान दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुवार, २६ नोव्हेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक अमरावती येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या उपस्थितीत संविधान उद्देशिकेचे वाचन व नागरिकांना संविधानाची शपथ देण्यात आली.



-अमरावतीत संविधान दिनाचा जागर
-संविधान वाचन व नागरिकांना शपथ

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी आशिष येरेकर व पुतळा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून टाकला.

कार्यक्रमस्थळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे किशोर बोरकर यांनी पुष्पगुच्छ व संविधानाची फ्रेम देऊन स्वागत केले. त्यानंतर जिल्हाधिकारी येरेकर यांनी स्वतः संविधानाचे वाचन केले आणि उपस्थित नागरिकांना संविधानाची शपथ दिली. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या संविधानातील मूलभूत मूल्यांचे पालन करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी संविधान दिनाच्या कार्यक्रमासाठी निमंत्रित केल्याबद्दल पुतळा समिती व आयोजकांचे आभार मानले. संविधान हे भारतीय लोकशाहीचे आधारस्तंभ असून प्रत्येक नागरिकाने संविधानातील मूल्यांचा आदर करून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.संविधान दिनाच्या या आयोजनातुन भारतीय संविधानाचे महत्व, लोकशाही मुल्य,समानता, स्वातंत्र्य बंधुता व न्याय यांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.गेल्या ११ वर्षांपासून सातत्याने अमरावती जिल्हा संविधान आयोजन समितीच्या वतीने अत्यंत उत्साहात राबविण्यात येणारा हा राष्ट्रीय उपक्रम संविधानाबद्दल जनजागृतीचा प्रेरणादायी प्रयत्न आहे.होलीक्रास इंग्रजी कॉन्व्हेंटची माधवी काकडे या विद्यार्थ्यांनीने संविधानावर कवितेचे प्रभावी वाचन करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संविधान दिन आयोजन समितीचे प्रमुख आयोजक,एड . डॉ. पी. एस. खडसे, प्राचार्य, गोपीचंद मेश्राम, किशोर बोरकर, डॉ.एम.पी थोरात, रामेश्वर अभ्यंकर, रामभाऊ पाटील, चरणदास इंगोले,प्रा.जगदिश गोवर्धन, डॉ कमल राऊत,रमेश रामटेके,होलीक्रास इंग्लिश कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापक पुष्पा थॉमस, ज्योती गवई मंचकावर उपस्थित होते. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व संविधान आयोजन समितीचे सदस्य किशोर बोरकर यांनी प्रास्ताविकातून संविधान दिन आयोजन करण्याची भुमिका विषद केली,तर प्राचार्य गोपीचंद मेश्राम, रामेश्वर अभ्यंकर, चरणदास इंगोले, डॉ कमल राऊत,व उत्तमराव गवई यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व आंबेडकरी चळवळीच्या संघर्षाचा इतिहास आपल्या मनोगतातुन व्यक्त केला. याप्रसंगी अँड अरुण रोराळे,हरीदास सिरसाठ,प्रा.अशांत रंगारी, डॉ मनिष गवई, अरूण कुमार आठवले,हर्षल बनसोडे, ज्ञानेश्वर सुकलेले,कॅप्टन महादेव सिरसाठ, महादेव खंडारे, प्राचार्य संजय खडसे, समाधान वानखेडे, विश्वनाथ सदानशिवे,देवानंद लोणारे,टि.टि.लोणारे,शिशुपाल पवार , ज्ञानेश्वर सुखदेवे व्ही.एम.वानखडे,प्रा.काशीनाथ बनसोड, सुरेश दहीकर,किशोर पालेकर,व लार्ड बुध्दाचे इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अँड हरीश निंबाळकर,व आभार प्रदर्शन अँड. दिपक सरदार यांनी केले व राष्ट्रगिताने संविधान दिनाच्या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

व्याजाच्या आमिषाने २४ लाखांची फसवणुक

१.५० टक्के व्याजाचे आमिष दाखवून रक्कम घेतली

अमरावती/प्रतिनिधीः-
व्याजाच्या आमिषाने २४ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. दरमहा १.५० टक्के व्याज देण्याचे आश्वासन देत तक्रारदाराकडून टप्प्याटप्प्याने रक्कम स्वीकारल्यानंतर व्याज देणे बंद केले. तसेच पैशांची मागणी केल्यानंतर संपर्कही टाळण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी पुण्यातील शशीकांत राजेगावकर याच्यासह दोन महिलांविरुद्ध फसवणूक व विश्वासघाताचा गुन्हा दाखल केला आहे.गर्ल्स हायस्कूल चौक परिसरातील रहिवासी दिलीप जयकुमार चांडक (वय ७४) यांनी यासंदर्भात पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार, आरोपी शशीकांत

-पुण्यातील एकासह दोन महिलांविरुद्ध गुन्हा

राजेगावकर (रा. पुणे) आणि त्याच्यासोबत असलेल्या दोन महिलांनी २९ जानेवारी २०२१ रोजी त्यांच्याकडे १८ लाख रुपयांची मागणी केली होती. या रकमेवर दरमहा १.५० टक्के व्याज देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार चांडक यांनी पत्नीच्या बँक खात्यातून संबंधित रक्कम आरोपींकडे हस्तांतरित केली.

यानंतर काही दिवसांनी आरोपींनी पुन्हा प्रत्येकी तीन लाख रुपयांची मागणी केली. अशा प्रकारे तक्रारदाराने एकूण २४ लाख रुपये दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, काही काळानंतर आरोपींकडून व्याजाची रक्कम मिळणे बंद झाले. चांडक यांनी मूळ रकमेची मागणी केली असता आरोपींनी टाळाटाळ सुरू केली. त्यानंतर फोनही उचलणे बंद केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.जादा व्याजाचे आमिष दाखवून विश्वास संपादन केला आणि त्यानंतर २४ लाख रुपये परत न करता आर्थिक फसवणूक व विश्वासघात केल्याचे चांडक यांनी तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीच्या आधारे गाडगेनगर पोलिसांनी शशीकांत राजेगावकर याच्यासह दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

महामंडळाच्या व्याज परतावा योजनांचा लाभ घ्यावा -कॅप्टन आशिष दामले

परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे शिबिर संपन्न

अमरावती/प्रतिनिधीः-
परशुराम आर्थिक विकास महामंडळातर्फे सुरवातीला वैयक्तिक आणि गट व्याज परतावा योजना सुरूवात करण्यात आली आहे. लाभार्थ्यांना केवळ कर्जावरील व्याजाचा परतावा मिळणार आहे. त्यामुळे महामंडळाच्या व्याज परतावा योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांनी केले.



नियोजन विभागांतर्गत असलेल्या परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच पात्र उमेदवारांचे अर्ज संकलित करण्यासाठी विशेष शिबिर घेण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज येथील नियोजन भवनात विशेष शिबिर पार पडले.

शिबिरामध्ये महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज योजना व गट कर्ज योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारणे, संकलन करणे तसेच अर्जांची छाननी प्रक्रिया राबविण्यात आली. यासोबतच योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता निकष, कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रियेबाबत उपस्थित लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

महामंडळाच्या माध्यमातून समाजातील पात्र घटकांना स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ सुलभतेने मिळवून देणे यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आलेल्या शिबिरांमुळे महामंडळाच्या योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार झाली आहे.

१ व १० वरिल उर्वरित

प्रेमप्रकरणातून तरुणीवर धारदार

आणि २५ वर्षीय युवती हे इंदिरानगर परिसरात शेजारी राहतात. त्यांच्यात प्रेमसंबंध असल्याची माहिती आहे. गुरुवारी दुपारी अजयच्या घरी कोणी नसताना युवती त्याच्या घरी गेली होती. यावेळी घराच्या कंपाउंड गेटला कुलूप लावलेले होते. काही वेळाने घरातून आरडाओरड ऐकू आल्याने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

घरात युवती रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. 'मला वाचवा' अशी आर्त हाक ती देत होती. तिच्या डोक्यावर आणि हातावर धारदार शस्त्राने वार केल्याचे दिसून आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून एका महिलेने गेटवरून उडी मारत आत प्रवेश केला आणि जखमी युवतीला बाहेर काढले. दरम्यान, अजयने विषारी औषध प्राशन केल्याचे तसेच स्वतःच्या हातावरही वार केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलीस ठाण्याचे ठाणेदार देविदास गजरे, पोलीस उपनिरीक्षक हर्षल नगरकर आणि पोलीस कर्मचारी प्रवीण सदावर्ते, सचिन सोनोने व संदीप शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यापूर्वीच नागरिकांनी दोघांनाही आष्टी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. तेथील प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्याने दोघांना अमरावती येथे हलविण्यात आले.

या घटनेमुळे इंदिरानगर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. हा प्रकार प्रेमसंबंधातून घडला की त्यामागे अन्य काही कारण आहे, याचा उलगडा अद्याप झालेला नाही. आष्टी पोलिसांनी घटनेची नोंद घेत तपास सुरू केला आहे.

चांदूर रेल्वेचे २ तरूण पुण्यात

मोहित (वय ३०, बागापुर) असे अटक आरोपींची नावे आहेत.पुणे गुन्हे शाखेच्या अँटी नार्कोटिक्स स्क्वॉड-२ ला गांजाच्या मोठ्या खेपेच्या वाहतुकीची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलीस पथकाने शिरूर भागात नजर वाढवली आणि संशयित वाहनाचा पाठलाग केला. पोलिसांनी घेराव घालून कार थांबवत झडती घेतली. यावेळी वाहनातून २५० किलो गांजा आढळून आला.

पोलिसांनी गांजा आणि कारसह एकूण १ कोटी ५१ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.गांजा तस्करीच्या एवढ्या मोठ्या प्रकरणात चांदूर रेल्वे तालुक्यातील दोन युवकांची नावे समोर आल्याने स्थानिक परिसरात खळबळ उडाली आहे. दोन्ही आरोपी पुण्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात गांजा घेऊन कोणाकडे जात होते आणि या तस्करीमागे कोणते नेटवर्क सक्रिय आहे, या प्रश्नांचा तपास आता पोलीस करत आहेत.या कारवाईची माहिती पुणे गुन्हे शाखेच्या अँटी नार्कोटिक्स स्क्वॉडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जीवन माने यांनी दिली. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात

परिसरात दोन हात, एक पाय आणि डोके आढळल्याने रुग्णालयातील कर्मचारी, रुग्णांचे नातेवाईक आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. विशेष म्हणजे आढळलेले अवयव नेमके कोणाचे आहेत. ते स्त्रीचे आहेत की पुरुषाचे, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. तसेच हे अवयव रुग्णालय परिसरात कसे आले, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांकडून घटनास्थळाची पाहणी आणि पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. रुग्णालयासारख्या संवेदनशील ठिकाणी मानवी अवयव आढळून आल्याने या प्रकाराचे गूढ उकलण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

नागरिकांमधील चर्चेनुसार, रुग्णालय परिसरात जे अवशेष आढळले ते एका भिकारीचे असल्याचा अंदाज आहे. चार दिवसापूर्वी नाल्यात कडून त्याचा मृत्यू झाला असावा असा अंदाज आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल.

बँड पार्टीचे वाहन रिव्हर्स

समोर येणार आहे . मृतक शंकर नवलकर यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने नवलकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्यावर चारवड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती नातेवाइकांनी दिली आहे.

फिनले मिलच्या आणखी एका

झाला आहे . यातच बंद फिनले मील मधील एका कामगाराने आत्महत्या करून जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना २६ नोव्हेंबर रोजी अचलपूर पोलिस स्टेशनच्या हद्दीत घडली आहे. विशेष म्हणजे अवघ्या तीन दिवसांत मिल मधील दोन कामगारांनी आत्महत्या केल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, अचलपूर येथील रहिवासी विजय नारायण हदाले (वय ३० वर्षे) यांनी गुरुवारी सकाळी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळ दरम्यान विजय हे आंघोळीसाठी बाथरूममध्ये गेले होते. बराच वेळ होऊनही ते बाहेर न आल्याने त्यांच्या आईने पाहणी केली असता ते गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. ही घटना लक्षात येताच कुटुंबीयांनी आरडाओरड केली. परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत विजय यांना अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. कोरोना काळात फिनले मिल बंद झाल्यानंतर विजय हदाले यांनी कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्यासाठी ऑटो चालविण्याचा व्यवसाय सुरू केला होता. ऑटो चालवून मिळणाऱ्या उत्पन्नातून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. मात्र त्यांच्या निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले तसेच आई-वडील असा आप्त परिवार आहे.

३ लाख २४ हजार शेतकऱ्यांच्या

जाहीर करून उपाययोजना सुरु केल्या आहे. दुष्काळीस्थितीमुळे हवालदील शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५ हजार रुपये जमा करण्याची घोषणा केली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आधारलिंक खात्यात दि. २ नोव्हेंबर पासून मदतीची रक्कम जमा होत आहे. ही रक्कम जमा होण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी आणि ई-केवायसी करणे गरजेचे आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी तातडीने ही कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. आतापर्यंत रक्कम जमा करण्यात आलेल्या शेतकऱ्यांची तालुकानिहाय संख्या पुढील प्रमाणे आहे.अमरावती तालुक्यात २० हजार ६१२ शेतकऱ्यांना १० कोटी ३० लाख ६० हजार, अचलपूर तालुक्यात २९ हजार २६६ शेतकऱ्यांना १४ कोटी ६३ लाख ३० हजार, अंजनगाव सूर्जी तालुक्यात २३ हजार ७९७ शेतकऱ्यांना ११ कोटी ८९ लाख ८५ हजार, भातकुली तालुक्यात २२ हजार १९८ शेतकऱ्यांना ११ कोटी ९ लाख ९० हजार, चांदूर रेल्वे तालुक्यात १७ हजार ३३४ शेतकऱ्यांना ८ कोटी ६७ लाख २० हजार, चांदूर बाजार तालुक्यात १९ हजार ९५६ शेतकऱ्यांना ९ कोटी ५० लाख ४५ हजार, चिखलदरा तालुक्यात ८ हजार ३७६ शेतकऱ्यांना ४ कोटी १८ लाख ८० हजार, दर्यापूर तालुक्यात ३२ हजार ३९५ शेतकऱ्यांना १६ कोटी ४४ लाख ७५ हजार, धामणगाव रेल्वे तालुक्यात २३ हजार ४४१ शेतकऱ्यांना ११ कोटी ७२ लाख ५ हजार, धारणी तालुक्यात १४ हजार ५१५ शेतकऱ्यांना ७ कोटी २५ लाख ७५ हजार, मोर्शी तालुक्यात ३१ हजार ५१६ शेतकऱ्यांना १५ कोटी ७५ लाख ८० हजार, नांदगाव खंडेश्वर तालुक्यात २९ हजार ३०७ शेतकऱ्यांना १४ कोटी ६५लाख ३५ हजार, तिवसा तालुक्यात १९ हजार ५६६ शेतकऱ्यांना ९ कोटी ७८ लाख ३० हजार, वरूड तालुक्यात ३३ हजार ८४ शेतकऱ्यांना १६ कोटी ५४ लाख २० हजार इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे. तालुकास्तरावरून मंजूरी देण्यात आलेल्या खात्यांना जिल्हास्तरावरून तातडीने मंजुरी देण्यात येत आहे. यानंतर राज्यस्तरावरून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम तातडीने जमा करण्यात येत आहे. अद्याप खाते स्विकृती व रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरुच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होणार आहे. बँक खात्यात मदतीची रक्कम जमा व्हावी, यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी आणि ई-केवायसीची तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दारूच्या नशेत शिवीगाळ

जखमी झालेल्या जगदीशचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घराच्या अंगणात घडलेल्या या रक्तरंजित घटनेने कुटुंबीयांसह गावकऱ्यांना मोठा धक्का बसला. घटनेची माहिती मिळताच बाभूळगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

एकाच घरात राहणाऱ्या आणि रोजमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या दोन सख्ख्या भावांमधील वादाचा शेवट रक्तपातात झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून हत्येच्या घटनेमागील सर्व बाबींचा तपास केला जात आहे.

घरात ठेवलेला ६० क्विंटल

यांनी यंदा कापसाची शेती केली होती. कापूस काढून त्यांनी घरात विक्रीसाठी ठेवला होता. घरात ठेवलेल्या या कापसाच्या ढिगा-याला अचानक आग लागली. यामध्ये ६० क्विंटल कापूस जळून खाक झाला.

घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत ६० क्विंटल कापूस जळून खाक झाला होता. शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. माहिती मिळाल्यानंतर शेतकऱ्याने पोलीस पाटील घाडगे यांच्याशी संपर्क केला. त्यांच्याकडून पोलिसांशी संपर्क करण्यास सांगण्यात आले, मात्र 'हे माझे काम नाही' असे म्हणत त्यांनी टाळाटाळीचे उत्तर दिले, असा आरोप शेतकरी कुटुंबाने केला आहे. नंतर ते घटनास्थळी पोहोचले.अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात आहे. त्यात घरात ठेवलेल्या कापसाला आग लागल्याने शेतकऱ्यावर आर्थिक संकट अधिकच गडद झाले आहे.

बंडू घोम यांचे उपोषणाला

राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी उपोषण स्थळी दाखल होऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली .यावेळी शिवसेना शिंदे गटाचे प्रितेश अवघड,विलास सोळंकी, विवेक महल्ले आदी उपस्थितीत होते .अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रभारी सचिव मनोज ठाकरे यांनी सुद्धा उपोषण स्थळी भेट दिली आहे .यामुळे आता उपोषण कर्ते बंडू घोम यांच्या विविध मागण्यांवर संबंधित विभाग कधी व कोणती कारवाई करते ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

१६५ लाख खर्चून बांधलेले विश्रामगृह

असून आधुनिक सोयीसुविधांचा मोठा अभाव आहे. त्यामुळे शासकीय कामानिमित्त बाहेरगावाहून शहरात येणारे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींची निवासाची मोठी गैरसोय होत होती. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून नवीन विश्रामगृहाची मागणी केली जात होती.स्थानिकांची आणि प्रशासनाची ही गरज लक्षात घेऊन शासनाने डिसेंबर २०२२ च्या अर्थसंकल्पात विश्रामगृहाच्या विस्तारीकरणासाठी १६५.१७ लक्ष रुपयांचा भरीव निधी मंजूर केला. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या नवीन इमारतीचे बांधकाम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले. सध्या ही नवीन इमारत सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज होऊन तयार आहे. परंतु, केवळ उद्घाटनाचा मुहूर्त निघत नसल्याने गेल्या तीन वर्षांपासून या इमारतीला कुलूप लावलेले आहे.नवीन विश्रामगृह बंद असल्याने शासकीय कामानिमित्त शहरात येणाऱ्या अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना नाइलाजास्तव खाजगी हॉटेल किंवा लॉजचा आधार घ्यावा लागत आहे. यामुळे त्यांचा आर्थिक खर्च वाढला असून सुरक्षिततेचा आणि गैरसोयीचा प्रश्न निर्माण झाला आहे. दुसरीकडे, शासकीय इमारत वापरात नसल्याने शासनाला मिळणाऱ्या हक्काच्या महसुलावरही पाणी सोडावे लागत आहे.जनतेच्या कराच्या पैशातून उभारलेली ही इमारत केवळ उद्घाटनाच्या औपचारिकतेसाठी बंद ठेवणे योग्य नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वरिष्ठ प्रशासनाने या प्रकरणी तातडीने लक्ष घालावे. कोणाचीही वाट न पाहता या नवीन विश्रामगृहाचे त्वरित लोकार्पण करून ती इमारत शासकीय सेवेत दाखल करावी, अशी जोरदार मागणी आता शहरवासीयांकडून होत आहे.

लग्नाच्या बँड-बेंजोला परवानगीचा

अंमलबजावणी सर्वांसाठी समान असावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

दुसरीकडे, शहरात अवैध दारू विक्री, अवैध वाहतूक आणि सट्टा व्यवसाय सुरू असल्याचे आरोप होत असताना या प्रकारांवर ठोस कारवाई कधी होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या अवैध व्यवसायांवर नियमित धाडी पडणार का? संबंधितांवर कायदेशीर कारवाई होणार का? की सर्वसामान्य नागरिकांपुरतीच नियमांची अंमलबजावणी मर्यादित राहणार?एका बाजूला लग्नाच्या आनंदावर परवानगीचे बंधन, तर दुसऱ्या बाजूला कथित अवैध धंद्यांवर कारवाईची प्रतीक्षा! अशी विसंगती असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची पोलीस अधीक्षक अमरावती यांनी गांभीर्याने दखल घेऊन चांदूर रेल्वे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी आणि अवैध व्यवसायावर प्रभावी कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत,अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

तिरुपतीमध्ये चेन्नईच्या दाम्पत्याने

आणि गोसंरक्षणासाठी १ कोटी रुपये दान केले. मे २०२६: तिरुपतीसाठी एक इलेक्ट्रिक बस दान करण्याची घोषणा केली.

येथे केसांचे दान केले जाते: अशी मान्यता आहे की, जी व्यक्ती आपल्या मनातील सर्व पापे आणि वाईट गोष्टी येथे सोडून जाते, तिची सर्व दुःखे देवी लक्ष्मी दूर करतात. त्यामुळे येथे लोक आपल्या सर्व वाईट गोष्टी आणि पापांचे प्रतीक म्हणून केस अर्पण करतात.भगवान विष्णूंना व्यंकटेश्वर म्हणतात: या मंदिराबद्दल असे म्हटले जाते की, हे मेरू पर्वताच्या सात शिखरांवर बांधलेले आहे. त्याची सात शिखरे शेषनागाच्या सात फण्यांचे प्रतीक मानली जातात. या शिखरांना शेषाद्री, नीलाद्री, गरुडाद्री, अंजनाद्री, वृषटाद्री, नारायणाद्री आणि व्यंकटाद्री असे म्हणतात.यांपैकी व्यंकटाद्री नावाच्या शिखरावर भगवान विष्णू विराजमान आहेत आणि याच कारणामुळे त्यांना व्यंकटेश्वर या नावाने ओळखले जाते.

संपूर्ण मूर्तीचे दर्शन फक्त शुक्रवारीच होते: मंदिरात बालाजीचे दिवसातून तीन वेळा दर्शन घेतले जाते. पहिले दर्शन विश्वरूप म्हणून ओळखले जाते, जे सकाळी होते. दुसरे दर्शन दुपारी आणि तिसरे दर्शन रात्री होते. भगवान बालाजींच्या संपूर्ण मूर्तीचे दर्शन फक्त शुक्रवारी सकाळी अभिषेकाच्या वेळीच घेता येते.भगवान बालाजींनी याच ठिकाणी रामानुजाचार्यांना दर्शन दिले होते: येथे बालाजींचा मंदिराशिवाय आणखीही अनेक मंदिरे आहेत, जसे— आकाश गंगा, पापनाशक तीर्थ, वैकुंठ तीर्थ, जालाविर्तीर्थ, तिरुच्चानूर. ही सर्व ठिकाणे भगवानांच्या लीलांशी संबंधित आहेत. असे म्हटले जाते की, श्रीरामानुजाचार्य जवळपास १५० वर्षे जगले आणि त्यांनी संपूर्ण आयुष्य भगवान विष्णूंच्या सेवेत व्यतीत केले. त्यानंतर याच ठिकाणी भगवानांनी त्यांना साक्षात दर्शन दिले होते.

मुख्यमंत्री फडणवीसांकडून

त्यांनी संविधान दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देतानाच मुंबई हल्ल्यातील शहीदांचे स्मरण करून आदरांजली वाहिली.हा हल्ला ताज हॉटेल, ट्रायडेंट, सीएसटीवर नव्हता, हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर होता. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न होता. हा भारताच्या संविधानावर हल्ला होता. कसाब पकडला गेला म्हणूनच संपूर्ण जगासमोर पाकिस्तानचा बुरखा फाडता आला. पाकिस्तान हे दहशतवादी राष्ट्र असल्याचे आपण जगासमोर आणू शकलो. म्हणूनच हा दिवस आपण कधी विसरू शकत नाही. यापुढे कधीही असा हल्ला आपल्याला होऊ द्यायचा नाही,असे फडणवीस म्हणाले.

भारताने आपले रौद्ररूप दाखवून दिले

गेल्या १२ वर्षांत मुंबई किंवा देशात दहशतवादी घटना पूर्णपणे संपल्या आहेत. काही प्रयत्न झाले, पण तेही परतवून लावण्यात आले. आपले पोलिस व आपल्या जवानांच्या मदतीने एक सुरक्षित भारत आपण तयार केला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर ज्याप्रकारे भारताने आपले रौद्ररूप दाखवून दिले, त्यातून भारत हे हल्ले सहन करणार नाही, पाकिस्तानात घुसून अशा हल्ल्यांचा सूड घेईल हे आपण दाखवून दिले, असा उल्लेखही फडणवीसांनी केला. दरम्यान, समुद्रमार्गे आलेल्या दहा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या या भ्याड हल्ल्यात ३४ परदेशी नागरिकांसह १६६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला होता, तर सुमारे ७०० जण जखमी झाले होते. जिवाची पर्वा न करता लढलेल्या पोलिस जवानांनी ९ दहशतवाद्यांना कंठस्नान घालत, अतिरेकी अजमल कसाब याला जिवंत पकडले. त्याला फासावर चढवण्यात तपास यंत्रणांना यश आले. या हल्ल्यात १८ पोलिस जवानांना वीरमरण आले.

चौकशीची जाहिर नोटीस
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

जाहीर क्रमांक :- ६१७/२०२६ कलम ३२

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक - SOCIETY OF ST. URSULA, BORGAON MANJU, TO & DISTT. AKOLA, Regd No. :- D-6 (Akola)

अर्जदार : Sr. Agnes Kisan Sadaphal R/o borgaon, manju, Tq & Distt. Akola.

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त - अकोला विभाग अकोला हे वर नमूद केलेल्या अर्जा संदर्भात मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ३२ / १९ अन्वये खालील मुद्दयावर चौकशी करणार आहेत. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? खाली निर्दिष्ट केलेला मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

जंगम मिळकत (वर्णन) :- काही नाही. अथवा / यादिच यांच्या सबळ जमा आहे.

Registration Division & District Amravati, Sub-Division & Taluka Chandur Rly. Within the local limits of the Nagar Parishad Chandur Rly, bearing Field Gut No. 245/3, Admeasuring 3 Hec. 20R = 8 Acre, occupant class –I, Assessment Rs. 7.90 Ps., of mouje - Chandur Rly. 1, Pragane – Manjarkhed, Tq. Chandur Rly., Dist. Amravati, and bounded by as follows:

Towards the East :- Road, Towards the West :- Canal's side place, Towards the North :- Road, Towards the South :- Field of Shri Mahure, Purchase Price Rs. 1,34,28,043/- (Rupees One Crore Thirty Four Lakhs Twenty Eight Thousand Forty Three Only)

सदरच्या चौकशी प्रकरणा मध्ये कोणास काही हरकत म्हावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची कैफियत हि नोटिस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून(३०) तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील, ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला - १ यांच्या शिक्क्यानिशी आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी दिली.

अधिक्षक
शिक्का
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

मनरेगाच्या सिंचन विहिरींचे अनुदान रखडले

फुलउमरीतील शेतक–यांचे सुमारे एक कोटी रुपये अडकले!

विहिरींचे खोदकाम व बांधकाम पूर्ण करूनही कुशल–अकुशल निधी मिळेना; ३० ते ३५ शेतकरी आर्थिक संकटात, गटविकास अधिका–यांना निवेदन

■ प्रतिनिधी | मानोरा ■

शेतीला शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध व्हावी आणि शेतक–यांचे उत्पन्न वाढावे, या उद्देशाने शासनाकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) सिंचन विहिरींचा लाभ दिला जातो. मात्र, विहिरींचे खोदकाम व बांधकाम पूर्ण करूनही अनुदानाची रक्कम मिळत नसल्याने फुलउमरी येथील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. गावातील सुमारे ३० ते ३५ शेतकऱ्यांचे जवळपास एक कोटी रुपयांचे अनुदान प्रलंबित असल्याची बाब समोर आली आहे. फुलउमरी गावात एकूण १५० शेतकऱ्यांना सिंचन विहिरींचा लाभ मिळाला आहे. त्यापैकी ३० ते ३५ शेतकऱ्यांनी विहिरींचे खोदकाम व बांधकाम पूर्ण केले आहे. सन २०२३, २०२४ व २०२५ या कालावधीत मंजूर झालेल्या विहिरींची कामे पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी उसनवारी करून तसेच स्वतःच्या खिशातील पैसे खर्च करून कामे पूर्ण केली. काही शेतकऱ्यांचे तीन, तर



काहींचे चार मस्टर निघाले आहेत. मात्र, विहीर खोदकाम व बांधकामापोटी मिळणारी सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांची रक्कम अद्याप प्रलंबित असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी, गावातील लाभार्थी शेतकऱ्यांचे जवळपास एक कोटी रुपयांचे अनुदान अडकले आहे.

शेतीच्या हंगामात आर्थिक भांडवलाची गरज असताना विहिरींच्या कामासाठी घेतलेली उसनवारी फेडायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. शासनाच्या योजनेचा लाभ मिळेल या अपेक्षेने शेतकऱ्यांनी कर्ज व उसनवारी करून विहिरींची कामे पूर्ण केली; मात्र अनुदानच मिळत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे.

या संदर्भात रोजगार सेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे अनुदानाबाबत विचारणा केली असता समाधानकारक माहिती मिळत नसल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत फुलउमरीमार्फत मनरेगा अंतर्गत झालेल्या कामांची सखोल चौकशी करून प्रलंबित कुशल व अकुशल निधी तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी देवराव महादू चव्हाण, विमल प्रेमसिंग चव्हाण, शंकर गणपत राठोड, रमेश बाबुसिंग राठोड, प्रदीप श्रीराम राठोड, सावकी दूधराम चव्हाण, नामदेव नानू राठोड, रवी श्रीराम राठोड, चरण इना राठोड, धनसिंग नानू राठोड, जनार्दन पितांबर राठोड, शामल बाला राठोड व जगदीश चव्हाण यांनी २५ नोव्हेंबर रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती मानोरा यांना निवेदन दिले आहे. प्रलंबित अनुदानाचा प्रश्न तातडीने निकाली काढून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसावे लागेल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

कळंबेश्वर तलावातील अवैध पाणी उपशाविरोधात तातेराव वानखडे यांचे आमरण उपोषण सुरू!

■ प्रतिनिधी | वाशिम ■



मालेगाव तालुक्यातील कळंबेश्वर येथील लघु पाटबंधारे विभागाच्या तलावातून रात्रीच्या वेळी विद्युत पंप व ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात सुरू असलेला अवैध पाणीउपसा तात्काळ बंद करण्यात यावा, या मागणीसाठी तातेराव किसन वानखडे यांनी २६ नोव्हेंबरपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र, मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने अखेर त्यांनी उपोषणाचे पाऊल उचलले आहे.

कळंबेश्वर येथील लघु पाटबंधारे विभागाच्या तलावातील पाणी परिसरातील नागरिकांच्या पिण्यासाठी राखीव असताना रात्रीच्या वेळी विद्युत पंप व ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा केला जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. या अवैध पाणीउपशामुळे तलावातील पाणीसाठा कमी होण्याची शक्यता असून, भविष्यात कळंबेश्वरसह वडप, पांगरी, मानका, एकांबा आदी गावांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागू शकते.

यापूर्वीही अवैध पाणीउपसा रोखण्यासाठी विद्युत जोडण्या खंडित करण्याची कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही अनधिकृत विद्युत जोडण्या करून ट्रॅक्टर व मोटारपंपांच्या सहाय्याने पाणीउपसा सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वारंवार तक्रारी करूनही

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर

प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याचे वानखडे यांनी म्हटले आहे.

कळंबेश्वर तलावावरील सर्व गावांचे विद्युत कनेक्शन तात्पुरते खंडित करणे, तलाव परिसरातील अनधिकृत विद्युत जोडण्या काढणे, ट्रॅक्टर व मोटारपंपांच्या सहाय्याने होणारा अवैध पाणीउपसा तात्काळ बंद करणे, संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करणे तसेच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी सुरक्षित व कायमस्वरूपी व्यवस्था करणे, अशा प्रमुख मागण्या त्यांनी प्रशासनाकडे केल्या आहेत.

या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करून तलावातील अवैध पाणीउपसा कायमस्वरूपी बंद करण्यात यावा, अशी मागणी करत तातेराव वानखडे यांनी २६ नोव्हेंबरपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

कार्तिक पौर्णिमेनिमित्त देवठाणा येथे काकड आरतीची सांगता; महाप्रसादाचे आयोजन



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील देवठाणा येथील हनुमान मंदिर रापासून मागील पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या काकड आरती सोहळ्याची कार्तिक पौर्णिमेनिमित्त भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.

दररोज पहाटे पाच वाजता निघणाऱ्या काकड आरतीमध्ये गावातील बाल गोपाल मोठ्या संख्येने सहभागी होत होते.योगेश्वर वानखडे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा पार पडला मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मृदुंगाचार्य निलेश वानखडे,महेश जगताप, परमेश्वर घडिंकर, पवन पवार, सोहम वानखडे, अशोक सातपुते, पवन राऊत, श्रीहरी वानखडे, विपुल वानखडे, सोहम पवार, रोशन जगताप, सोहम वानखडे,यांच्यासह गावातील नागरिक व भाविक उपस्थित होते.

कुपट्यात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर; ग्रामसेवकाच्या बदलीची मागणी; गटविकास अधिकाऱ्यांना ग्रामस्थांचे निवेदन

■ प्रतिनिधी | मानोरा ■

पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या कुपटा गावातील अनियमित पाणीपुरवठा आणि ग्रामसेवकाच्या कथित वारंवार गैरहजेरीमुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

गावात अनेकदा महिनाभर नळाला पाणी येत नसल्याने नागरिकांना पाण्याचा साठा करून ठेवावा लागतो. त्यामुळे स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच ग्रामसेवकाच्या गैरहजेरीमुळे नागरिकांची शासकीय कामे वेळेत होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



निवेदनात गावातील पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करावा. ग्रामसेवकाच्या गैरहजेरीची व कामकाजाची चौकशी करावी.दोषी आढळल्यास नियमानुसार प्रशासकीय कारवाई करावी आवश्यकतेनुसार ग्रामसेवकाची बदली करून कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्याची नियुक्ती करावी.

गावातील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

निवेदनावर विजय घोडे, मंथन मासोतकार, संतोष घोडे, चंपत दिघडे, चंद्रकांत घोडे, बशीर भाई, जाकीर भाई, प्रवीण आखुड, रुपेश मासोदकर, मलिक शेख, विजय कानडे, चेतन मासोतकर आणि शुभम शामसुंदर यांच्यासह गावातील नागरिक यांच्या स्वाक्षरी आहे.

आता गटविकास अधिकारी या निवेदनाची दखल घेऊन कोणती कार्यवाही करतात, याकडे कुपटा ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

संविधान दिन उत्साहात साजरा

मालेगाव : मालेगाव येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा, मालेगाव येथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजया भिसडे तर प्रमुख पाहुणे म्हणून सुषमा शिंदे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन व हार काय अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ उपस्थित देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी संविधानाचे महत्त्व, भारतीय लोकशाही आणि नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्ये याविषयी सुषमा शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

चवदार तळ्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्या!

सत्याग्रहाच्या शताब्दीपूर्वी नामकरणाचा शासन निर्णय घेण्याची वसंतराव हिवराळे यांची मागणी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाड (जि. रायगड) येथील ऐतिहासिक चवदार तळ्याचे अधिकृत नामकरण 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चवदार तळे' असे करण्यात यावे, अशी मागणी आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी केली आहे. यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांना सहाय्यक आयुक्त, वाशिम यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

२० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाला २० मार्च २०२७ रोजी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक घटनेचे महत्त्व आणि समता, स्वातंत्र्य व मानवी हक्कांचा संदेश जतन करण्यासाठी शताब्दीपूर्वीच नामकरणाचा शासन निर्णय निर्गमित करावा, अशी आग्रही मागणी हिवराळे यांनी केली आहे. या नामकरणातून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक कार्याला उचित अभिवादन होईल.

अवैध जुगार व गावठी दारू अड्ड्यावर छापा

२.२१ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील सोयजना गावात अवैध जुगार तसेच गावठी हातभट्टी दारूच्या अड्ड्यावर मानोरा पोलिसांनी २५ नोव्हेंबर ला धडक कारवाई करत २,२१,१२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस स्टेशन मानोरा हद्दीतील अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान, सोयजना येथील जगदिश चव्हाण यांच्या घराशेजारील सार्वजनिक जागेवर काही जण पैशांच्या हारजितवर तीन पत्ती जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक नैना पोहेकर आणि पथकाने चार आरोपींना ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेले आरोपी अरविंद प्रकाश जाधव, विनोद दत्तात्रय मिसाळ, अजय दादाराव राठोड आणि जगदिश रामराव चव्हाण (सर्व रा. सोयजना) जुगारातून रोख रक्कम १,५२० रुपये, डावावरील ६०० रुपये, ५२ तास पत्ते तसेच तीन दुचाकी वाहने (एम.एच. ३७ ए.ए. ७५२५ अंदाजे ७०,००० रुपये, एम.एच. ३७झे. ६३८९ अंदाजे ५०,००० रुपये आणि एम.एच. ३७ आर. ४७८९ अंदाजे ७५,००० रुपये) असा एकूण १,९७,१२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दारू व मोहमाच जप्ती आरोपी जगदिश रामराव चव्हाण (वय ४१) याच्या राहत्या घराच्या पत्र्याच्या खोलीची पंचासमक्ष झडती घेतली असता ३,००० रुपये किमतीची २७ लिटर गावठी हातभट्टी दारू आणि २१,००० रुपये किमतीचा २०० लिटर सडवा मोहमाच असा २४,००० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला.

महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदी अनिल इंगोले यांची निवड

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेची वाशिम जिल्हातील त्रैवार्षिक निवडणूक २०२६ नुकतीच २१ नोव्हेंबर रोजी पार पडली. या निवडणुकीत बहुमताने राज्य कार्यकारणी सदस्य पदी प्रवीण ठाकरे यांची निवड झाली तसेच वाशिम जिल्ह्याच्या अध्यक्षपदी अनिल इंगोले यांची मताने निवड करण्यात आली.संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणीमध्ये सचिवपदी महादेव सोळंके, कार्याध्यक्षपदी निलेश भोयर ,उपाध्यक्षपदी श्रीमती देहुती चौधरी , कोषाध्यक्षपदी राजू ठाकरे, प्रसिद्धी प्रमुख पदी गजानन राऊत, तर जिल्हा महिला प्रतिनिधी म्हणून ताई थोरात,भारती चौढाळे मॅडमड यांची बहुमताने निवड करण्यात आली या निवडीमुळे संघटनेच्या कामकाजाला नवी दिशा मिळणार असून सहाय्यक कृषी विविध प्रश्नांना व अडचणींना संघटितपणे वाचा फोडण्यासाठी नवनियुक्त पदाधिकारी प्रयत्नशील राहतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कृषी विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविणे, एकजूट मजबूत करणे आणि अधिकारी-कर्मचा-यांच्या न्याय्य मागण्यांसाठी पाठपुरावा करणे यावर नवनियुक्त कार्यकारिणी भर देणार आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यां कडून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे वाचन

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■



मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था, वनोजा द्वारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा येथे २६ नोव्हेंबर २०२६ रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. यावेळी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास तसेच संविधानाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. शासनाच्या निर्देशानुसार संविधान दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात निबंध स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. ममता पाझीकर, प्रा. दिलीप मुंदे, प्रा. दीपक भगत, डॉ. सुनील बोरचाटे, डॉ. सचिन कडू, प्रा. बापूराव डोंगरे, प्रा. संजय पोतराजवार, प्रा. संदीप इंगळे, प्रा. तृषाल राऊत, प्रा. अक्षय आव्हाळे, प्रा. वैभव राऊत यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

धम्मभूमी येथे संविधान दिन साजरा



■ प्रतिनिधी | मानोरा ■

येथील धम्मभूमी बुद्ध विहारात दिनांक २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.

या वेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. त्या नंतर सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली.

समता, स्वातंत्र्य, न्याय बंधुत्वाचा दीप उजळणाऱ्या भारतीय संविधान दिवसाविषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला सुनील पडघान,माणिक डेरे,शरद इंगोले,हर्ष इंगोले, आराध्य पडघान, ललिता पडघान,रजनी भगत, करुणा इंगोले,शीला प्रधान,उपासक, उपासिका मोठ्या संख्येत ह्या उपस्थित होत्या.

बालकांच्या आरोग्याची काळजी घेणारा आरबीएसके कार्यक्रम!

शून्य ते १८ वयोगटातील बालकांची नियमित तपासणी; आजारांचे वेळेत निदान, उपचारांसह शस्त्रक्रियेचीही सुविधा

■ प्रतिनिधी | रिसोड ■

बालकांचे आरोग्य सुदृढ राहावे, त्यांच्यातील आजारांचे वेळीच निदान व्हावे आणि आवश्यक उपचार वेळेत मिळावेत, या उद्देशाने आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची सखोल आरोग्य तपासणी केली जाते. विशेष म्हणजे, केवळ आजारांचे निदान करण्यापुरता हा उपक्रम मर्यादित नसून आवश्यकतेनुसार औषधोपचार, पुढील वैद्यकीय संदर्भसेवा तसेच विविध प्रकारच्या शस्त्रक्रियांची सुविधाही उपलब्ध करून दिली जाते.

बालकांच्या आरोग्यविषयक समस्या अनेकदा सुरुवातीच्या टप्प्यात लक्षात येत नाहीत. काही आजार जन्मजात असतात, तर काही समस्या बालकांच्या वाढीच्या काळात दिसून येतात. अशा समस्यांचे वेळीच निदान झाल्यास त्यावर योग्य उपचार करणे शक्य होते. हीच बाब लक्षात घेऊन आरबीएसके कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी आणि शाळांमध्ये नियमित आरोग्य तपासणीचे नियोजन करण्यात आले आहे. या



कार्यक्रमांतर्गत वर्षातून दोन वेळा अंगणवाडीतील बालकांची, तर एक वेळा शाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. तपासणीदरम्यान बालकांच्या आरोग्याची सविस्तर पाहणी करून किरकोळ आजार आढळल्यास त्यांच्यावर संबंधित ठिकाणीच उपचार करण्यात येतात.

तर गंभीर आजार किंवा विशेष वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या बालकांना पुढील उपचारांसाठी उच्चस्तरीय आरोग्य संस्थांकडे संदर्भित केले जाते.

जन्मजात व्यंग, हृदयविकार, डोळ्यांचे आजार, कान-नाक-घशाच्या समस्या, दंतविषयक विकार तसेच इतर गंभीर आरोग्य समस्यांचे निदान आणि उपचार करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. आवश्यकतेनुसार विविध प्रकारच्या शस्त्रक्रियाही कार्यक्रमांतर्गत करून घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील बालकांसाठी हा कार्यक्रम विशेष लाभदायी ठरू शकतो. अनेकदा आर्थिक अडचणींमुळे पालकांना मुलांच्या आजारांवर योग्य उपचार घेणे शक्य होत नाही. अशा वेळी आरबीएसकेच्या माध्यमातून बालकांना वैद्यकीय सेवा मिळण्याचा मार्ग उपलब्ध होतो. बालकांचे आरोग्य ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर समाजाच्या उज्ज्वल भविष्याची जबाबदारी आहे.

वेळीच निदान झाल्यास उपचार शक्य

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शून्य ते १८ वयोगटातील बालकांची नियमित आरोग्य तपासणी केली जाते. तपासणीदरम्यान किरकोळ आजार असलेल्या बालकांवर जागेवरच उपचार केले जातात. गंभीर आजार किंवा शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या बालकांना पुढील उपचारांसाठी संदर्भित केले जाते. पालकांनी या आरोग्य तपासणीचा लाभ घ्यावा.

डॉ. रवी बोरा
वैद्यकीय अधिकारी आर बी एस के

.....

बालकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका

बालकांच्या शारीरिक वाढीसोबतच त्यांच्या आरोग्यविषयक समस्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नियमित आरोग्य तपासणीमुळे आजारांचे वेळीच निदान होऊन योग्य उपचार करणे शक्य होते. पालकांनी बालकांच्या आरोग्याबाबत जागरूक राहून आरोग्य विभागाच्या तपासणी उपक्रमांना सहकार्य करावे.

डॉ. शीतल नरवाडे वैद्यकीय अधिकारी आरबीएसके

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १५ ■ अंक २ ■ शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

व्यवसायवृद्धीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करा- जिल्हाधिकारी वान्मथी सी.

शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांशी जिल्हाधिकाऱ्यांचा 'राउंड टेबल संवाद'



वर्धा जनमाध्यम : बदलत्या व्यावसायिक वातावरणाशी जुळवून घेत स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उद्योजकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करावा. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून व्यवसायाची कार्यक्षमता वाढविण्यासोबतच बाजारपेठेतील पोहोच आणि ग्राहकांशी संवाद अधिक व्यापक करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वर्धा आणि भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करण्यात आलेल्या इनक्यूबेशन कम बिझनेस फॅसिलिटेशन सेंटरच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयात विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांसोबत 'राउंड टेबल संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त डॉ. सुधाकर झळके, जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त सुनील हजारे, इनक्यूबेशन कम बिझनेस फॅसिलिटेशन सेंटरचे केंद्र समन्वयक रुपेश रामगडे तसेच उद्योजक व स्टार्टअप प्रतिनिधी उपस्थित होते.

शासकीय योजनांच्या माध्यमातून लाभ घेऊन उद्योग-व्यवसाय उभारणाऱ्या उद्योजकांच्या अनुभवातून इतरांना प्रेरणा मिळण्यासोबतच त्यांच्या व्यवसायवृद्धीतील अडचणी समजून घेणे महत्त्वाचे आहे. जिल्ह्यातील उद्योजकता आणि स्टार्टअप परिसंस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासन उद्योजकांच्या पाठीशी असून, व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी सांगितले. या कार्यक्रमात विविध शासकीय योजनांचा लाभ घेतलेल्या १० लाभार्थ्यांनी सहभाग नोंदविला. लाभार्थ्यांनी संबंधित योजनांमधून मिळालेल्या आर्थिक व इतर सहाय्याची माहिती देत, त्याचा व्यवसायाच्या उभारणीसाठी आणि विस्तारासाठी कसा उपयोग झाला, याबाबत अनुभव कथन केले. तसेच व्यवसाय करताना आलेल्या अडचणी, आव्हाने आणि त्यावर केलेल्या उपाययोजनांबाबतही त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी उद्योजकांच्या व्यवसायवृद्धीच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी उपस्थित लाभार्थी, उद्योजक आणि स्टार्टअप प्रतिनिधींशी संवाद साधला. शासकीय योजनांचा लाभ घेतलेल्या उद्योजकांचे अनुभव जाणून घेणे, त्यांच्या व्यवसायवृद्धीतील अडचणी समजून घेणे आणि जिल्ह्यातील उद्योजकता व स्टार्टअप परिसंस्था अधिक सक्षम करणे, या उद्देशाने या संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी इनक्यूबेशन कम बिझनेस फॅसिलिटेशन सेंटरच्या माध्यमातून आयोजित स्पर्धेतील विजेत्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यामध्ये प्रथम पारितोषिक एकांश वैद्य आणि चमू, संदिपानी शाळा, वर्धा यांच्या 'जागो गॉगल' या संकल्पनेस मिळाले. द्वितीय पारितोषिक युवराज कुहीकर आणि चमू, बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, वर्धा यांच्या 'डेक्स्ट्रा' या संकल्पनेस, तर तृतीय पारितोषिक सुरभी पटेल, बजाज सायन्स महाविद्यालय, वर्धा यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेस प्रदान करण्यात आले.

प्रेमप्रकरणातून तरुणीवर धारदार शस्त्राने वार; युवकानेही प्राशन केले विष

आष्टीतील इंदिरानगर परिसरात थरार; दोघांची प्रकृती चिंताजनक, अमरावतीत उपचार सुरू





आष्टी शहीद । जनमाध्यम : आष्टी शहरातील इंदिरानगर झोपडपट्टी परिसरात प्रेमप्रकरणातून एका २५ वर्षीय तरुणीवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची खळबळजनक घटना गुरुवारी (२६ नोव्हेंबर) दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेनंतर संबंधित २२ वर्षीय युवकानेही विषारी औषध प्राशन केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत दोघेही गंभीर जखमी झाले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही अमरावती येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अजय राऊत (वय २२) आणि २५ वर्षीय युवती हे इंदिरानगर परिसरात शेजारी राहतात. त्यांच्यात प्रेमसंबंध असल्याची माहिती आहे. गुरुवारी दुपारी अजयच्या घरी कोणी नसताना युवती त्याच्या घरी गेली होती. यावेळी घराच्या कंपाउंड गेटला कुलूप लावलेले होते. काही वेळाने घरातून आरडाओरड ऐकू आल्याने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

घरात युवती रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. 'मला वाचवा' अशी आर्त हाक ती देत होती. तिच्या डोक्यावर आणि हातावर धारदार शस्त्राने वार केल्याचे दिसून आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून एका महिलेने गेटवरून उडी मारत आत प्रवेश केला आणि जखमी युवतीला बाहेर काढले. दरम्यान, अजयने विषारी औषध प्राशन केल्याचे तसेच स्वतःच्या हातावरही वार केल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलीस ठाण्याचे ठाणेदार देविदास गजरे, पोलीस उपनिरीक्षक हर्षल नगरकर आणि पोलीस कर्मचारी प्रवीण सदावर्ते, सचिन सोनोने व संदीप शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यापूर्वीच नागरिकांनी दोघांनाही आष्टी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. तेथील प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्याने दोघांना अमरावती येथे हलविण्यात आले.

या घटनेमुळे इंदिरानगर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. हा प्रकार प्रेमसंबंधातून घडला की त्यामागे अन्य काही कारण आहे, याचा उलगडा अद्याप झालेला नाही. आष्टी पोलिसांनी घटनेची नोंद घेत तपास सुरू केला आहे.

बाबासाहेबांच्या ऐतिहासिक स्मृतींना न्याय कधी मिळणार

सेवाग्राममध्ये भव्य स्मारक उभारण्याची आंबेडकरी अनुयायांची मागणी



वर्धा जनमाध्यम : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी देशाला सामाजिक समतेचा मार्ग दाखविला. मात्र, याच महामानवाच्या ऐतिहासिक सेवाग्राम भेटीच्या स्मृती जतन करण्यासाठी आजही भव्य स्मारक उभारले गेले नाही. ही बाब आंबेडकरी अनुयायांच्या मनाला वेदना देणारी असून, आता या ऐतिहासिक वारशाला सन्मान मिळवून देण्यासाठी निर्णायक लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला आहे. सेवाग्राम येथे बाबासाहेबांचे भव्य स्मारक उभारून त्याला 'ब' प्रवर्गाचा दर्जा द्यावा, या मागणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती, प्रेरणा व पर्यटनस्थळ निर्माण समितीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. मागण्यांवर ६ डिसेंबरपर्यंत ठोस निर्णय न झाल्यास वर्ध्यात उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

१ मे १९३६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सेवाग्राम येथे महात्मा गांधी यांची भेट घेतली होती. या ऐतिहासिक भेटीदरम्यान त्यांनी परिसरातील दलित वस्तीत जाऊन समाजबांधवांशी संवाद साधला होता. सामाजिक समता, स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठेचा संदेश देणाऱ्या या भेटीला इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र, या ऐतिहासिक घटनेच्या स्मृती जतन करण्यासाठी सेवाग्राममध्ये स्मारक नसल्याने समितीने नाराजी व्यक्त केली आहे.

स्मारकासाठी पाठपुरावा, मात्र प्रतिसाद नाही

या मागणीसंदर्भात यापूर्वी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर आणि खासदार अमर काळे यांनाही निवेदन देण्यात आले होते. स्मारकाच्या उभारणीसाठी तातडीने कार्यवाही करण्याची विनंती करूनही अद्याप कोणताही ठोस प्रतिसाद मिळाला नसल्याचे समितीने म्हटले आहे. त्यामुळे पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

सेवाग्राम येथे भव्य स्मारक उभारून त्याला शासनाच्या निकषांनुसार 'ब' प्रवर्गाचा दर्जा द्यावा, आवश्यक निधी आणि प्रशासकीय मान्यता द्यावी, स्मारक परिसरात ऐतिहासिक माहिती केंद्र, छायाचित्र प्रदर्शन, माहिती फलक आणि पर्यटकांसाठी सुविधा निर्माण कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. या ऐतिहासिक स्थळाचा पर्यटन नकाशावर समावेश करून देशभरातील विद्यार्थी, संशोधक आणि आंबेडकरी अनुयायांसाठी ते प्रेरणास्थळ म्हणून विकसित करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

गावठी दारूच्या हातभट्टीवाल्याला एमपीडीएचा दणका

कालूसिंग भादाची अकोला कारागृहात रवानगी; वर्षभर स्थानबद्धतेचे आदेश



वर्धा जनमाध्यम : अवैध गावठी मोहाची दारू तयार करून तिची विक्री करणाऱ्या आणि परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या कालूसिंग ठाकूरसिंग भादा (वय ४६, रा. सिखबेडा, सावंगी मेघे) याच्याविरुद्ध पोलिसांनी एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वान्मथी सी. यांनी त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले असून, त्याची अकोला जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

कालूसिंग भादा याच्याविरुद्ध सावंगी मेघे पोलीस ठाण्यात गावठी मोहाची दारू तयार करणे आणि तिची अवैध विक्री करण्यासंदर्भात विविध गुन्हे दाखल आहेत. तो कच्च्या मोहाच्या रसायनापासून हातभट्टीची दारू तयार करत होता. दारूची नशा वाढविण्यासाठी त्यात शरीरास हानिकारक पदार्थांचा वापर केला जात असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. अशा अशुद्ध दारूच्या सेवनामुळे मानवी आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता होती.

सिखबेडा आणि परिसरात त्याने दहशत निर्माण केली होती. त्याच्या भीतीमुळे अनेक पीडित नागरिक तक्रार देण्यासाठीही पुढे येत नव्हते. त्याच्या कारवायांमुळे सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होत होती. पोलिसांनी यापूर्वीही त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाया केल्या; मात्र त्याने त्यांना न जुमानता गुन्हेगारी कारवाया सुरूच ठेवल्या.

या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांनी एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्यामार्फत जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्याकडे सादर केला होता. त्यानुसार २५ नोव्हेंबर २०२६ रोजी एक वर्षासाठी स्थानबद्धतेचे आदेश जारी करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद गिरी व सावंगी मेघे पोलिसांच्या पथकाने केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानेही या कारवाईत सहभाग घेतला.

सात एकर शेती, डोक्यावर कर्जाचा डोंगर अखेर शेतकऱ्याने संपविले जीवन



वर्धा जनमाध्यम : नापिकी, पिकांचे नुकसान आणि डोक्यावरील कर्जाचा वाढता भार... शेतीतून उत्पन्न मिळत नसल्याने आर्थिक संकट अधिकच गडद झाले. कर्जाची परतफेड कशी करावी, या चिंतेने ग्रासलेल्या ५३ वर्षीय शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलले. विषारी द्रव्य प्राशन केल्याने उपचारादरम्यान गुरुवारी (२६ नोव्हेंबर) सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. लक्ष्मण ज्ञानेश्वर उगले असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, वायगाव (निपाणी) येथे ही घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, लक्ष्मण उगले यांची जामनाळा परिसरात सात एकर शेती आहे. मात्र, सातत्याने नापिकी आणि पिकांचे नुकसान होत असल्याने शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते. परिणामी, त्यांची आर्थिक परिस्थिती खालावत गेली. त्यातच बँकेचे आणि खासगी कर्ज डोक्यावर असल्याने कर्जफेडीचा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला होता. आर्थिक विवंचनेतून त्यांनी २४ नोव्हेंबरच्या रात्री राहत्या घरी विषारी द्रव्य प्राशन केले. हा प्रकार लक्षात येताच कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, मृत्यूशी सुरू असलेली त्यांची झुंज अखेर अपयशी ठरली. गुरुवारी सकाळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद देवळी पोलिसांनी घेतली आहे.

खिशासाठी नाही, संकटग्रस्तांच्या मदतीसाठी: नगरसेवक चावरे यांचे वर्षभराचे मानधन मुख्यमंत्री निधीला



वर्धा । जनमाध्यम : लोकप्रतिनिधी म्हटले की पद, प्रतिष्ठा आणि मानधनाची चर्चा होते. मात्र, याच मानधनाचा वैयक्तिक लाभ न घेता ते संकटग्रस्तांच्या मदतीसाठी वापरले जावे, अशी भूमिका वर्धा नगर परिषदेचे युवा नगरसेवक डॉ. सुनील चरणसिंग चावरे यांनी घेतली आहे. सन २०२६ या संपूर्ण वर्षातील नगरसेवक म्हणून मिळणारे मानधन आणि भत्ते मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्याची मागणी त्यांनी केली आहे. यासंदर्भात बुधवारी (२५ नोव्हेंबर) नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले.

राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती, नैसर्गिक संकटे आणि आर्थिक अडचणींमुळे अनेक सर्वसामान्य कुटुंबे संकटाचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींनी केवळ सभागृहात जनतेचे प्रश्न मांडण्यापुरते मर्यादित न राहता, स्वतःच्या स्तरावरही सामाजिक योगदान द्यावे, या भावनेतून डॉ. चावरे यांनी हा निर्णय घेतल्याचे निवेदनातून स्पष्ट होते.

रामनगर पोलीस ठाण्या शेजारी अवैध सावकारीचा बिंगफोड : वंजारी पिता-पुत्राच्या घरावर छापा

जिल्हा उपनिबंधकांची धडक कारवाई; सातबारा, विक्रीपत्रे, धनादेशांसह १४० प्रकारची कागदपत्रे जप्त

वर्धा जनमाध्यम : अवैध सावकारीच्या माध्यमातून सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारींची दखल घेत जिल्हा उपनिबंधकांच्या पथकाने गुरुवारी रामनगर परिसरात धडक कारवाई केली. रामनगर पोलिस ठाण्याच्या शेजारी राहणारे वामन वंजारी आणि त्यांचा मुलगा राकेश वंजारी यांच्या निवासस्थानी अचानक छापा टाकण्यात आला. या कारवाईत जमिनीचे सातबारा उतारे, विक्रीपत्रे, धनादेश अशा तब्बल १४० प्रकारच्या कागदपत्रांचा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. वामन वंजारी आणि राकेश वंजारी हे अवैध सावकारी करीत असल्याची तक्रार जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला प्राप्त झाली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गुरुवारी सकाळी त्यांच्या निवासस्थानी छापा टाकला. घरातील साहित्याची आणि उपलब्ध कागदपत्रांची कसून तपासणी करण्यात आली.

या तपासणीत जमिनीशी संबंधित सातबारा उतारे, विक्रीपत्रे, धनादेश यांसह एकूण १४० प्रकारची कागदपत्रे अधिकाऱ्यांच्या हाती लागली. संशयास्पद सावकारी व्यवहारांच्या अनुषंगाने ही सर्व कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. या कागदपत्रांच्या आधारे अवैध सावकारीच्या व्यवहारांची व्याप्ती, आर्थिक उलाढाल आणि संबंधित व्यवहारांची साखळी तपासली जाणार आहे.

जप्त कागदपत्रांची छाननी करून या प्रकरणातील पुढील कारवाई निश्चित केली जाणार असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे यांनी दिली. दरम्यान, अवैध सावकारीविरोधातील या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध आर्थिक व्यवहार करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

अवैध सावकारीविरोधात तक्रारीचे आवाहन

जिल्ह्यात कुठेही अवैध सावकारी सुरू असल्यास नागरिकांनी पुढे येऊन जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे तक्रार करावी. तक्रारदाराचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल. अवैध सावकारी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे यांनी केले आहे.

रोहीच्या कळपाने शेतच फस्त केले

तूर-कपाशीची नासधूस; शेतकऱ्याच्या स्वप्नांवर पाणी



आष्टी शहीद जनमाध्यम : एकीकडे निसर्गाची अवकृपा आणि दुसरीकडे वन्यप्राण्यांचा उपद्रव, अशा दुहेरी संकटात शेतकरी भरडला जात आहे. आष्टी तालुक्यातील मुबारकपूर शिवारात रोहीच्या कळपाने अक्षरशः धुमाकूळ घालत तूर आणि कपाशी पिकाची मोठ्या प्रमाणात नासधूस केली. २४ नोव्हेंबरच्या रात्री घडलेल्या या प्रकारात शेतकरी नंदाराम रामकिसन राठोड यांच्या ऐन बहरात आलेल्या तुरीच्या पिकाचे मोठे नुकसान झाले. वर्षभर घाम गाळून आणि खाजगी कर्ज काढून उभे केलेले पीक वन्यप्राण्यांनी फस्त केल्याने शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळले आहे.

मुबारकपूर येथील सर्वे क्रमांक ४० मध्ये नंदाराम राठोड यांची शेती आहे. शेती हाच त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधार आहे. यंदा पीक चांगले येईल, या आशेने त्यांनी खत, बियाणे, डवरणी आणि फवारणीसाठी मोठा खर्च केला. मात्र, २४ नोव्हेंबरच्या रात्री रोहीच्या कळपाने शेतात प्रवेश केला आणि तूर व कपाशी पिकाची मोठ्या प्रमाणात नासधूस केली. विशेष म्हणजे, काढणीच्या आशेने जपलेले तुरीचे पीक डोळ्यांदेखत उद्ध्वस्त झाल्याने त्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.

आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता वन्यप्राण्यांच्या उपद्रवाचे नवे संकट उभे राहिले आहे. पिकांच्या संरक्षणासाठी रात्रंदिवस जागता पहारा देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली असून वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे शेती करणेही जिकिरीचे बनले आहे.

या घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने शेताची पाहणी करून नुकसानीचा पंचनामा करावा आणि शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नंदाराम राठोड यांनी केली आहे.

मुबारकपूर शिवारात वन्यप्राण्यांचा हैदोस

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा एल्गार! महाविद्यालयांचे कामकाज ठप्प

जुन्या पेन्शनसह रिक्त पदांच्या भरतीसाठी कामबंद आंदोलन

मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा



वर्धा जनमाध्यम : वर्षानुवर्षे मागण्या प्रलंबित, शासनाकडून निर्णयाची प्रतीक्षा आणि कर्मचाऱ्यांच्या पदरी केवळ आश्वासने! अखेर शासनाच्या उदासीनतेविरोधात जिल्ह्यातील महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुरुवारी कामबंद आंदोलनाचे हत्यार उपसले. महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालय कर्मचारी सेवक कृती समितीच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनामुळे जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांचे प्रशासकीय कामकाज प्रभावित झाले.

सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावा, २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, रिक्त पदांची तातडीने भरती करावी आणि पाच दिवसांचा कार्यसप्ताह लागू करावा, अशा प्रमुख मागण्या कर्मचाऱ्यांनी लावून धरल्या आहेत. याशिवाय प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे तसेच गोंडवाना विद्यापीठासाठी स्वतंत्र सहसंचालक कार्यालय सुरू करण्याची मागणीही करण्यात आली.

या आंदोलनात यशवंत महाविद्यालय सेलू, श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय वडनेर, वर्ध्यातील लोक महाविद्यालय, जे. बी. सायन्स कॉलेज, गो. से. वाणिज्य महाविद्यालय, न्यू आर्ट्स कॉलेज यांसह जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आश्वासनांचा पाढा नको, आता निर्णय हवा! अशी भूमिका घेत कर्मचाऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधले. मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही कृती समितीने दिला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

आवाज दाबाल, तर आणखी बुलंद होईल!

अभिनेते प्रकाश राज यांचा नागपुरातून सरकारला इशारा

नागपूर/प्रतिनिधी- देशभरात संविधान वाचविण्याचा आवाज बुलंद होत असताना, संविधानाने दिलेले अधिकार टिकविण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांचे आणि युवकांचे आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असला, तरी त्यांचा आवाज अधिक बुलंद होत राहील, असे मत अभिनेते प्रकाश राज यांनी व्यक्त केले. संविधान दिनानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यात 'सेव्ह कॉन्स्टिट्यूशन'ची हाक दिली जात आहे. सध्याच्या परिस्थितीत संविधानाने नागरिकांना दिलेले हक्क आणि अधिकार सुरक्षित ठेवण्याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन संवाद साधण्याची आवश्यकता आहे. देशातील सद्यस्थिती पाहता संविधानाचे संरक्षण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रकाश राज म्हणाले. ते गुरुवारी नागपूर विमानतळावर पत्रकारांशी बोलत होते. संविधान बचाव कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते नागपुरात आले आहेत.



विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न- देशात विविध विषयांवरून नागरिक आवाज उठवत आहेत. विशेषतः विद्यार्थी आणि युवकांकडून व्यक्त होणारी मते दडपण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, आवाज जितका दाबण्याचा प्रयत्न केला जाईल, तितकाच तो अधिक तीव्रतेने उमटेल. व्यक्तिस्वातंत्र्याचा अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करण्याची गरज आहे. त्यांच्या प्रश्नांना विरोध करण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विमानतळावरील घटनांवरून चिंता- देशाबाहेर जाणाऱ्या नागरिकांनाही रोखले जात असल्याच्या घटनांवर प्रकाश राज यांनी चिंता व्यक्त केली. विमानात प्रवेश केल्यानंतरही काहींना ताब्यात घेतले जात असल्याचे त्यांनी सांगितले. ध्रुव राठी यांच्याशी संबंधित घटनेचा उल्लेख करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. तिरंगा घेऊन गेलेल्या व्यक्तींनाही तुरुंगात टाकले जात असल्याचा दावा त्यांनी केला. नागरिकांच्या स्वातंत्र्यावर अशा प्रकारे मर्यादा आणल्या जात असतील, तर त्याबाबत समाजाने गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली असल्याचे ते म्हणाले.

संविधान चौकात 'संविधान बचाओ'चा जागर- दरम्यान, संविधान दिनानिमित्त काँकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) वतीने गुरुवारी संविधान चौकात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजित दीपके आणि सहसंयोजक आशुतोष रांका यांच्या उपस्थितीत दुपारी ४ ते रात्री ८ या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. 'संविधान बचाओ' या विषयावर चर्चा आणि विचारमंथन करण्यात येणार आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातील कार्यक्रमासाठी लंडनला जाणारे सौरभ दास यांना दिल्ली विमानतळावर रोखण्यात आल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



एकनाथ शिंदे यांनी केली चवदार तळ्याच्या विकासकामांची पाहणी

रायगड-अलिबाग दि. २६ (जि.मा.का.) महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी केली. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केले. यावेळी पालकमंत्री भरत गोगावले, खासदार ज्योती वाघमारे, जिल्हा परिषदेचे सभापती चंद्रकांत कळंबे, नगराध्यक्ष सुनील कविस्कर, विकास गोगावले, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आँचल दलाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. संविधानातील उद्देशिकेचे शपथपूर्वक सामूहिक वाचनही यावेळी करण्यात आले.

राज्यात ३५० अद्यावत रुग्णवाहिकांचे लवकरच वितरण

प्रत्येक आमदारांच्या मतदारसंघात रुग्णवाहिका

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील आरोग्य सेवांना अधिक सक्षम करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला असून आपत्कालीन रुग्णसेवेला नवे बळ देण्यासाठी राज्यातील आरोग्य विभागाच्या ताफ्यात लवकरच ३५० अद्ययावत रुग्णवाहिकांची भर पडणार आहे. हिवाळी अधिवेशनापूर्वी प्रत्येक आमदाराच्या मतदारसंघात या रुग्णवाहिकांचे वितरण करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. मंत्रालयात आज रुग्णवाहिका लोकार्पण सद्यस्थितीबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मंत्री आबिटकर बोलत होते. या बैठकीला आरोग्य आयुक्त डॉ. संजय काटकर, तसेच संबंधित एजंसीचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी आणि आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी शासन सर्व प्रकारे प्रयत्न करीत आहे. या वाहनांचे ब्रँडिंग आठ ते दहा दिवसांत पूर्ण करावे. तसेच वाहन नोंदणीची प्रक्रिया लवकर पूर्ण करावी. लोकार्पणानंतर स्थानिक आमदारांच्या उपस्थितीत संबंधित मतदारसंघांमध्ये या वाहनांचे वितरण करण्यात येणार आहे. वाहनामध्ये १२०० प्रशिक्षित डॉक्टर, वाहनचालक, सहायक आणि आधुनिक लाईफ सपोर्ट सिस्टिमसह या रुग्णवाहिका दाखल होतील, असेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले. रुग्णवाहिकांच्या सद्यस्थितीचा आढावा घेताना नवीन वाहनांची उपलब्धता, चालकांची उपलब्धता आणि त्यांचे व्यवस्थापन हा महत्त्वाचा मुद्दा असल्याचे मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले. १०२ रुग्णवाहिकांचे पेट्रोल कार्ड वितरणाचा प्रश्न, वाहनचालक इत्यादी प्रश्न निकाली काढून त्या रुग्णवाहिकांना गती द्यावी. तसेच कामकाजात त्रुटी आढळलेल्या चालकांविरुद्ध कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिलेत. नवीन रुग्णवाहिकांचे वितरण, आपत्कालीन सेवांचा समन्वय आणि चालक व्यवस्थापन या माध्यमातून राज्यातील रुग्णवाहिका सेवा अधिक सक्षम करण्यावर शासनाचा भर असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातील रुग्णवाहिका सेवा अधिक सुसूत्र आणि प्रभावी करण्यासाठी १०२, १०८ आणि ११२ या आपत्कालीन सेवांसह खासगी रुग्णवाहिकांचा समन्वय साधणारे एकात्मिक कॉल सेंटर उभारण्याचा प्रस्ताव परिवहन आयुक्तांकडे सादर करावा. या व्यवस्थेमुळे विविध सेवांमधील रुग्णवाहिकांची उपलब्धता एकाच ठिकाणी समन्वित करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी आवश्यक निर्णय घेणार

मुंबई/प्रतिनिधी- पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने विविध निर्णय घेतले आहेत. भविष्यातही नियम व कायद्याच्या चौकटीत पोलिसांचा स्वतंत्रपणे विचार करून आवश्यक निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेने आयोजित केलेल्या २६/११ दहशतवादी हल्ल्यातील तसेच पहलगाम येथील शहीद जवान आणि निरपराध नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी पोलीस कुटुंबांसाठी संघटनेने उपलब्ध करून दिलेल्या सुसज्ज रुग्णवाहिकेचे लोकार्पण केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २६ नोव्हेंबर हा संविधान दिन असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला अर्पण केलेल्या संविधानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. त्याचबरोबर मुंबईवरील २६/११ च्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, जवान आणि नागरिकांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचाही हा दिवस आहे. २६/११ चा हल्ला हा केवळ ताज हॉटेल, ट्रायडेंट किंवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरील हल्ला नव्हता, तर तो भारताच्या सार्वभौमत्वावर आणि संविधानावर केलेला हल्ला होता. पोलीस आणि सुरक्षा दलातील जवानांनी अतुलनीय शौर्याने दहशतवाद्यांचा मुकाबला केला. शहीद तुकाराम ओंबळे यांनी प्राणांची पर्वा न करता कसाबला जिवंत पकडल्यामुळे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा चेहरा जगासमोर आला, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. 'मुंबई तेव्हाही थांबली नाही आणि कधीही थांबणार नाही. कोणताही दहशतवादी मुंबई, महाराष्ट्र आणि भारताचा निर्धार संपवू शकत नाही. दहशतवादाविरोधात संपूर्ण देश एकजुटीने उभा आहे,' असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पहलगाममधील हल्ला मानवतेला काळिमा फासणारा होता. भारताच्या जवानांवर किंवा नागरिकांवर होणारा कोणताही हल्ला सहन केला जाणार नाही,



ॲग्रीस्टॅकमुळे राज्यातील १ कोटी ४४ लाख शेतकऱ्यांना डिजिटल ओळख

देशात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर- कृषिमंत्री

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ जलद, पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने मिळावा, तसेच कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा विस्तार व्हावा, या उद्देशाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाराष्ट्रात ॲग्रीस्टॅक योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत राज्यातील १ कोटी ४४ लाख शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी असून, देशात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. उर्वरित शेतकऱ्यांनीही आपली नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.ॲग्रीस्टॅक हे कृषी क्षेत्रातील माहिती आणि डिजिटल सेवांचा प्रभावी वापर करून शेतकऱ्यांपर्यंत विविध शासकीय योजनांचे लाभ पोहोचविण्यासाठी विकसित करण्यात आलेले डिजिटल व्यासपीठ आहे. या माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्याला स्वतंत्र डिजिटल ओळख अर्थात फार्मर आयडी उपलब्ध करून देण्यात येत आहे. दि. १८ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यात या योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.सन २०२१ च्या कृषी गणनेनुसार राज्यात १.७१ कोटी खातेदार शेतकरी आहेत. त्यापैकी आतापर्यंत १ कोटी ४४ लाख शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणी पूर्ण झाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या योजनेमुळे कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळविणे अधिक सुलभ होणार असून, कृषी पायाभूत सुविधा निधी तसेच शेतीच्या विकासासाठी उपलब्ध होणाऱ्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेण्यासही मदत होणार आहे. याशिवाय पीक विमा, आपत्ती व्यवस्थापनांतर्गत नुकसानभरपाई, शेतकऱ्यांचे सर्वेक्षण आणि कृषी व संलग्न विभागांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्वपूर्ण ठरत आहे.

ॲग्रीस्टॅकमुळे योजनांचा लाभ वितरण अधिक सुलभ- ॲग्रीस्टॅकमुळे शेतकरी आणि त्यांच्या शेतजमिनींची आधारसंलग्न माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत आहे. त्यामुळे शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांची पडताळणी करणे अधिक सोपे होऊन लाभ वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आलेली आहे. तसेच वारंवार कागदपत्रांची पडताळणी करण्याची आवश्यकता कमी झालेली आहे. शेतकऱ्यांना वारंवार शेतजमिनीची मालकी सिध्द करावी लागत नसून शेतीच्या योजना गतीमानतेने व प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना कृषीविषयक सल्ले, विविध संस्थांशी संपर्क आणि नाविन्यपूर्ण कृषी कार्यक्रमांचा लाभ मिळवून देण्यासाठीही या डिजिटल व्यासपीठाचा उपयोग होत आहे. दि. २१ जानेवारी २०२५ पासून नागरी सुविधा केंद्रांमार्फत (सीएससी) फार्मर रजिस्ट्रीची नोंदणी प्रक्रिया करण्यात येते. कृषिविषयक शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी दि. १५ एप्रिल २०२५ पासून फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या नुकत्याच वितरित झालेल्या २४ व्या हप्त्याच्या आकडेवारीनुसार, राज्यातील ८५.५८ लाख लाभार्थी शेतकऱ्यांपैकी ८४.६० लाख शेतकऱ्यांकडे ॲग्रीस्टॅक आयडी उपलब्ध आहे.

गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि स्वच्छतेचे अभियान लोकचळवळ बनवा -उपमुख्यमंत्री

रायगड-अलिबाग, दि. २६ (जि.मा.का.):- छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले गड-किल्ले हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा आणि आपली अमूल्य संपत्ती आहे. या वारशाचे जतन, संवर्धन, स्वच्छता आणि पावित्र्य राखणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. गड-किल्ल्यांचे संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी सुरू करण्यात आलेले अभियान केवळ शासकीय उपक्रम न राहता त्याचे व्यापक लोकचळवळीत रूपांतर व्हावे, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सामाजिक न्याय विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग आणि पर्यटन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त हिरकणीवाडी येथे आयोजित 'गडांचा मान, संविधानाचा सन्मान' या विशेष सोहळ्यात उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी पालकमंत्री भरत गोगावले, खासदार ज्योतीताई वाघमारे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, जिल्हा परिषदेचे सभापती चंद्रकांत कळंबे, विकास गोगावले, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.



गड-किल्ल्यांचे जतन आणि संवर्धन काळाची गरज- उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले गड-किल्ले ही आपली ऐतिहासिक स्मृती, ऐश्वर्य आणि वारसा आहे. या वास्तूंचे जतन करताना त्यांचे पावित्र्य आणि मांगल्य राखणे आवश्यक आहे. गडांवर येणाऱ्या दुर्गप्रेमींना आवश्यक सुविधा मिळाल्या पाहिजेत. गड-किल्ले स्वच्छ, प्रदूषणमुक्त आणि प्लास्टिकमुक्त असावेत. तेथे पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था, वृक्षारोपण आणि सौरदिव्यांची सुविधा असावी या भूमिकेतून हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने गडकिल्ले स्वच्छता व संवर्धन अभियान सुरू करण्यात आले आहे. या उपक्रमाबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांचे अभिनंदन करताना त्यांनी गड-किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले.महाराष्ट्रातील ११ गड-किल्ल्यांचा युनेस्कोच्या यादीत समावेश झाल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सातासमुद्रापार पोहोचला आहे. ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची आणि स्वाभिमानाची बाब आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेला केंद्रस्थानी ठेवून लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श निर्माण केला. सर्वसामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. गडांवरील पाण्याची व्यवस्था, धान्याची कोठारे, बाजारपेठा आणि अष्टप्रधान मंडळाची व्यवस्था यांतून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. साडेचारशे वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या गड-किल्ल्यांचे स्थापत्य आणि अभियांत्रिकी आजही आश्चर्यचकित करणारे असल्याचे ते म्हणाले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून देशातील शोषित, दलित, पीडित आणि वंचित घटकांना न्याय व समान संधी मिळवून देण्याची व्यवस्था निर्माण केली. संविधानामुळे सर्वसामान्य नागरिकालाही देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली आहे. संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये जपणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान हे देशासाठी अत्यंत मोलाचे आहेत.

न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलच्या बॉल बॅडमिंटन संघाचे जिल्हास्तरीय स्पर्धेत घवघवीत यश



अमरावती /प्रतिनिधी- बालाजी नगर, मोती नगर वार्ड स्थित न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी बॉल बॅडमिंटन स्पर्धेत विशेष कामगिरी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि विभागीय स्तरावरील पुढील क्रीडा स्पर्धेकरिता आपला प्रवेश निश्चित केला. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तसेच अमरावती महानगर बॉल बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धा सन २०२६-२७ मध्ये न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेमध्ये शाळेच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले, तर १९ वर्षाखालील मुलांच्या संघाने आपल्या कौशल्यपूर्ण खेळाच्या जोरावर उपविजेतेपद प्राप्त केले. तसेच १४ वर्षाखालील मुलांच्या संघानेही जिद्द, चिकाटी आणि सांघिक भावनेचे दर्शन घडवत तृतीय क्रमांक मिळविला. खेळाडूंनी केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. या यशामागे खेळाडूंची मेहनत, नियमित सराव, शिस्त आणि क्रीडा शिक्षक सागर ठाकूर यांचे मोलाचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांवर घेतलेली मेहनत या सर्वांचे योगदान आहे. या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थाध्यक्ष अनिल आसलकर, शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री अनिल आसलकर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. तसेच खेळाडूंना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल क्रीडा भवितव्याबद्दल विश्वास व्यक्त करण्यात आला.





जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

अस्वस्थ बांग्लादेश

बांग्लादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसिना यांनी बांग्लादेशात परतण्याची १६ डिसेंबर ही तारीख जाहीर करून जगभर खळबळ उडवून दिली आहे. त्यासाठी त्यांनी विशेष विमानाचीही मागणी केली आहे. त्यामुळे बांग्लादेशात तीव्र राजकीय अस्थिरता आणि हिंसाचार उसळला आहे. त्यावर पंतप्रधान तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांग्लादेश सरकारने त्यांना 'फरार गुन्हेगार' ठरवून केवळ प्रत्यार्पण करारांतर्गत हातकड्या घालूनच परत आणले जाईल, असा इशारा दिला आहे.शेख हसीना यांच्या पुनरागमनाच्या घोषणेनंतर आणि त्यांच्या 'अवामी लीग' या बंदी घातलेल्या पक्षावरील कारवाईविरोधात देशभरात तणाव वाढला. शेख हसीना यांचे जन्मगाव असलेल्या गोपालगंज जिल्ह्यासह देशभरातील अनेक भागांत अवामी लीगच्या समर्थकांनी रस्ते अडवून हिंसक निदर्शने केली आहेत. अनेक ठिकाणी वाहनांची जाळपोळ, कच्च्या बॉम्बचे स्फोट, पोलिस चौक्यांची तोडफोड आणि सत्ताधारी 'बांग्लादेश नॅशनलिस्ट पार्टी'च्या (बीएनपी) कार्यालयांवर हल्ले झाले आहेत. या हिंसाचारात काही जणांचा मृत्यू झाला असून, माजी अंतरिम सरकारचे प्रमुख मुहम्मद युनूस यांनी स्थापन केलेल्या ग्रामीण बँकेच्या अनेक शाखांवरही जाळपोळीचे हल्ले झाले आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तारिक रहमान सरकारने संवेदनशील जिल्ह्यांमध्ये 'बॉर्डर गार्ड बांगलादेश' च्या तुकड्या तैनात केल्या आहेत. आतापर्यंत शेकडो आंदोलक व अवामी लीगच्या नेत्यांना अटक केली आहे. तसेच, हसीना यांचा नवीन पासपोर्ट आणि राष्ट्रीय ओळखपत्राचा अर्ज सरकारने फेटाळून लावला आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसीना यांच्या राजीनाम्यानंतर जेन झीच्या आंदोलनावर स्वार होऊन बांग्लादेशात दोन वर्षांपूर्वी सत्तांतर झाले.त्यानंतर शेख हसीना यांना भारतात आश्रय घ्यावा लागला. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर बांग्लादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचे (बीएनपी) नेते तारिक रहमान पंतप्रधान बनले. दरम्यान, बांग्लादेशात हसीना यांच्यावर खटला चालवून त्यांना फाशीची शिक्षाही ठोठावण्यात आली. त्यानंतर बांग्लादेशचे सरकार हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी करत आहे. बांग्लादेशातील ६४ जिल्ह्यांपैकी किमान २८ जिल्ह्यांमध्ये हिसाचाराचे लोण पसरले आहे. तेथे जानेवारी ते सप्टेंबर २०२६ दरम्यान राजकीय हिंसाचाराच्या १,०१३ घटनांमध्ये किमान ७३ जणांचा मृत्यू झाला आहे. या व्यतिरिक्त मॉब लिंचिंगच्या घटनांमध्ये १८७ जण ठार झाले, असे अहवाल आहेत. बांग्लादेशचे परराष्ट्र राज्यमंत्री हुमायूं कबीर आणि आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाचे मुख्य अभियोक्ता मोहम्मद अमिनुल इस्लाम यांनी स्पष्ट केले आहे, की २०२४ च्या विद्यार्थी आंदोलनावरील कारवाईप्रकरणी हसीना यांना त्यांच्या अनुपस्थितीत फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्या देशात परतल्यास त्यांना विमानतळावरच तत्काळ अटक करून तुरुंगात टाकले जाईल आणि शिक्षेची अंमलबजावणी केली जाईल. बांग्लादेशी अभियोक्त्यांच्या मते हसीना यांनी शिक्षेविरुद्ध अपील करण्याची कायदेशीर मुदत गमावली आहे, त्यामुळे फाशी रोखण्यासाठी कोणताही कायदेशीर आधार उरलेला नाही.दुसरीकडे, हसीना यांनी हा खटला बेकायदा ठरवत न्यायालयात लढा देण्याची तयारी दर्शवली आहे, ज्यामुळे मोठा कायदेशीर संघर्ष उभा राहू शकतो. १६ डिसेंबर या राष्ट्रीय सणाच्या दिवशी हसीना परतल्यास अवामी लीगचे समर्थक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून सरकारशी थेट संघर्ष करण्याची शक्यता आहे. यामुळे पंतप्रधान तारिक रहमान यांच्या सरकारसमोर देशभरातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे मोठे आव्हान असणार आहे. बांग्लादेश सरकारने भारताकडे हसीना यांच्या प्रत्यार्पणाची औपचारिक मागणी केली आहे. हसीना स्वतःहून परत जाणार, की भारत सरकार कायदेशीर प्रक्रियेद्वारे त्यांचा ताबा देणार, यावरून नवी दिल्ली आणि ढाका यांच्यातील द्विपक्षीय संबंधांची मोठी कसोटी लागणार आहे.दरम्यान, बांग्लादेशाचा मुख्य कणा असलेला तयार कपडे उद्योग सध्या संकटात सापडला आहे. तयार कपड्यांचा उद्योग हा बांग्लादेशाच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत आहे. या क्षेत्रात सुमारे ४० लाख कामगार कार्यरत आहेत आणि देशाच्या निर्यात उत्पन्नातील ८० टक्क्यांहून अधिक वाटा या उद्योगाचा आहे. तेथे किमान वेतन १२,५०० टकावरून ३०,०००-३२,००० टका करण्याची कामगारांची मागणी आहे. बांग्लादेशच्या तयार कपडे उद्योगात एकूण सुमारे ४० लाख कामगार काम करतात. त्यापैकी नऊ लाख ८७ हजारांहून अधिक लोक रस्त्यावर उतरले आहेत. इतकी वेतनवाढ देणे शक्य नसल्याचे कारखानदारांचे म्हणणे आहे. बांग्लादेशातील अस्थिरतेचे भारतावर सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही परिणाम होत आहेत. बांग्लादेशातील कारखाने बंद पडल्यामुळे जागतिक बँड्सच्या ऑर्डर भारताकडे वळत आहेत. ताज्या आकडेवारीनुसार, भारताची कापड निर्यात सुमारे १६.१ टक्क्यांनी वाढली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारतानं बांग्लादेशला १०.९६ अब्ज डॉलरची निर्यात केली, तर बांग्लादेशातून १.७५ अब्ज डॉलरची आयात केली. बांग्लादेशातील कारखाने बंद राहिल्यास भारताकडून तिकडे जाणाऱ्या कापूस आणि सुताच्या निर्यातीवर तात्पुरता परिणाम होऊ शकतो. मुळात बंग्लादेशसारखा शेजारी अस्वस्थ असणे भारताच्या निश्चितच फायद्याचा नाही. भारताशी संबंध ताणले गेल्याचा फायदा घेत बांगलादेश सरकारने चीनसोबत पायाभूत सुविधा व संरक्षण क्षेत्रात, तर पाकिस्तानसोबत राजनैतिक व आर्थिक क्षेत्रात जवळीक वाढवली आहे. बांग्लादेशातील कायदा व सुव्यवस्था ढासळल्यास तेथील भारतविरोधी दहशतवादी गट पुन्हा सक्रिय होऊ शकतात, ज्याचा थेट धोका भारताच्या ईशान्येकडील राज्यांना आहे.



'क्वाड'च्या नव्या पर्वात

मनिला येथे पार पडलेल्या शिखर परिषदेत सागरी सुरक्षेबरोबरच आर्थिक सहकार्य, महत्त्वपूर्ण खनिजांची उपलब्धता, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पुरवठा साखळ्यांच्या बळकटीकरणावर देण्यात आलेला भर क्वाडच्या बदलत्या स्वरूपाची साक्ष देणारा आहे.

हिंद-प्रशांत क्षेत्रातील चीनच्या वाढत्या प्रभुत्वाच्या पार्श्वभूमीवर 'क्वाड'ची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढत आहे. मनिला येथे पार पडलेल्या शिखर परिषदेत सागरी सुरक्षेबरोबरच आर्थिक सहकार्य, महत्त्वपूर्ण खनिजांची उपलब्धता, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पुरवठा साखळ्यांच्या बळकटीकरणावर देण्यात आलेला भर क्वाडच्या बदलत्या स्वरूपाची साक्ष देणारा आहे. चीनशी थेट संघर्ष टाळून त्याच्या विस्तारवादी आणि आर्थिक दबावतंत्राला शह देण्याची रणनीती या परिषदेतून अधोरेखित झाली आहे.

शिखर परिषदेच्या निमित्ताने मनिला येथे आयोजित करण्यात आलेली 'क्वाड'ची सातवी शिखर परिषद या संघटनेच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि जपानच्या पंतप्रधान साने ताकाइची या बहुप्रतीक्षित बैठकीच्या निमित्ताने तब्बल दोन वर्षांहून अधिक काळानंतर एकत्र आले. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील ही पहिलीच क्वाड बैठक होती. यापूर्वी २०२५ मध्ये भारतात प्रस्तावित असलेली बैठक रद्द करण्यात आली होती. त्यानंतर निर्माण झालेली अनिश्चितता दूर करत हिंद-प्रशांत क्षेत्रातील चार प्रमुख लोकशाही देशांमधील सामरिक समन्वयाचे व्यासपीठ म्हणून क्वाडचे वाढते महत्त्व या बैठकीने पुन्हा अधोरेखित केले. सदस्य देशांमधील सामरिक समन्वयाचे रूपांतर प्रत्यक्ष सहकार्यात करण्यासाठी विविध घोषणांची अंमलबजावणी करण्याबाबत एकमत होणे, हे या शिखर परिषदेचे सर्वांत महत्त्वाचे फलित आहे.

मनिला शिखर परिषदेत अनेक नव्या उपक्रमांची घोषणा करण्यात आली. क्वाडच्या विस्तारत असलेल्या सामरिक आणि आर्थिक कार्यसूचीचे प्रतिबिंब या उपक्रमांमध्ये दिसते. २०२७ मध्ये भारताच्या यजमानपदाखाली मुंबईत पहिली 'क्वाड बिझनेस लीडर्स फोरम' परिषद आयोजित करण्यात येणार आहे. व्यापारी भागीदारी दृढ करणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि प्रादेशिक पुरवठा साखळ्या मजबूत करणे, हा या परिषदेचा उद्देश आहे. हिंद-प्रशांत क्षेत्रातील एक प्रमुख आर्थिक भागीदार म्हणून स्वतःचे स्थान अधिक बळकट करण्याची संधीही भारताला या व्यासपीठाच्या माध्यमातून मिळणार आहे.

हिंद-प्रशांत क्षेत्रातील सागरी निगराणीसाठी सहकार्य करण्याच्या उपक्रमामुळे सदस्य देशांमधील माहितीचे आदानप्रदान आणि सागरी हालचालींवरील देखरेख अधिक प्रभावी होणार आहे. मार्च २०२७ पासून चारही देशांच्या पी-८ आणि पी-३ सी या गस्ती विमानांचा संयुक्त सराव आयोजित करण्याचेही प्रस्तावित आहे. त्याशिवाय ८.५ कोटी डॉलरहून अधिक आर्थिक सहकार्यातून प्रस्तावित असलेल्या 'सुपर इंटेलिजन्स ॲक्सिलरेटर' उपक्रमाच्या माध्यमातून संपूर्ण क्षेत्रात विश्वासार्ह कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आणि तांत्रिक साहाय्याची उपलब्धता वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्याचे वाढते महत्त्व यातून अधोरेखित होते. प्रादेशिक दळणवळण व्यवस्था मजबूत करण्याबरोबरच सातत्याने वाढणाऱ्या डिजिटल धोक्यांचा सामना करण्यासाठी सुरक्षित सायबर क्षेत्र विकसित करण्याबाबतही या परिषदेत चर्चा झाली.

क्वाडच्या बैठकीत चीनचा थेट उल्लेख करण्यात आला नसला, तरी या शिखर परिषदेचा सामरिक संदर्भ अगदी स्पष्ट होता. आर्थिक दबावतंत्र, मनमानी पद्धतीने लादले जाणारे निर्यातीवरील निर्बंध आणि बळाचा अथवा दबावाचा वापर करून विद्यमान परिस्थितीत एकतर्फी बदल करण्याच्या प्रयत्नांबाबत चारही देशांच्या नेत्यांनी चिंता व्यक्त केली. त्याचबरोबर सागरी सुरक्षा, सक्षम पुरवठा साखळ्या आणि महत्त्वपूर्ण खनिजांच्या क्षेत्रातील सहकार्यावर भर दिला. चीनचा थेट उल्लेख टाळण्यामागेही एक विचारपूर्वक आखलेले धोरण आहे. चीनविरोधी आघाडी असा शिक्का बसू न देता चारही देशांना परस्परांमधील सामरिक सहकार्य अधिक दृढ करण्याची संधी त्यामुळे मिळते. स्वतःची सामरिक स्वायत्तता अबाधित राखून अन्य देशांबरोबरील सामरिक भागीदारी मजबूत करू इच्छिणाऱ्या भारताच्या दृष्टीने ही बाब विशेष महत्त्वाची आहे.

महत्त्वपूर्ण खनिजांची उपलब्धता आणि पुरवठा साखळ्यांच्या बळकटीकरणावर दिला जाणारा वाढता भर पाहता आर्थिक सुरक्षेचे प्रश्न पारंपरिक सुरक्षाविषयक आव्हानांशी कशाप्रकारे जोडले जात आहेत, हे लक्षात येते. सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादासह सर्व प्रकारच्या दहशतवादाचा स्पष्ट शब्दांत करण्यात आलेला निषेधही भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. असे असले, तरी विविध धोक्यांचे आकलन, आर्थिक प्राधान्यक्रम आणि चीनकडे पाहण्याचा दृष्टिकोन यांबाबत सदस्य देशांमध्ये अद्याप काही मतभेद आहेत. दक्षिण आणि पूर्व चीन समुद्रासंदर्भात वापरण्यात आलेल्या तुलनेने संदिग्ध भाषेतून त्याची प्रचिती येते. त्यामुळे क्वाडचे रूपांतर औपचारिक लष्करी आघाडीत होण्याची शक्यता फारच कमी आहे. वास्तविक, क्वाडची खरी ताकद त्याच्या लवचिक स्वरूपात आणि सामरिक सहकार्याच्या व्यापक चौकटीत विविध देशांच्या राष्ट्रीय हितसंबंधांचा समन्वय साधण्याच्या क्षमतेत आहे.

भारताच्या दृष्टीने मनिला शिखर परिषद सामरिक आश्वासकता निर्माण करणारी ठरली आहे. त्याचबरोबर क्वाडच्या भविष्यातील कार्यसूचीला आकार देण्याची संधीही भारताला मिळाली आहे. लवचिक स्वरूपाच्या संघटनेला भारताने दिलेले प्राधान्य या शिखर परिषदेच्या फलितांमध्ये दिसून येते. पहिल्या क्वाड उद्योग नेतृत्व परिषदेचे यजमानपद मिळाल्यामुळे उत्पादन क्षेत्र, महत्त्वपूर्ण खनिजे, तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळ्यांचे विविधीकरण या क्षेत्रांत भारताला व्यापक संधी उपलब्ध होतील. हिंदी महासागरातील भारताचे हितसंबंध लक्षात घेता सागरी निगराणीच्या क्षेत्रातील सहकार्य आणि समुद्राच्या तळाशी असलेल्या दळणवळणाच्या केबल्सचे जाळे विकसित करण्यालाही विशेष महत्त्व आहे. सागरी हालचालींवरील देखरेख आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांचे बळकटीकरण यांच्याशी या बाबींचा थेट संबंध आहे. मनिला शिखर परिषदेत ज्या मुद्द्यांवर एकमत झाले आहे, त्यांची अंमलबजावणी करण्यातच क्वाडची खरी कसोटी लागणार आहे. कारण, या घोषणांचे रूपांतर ठोस परिणामांमध्ये करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती, पुरेशी संसाधने आणि प्रादेशिक देशांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

एकूणच विचार करता क्वाडची पीछेहाट होत नाही आणि त्याची वाटचाल थांबलेलीही नाही. आर्थिक सुरक्षा, तंत्रज्ञानातील स्पर्धा आणि सागरी क्षेत्रातील स्थैर्य यांचा परस्परसंबंध अधिकाधिक वाढत असलेल्या बदलत्या जागतिक परिस्थितीशी ही संघटना स्वतःला जुळवून घेत आहे. भारतासाठी स्वतःची सामरिक स्वायत्तता कायम राखून आंतरराष्ट्रीय सामरिक भागीदारी अधिक दृढ करण्याची ही महत्त्वपूर्ण संधी आहे. भूराजकीय संदेश देण्यापुरते मर्यादित न राहता अधिक सुरक्षित, सक्षम आणि समृद्ध हिंद-प्रशांत क्षेत्राच्या निर्मितीत क्वाड किती योगदान देऊ शकतो, यावरच भविष्यातील या संघटनेचे महत्त्व अवलंबून असेल.

हर्ष व्ही. पंत

'लव्ह जिहाद'विरोधी कायदा कधी?

दोन दिवसांपासून सोशल मीडिया आणि विविध वृत्तवाहिन्यांवर उत्तर प्रदेशातील मेरठ येथील एका हॉटेलमध्ये घडलेला धक्कादायक व्हिडिओ प्रसारित होत आहे. मेरठ येथील सलमान नावाच्या मुसलमान तरुणाने एका हिंदु तरुणीला हॉटेलच्या खोलीत डांबून ठेवून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. तिने कशीबशी स्वतःची सुटका करून हॉटेलबाहेर पळ काढला. त्या वेळी सलमानने तिचा पाठलाग करून भररस्त्यात तिला पुन्हा मारहाण केली आणि पुन्हा जबरदस्तीने हॉटेलमध्ये घेऊन जात असल्याचे दृश्य समोर आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हे दोघे गेल्या अडीच वर्षांपासून एकमेकांना ओळखत होते आणि यापूर्वी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते; मात्र तरुणीच्या कुटुंबियांनी नुकतेच तिचे लग्न दुसरीकडे ठरवले होते. लग्न ठरल्यानंतर तिच्या मुस्लिम मित्राने तिला पळवून नेले.हिंदू मुलीच्या सुरक्षिततेचा प्रश्न आणखी किती दिवस दुर्लक्षित राहणार? अशा घटनांना आळा घालण्यासाठी सरकारने संपूर्ण देशात लव्ह जिहादविरोधी कायदा लागू करून त्याची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे.

प्रांजली ब्रम्हे

शेतीचे भविष्य कोणाच्या हातात?

भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न पाहत आहे. या प्रवासात उत्पादनवाढ पोषणसुरक्षा, ग्रामीण रोजगार, निर्यात, जैव-अर्थव्यवस्था आणि पर्यावरणीय शाश्वतता या सर्व क्षेत्रांत कृषी क्षेत्राची भूमिका निर्णायक असेल.



भारतीय शेतीसमोरील सर्वांत मोठे आव्हान आज केवळ उत्पादन वाढविण्याचे नाही, तर बदलत्या हवामानात उत्पादन टिकवून ठेवण्याचे आहे. अनियमित पाऊस, वाढते तापमान, दुष्काळ, पूर आणि जमिनीतील घटती सुपीकता यांचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होत आहे.हवामान बदलामुळे पिकांच्या पेरणीच्या वेळेत, वाढीच्या कालावधीत आणि उत्पादनक्षमतेत बदल होत आहेत. त्यामुळे भविष्यातील शेती हवामान-सक्षम, संसाधन-कार्यक्षम आणि विज्ञानाधिष्ठित असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती हे या आव्हानाचे गंभीर उदाहरण आहे.

प्राथमिक अंदाजानुसार, राज्यात सुमारे १.४१ कोटी हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे जवळपास ६२ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. ३०४ ते ३०५ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील सर्वाधिक बाधित भागांत खरीप हंगामातील ९० टक्क्यांपर्यंत पिकांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील सोयाबीन व कापूस या प्रमुख पिकांना सर्वाधिक फटका बसला. त्याचबरोबर मका, भात, कांदा आणि फळबागांचेही मोठे नुकसान झाले. राज्यात मॉन्सूनच्या पावसात एकूण १८ ते १९ टक्क्यांची तूट नोंदवली गेली; मराठवाड्यात ही तूट ३९ टक्क्यांपर्यंत, उत्तर महाराष्ट्रात ३४ टक्के आणि विदर्भात २७ टक्क्यांपर्यंत पोहोचली. याचा परिणाम पिकांबरोबरच पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याच्या उपलब्धतेवरही झाला. हिरव्या चाऱ्यात २२.७९ टक्के, तर वाळलेल्या चाऱ्यात २१.४३ टक्के तूट निर्माण झाली. तथापि, पीकनिहाय नुकसानीचे अंतिम आर्थिक मूल्यांकन पंचनामे आणि केंद्र सरकारच्या एनडीआरएफ प्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल. ही परिस्थिती एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करते, तो म्हणजे केवळ अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांची निर्मिती पुरेशी आहे का? बदलत्या हवामानात कमी पाणी, दीर्घ पावसाचे खंड आणि उष्णतेचा ताण सहन करू शकणाऱ्या वाणांची निर्मिती ही काळाची गरज आहे. दुष्काळसहिष्णुता, जलकार्यक्षमता, कमी कालावधीत परिपक्व होणारे वाण, पीक विविधीकरण आणि हवामान अनुकूल कृषी तंत्रज्ञान यांना संशोधन व धोरणांमध्ये प्राधान्य द्यावे लागेल.

भविष्याची खरी गुंतवणूक

यासाठी कृषी संशोधनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पीक प्रजनन, जैवतंत्रज्ञान, जीनोमिक आणि आण्विक मार्कर यांच्या साह्याने कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारे, उष्णता व रोगांना प्रतिकार करणारे आणि पोषणमुल्यांनी समृद्ध वाण विकसित करता येतात. आयसीएआर, राज्य कृषी विद्यापीठे आणि इतर संशोधन संस्थांनी विकसित केलेले सुधारित वाण देशाच्या अन्नसुरक्षेत महत्त्वाचे योगदान देत आहेत. भविष्यात पारंपरिक प्रजनन पद्धतींसोबत जीनोमिक निवड, जीन एडिटिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर अधिक प्रभावी ठरणार आहे. संशोधनाचा भर केवळ सरासरी उत्पादनावर न राहता स्थिर उत्पादन, पोषणमूल्य, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि विविध कृषी-हवामानविषयक परिस्थितींशी जुळवून घेण्यावर असला पाहिजे. डिजिटल तंत्रज्ञानामुळे शेतीचे स्वरूपही बदलत आहे. ड्रोनद्वारे पीक निरीक्षण व फवारणी, उपग्रह प्रतिमांद्वारे पीक क्षेत्राचे मूल्यमापन, मातीतील ओलावा मोजणारे सेन्सर, हवामानाचा अचूक अंदाज आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित निर्णय प्रणाली यामुळे शेतकऱ्यांना अधिक अचूक निर्णय घेता येतील. मात्र, ही तंत्रज्ञाने लहान आणि सीमांत शेतकऱ्यांपर्यंत परवडणाऱ्या दरात पोहोचणे आवश्यक आहे. डिजिटल दरी कमी करण्यासाठी स्थानिक भाषेतील सल्ला, प्रशिक्षण आणि विश्वासार्ह विस्तार सेवा उपलब्ध करून द्याव्यात. शेतीची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केवळ उत्पादन वाढविण्याऐवजी मूल्यवर्धन आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे. फळे, भाजीपाला, कडधान्ये, तेलबिया आणि धान्यांवर आधारित प्रक्रिया उद्योग, शीतसाखळी, साठवणूक व्यवस्था आणि थेट बाजारपेठेशी जोडणी यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), सहकारी संस्था आणि कृषी उद्योजकता यांना प्रोत्साहन दिल्यास ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. उत्पादनानंतर होणारी नासाडी कमी करणे आणि शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळवून देणे तितकेच महत्त्वाचे आहे.

उत्तरार्ध

२०४७ मधील भारत : कृषिप्रधान की कृषिसक्षम?

भारताच्या आर्थिक पाहणी (२०२५-२६) नुसार, शेती आणि संलग्न क्षेत्रांचा जीडीपीमधील वाटा सुमारे १५.२ टक्के आहे; सेवा क्षेत्राचा वाटा सुमारे ५१.१ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा सुमारे २४.३ टक्के आहे. तरी रोजगाराच्या दृष्टीने शेतीतील कामगारांचा वाटा ४३ टक्के आहे. ही तफावत भारताच्या आर्थिक परिवर्तनातील महत्त्वाचे आव्हान आहे. भारताच्या आर्थिक विकासाचा पुढील टप्पा शेतीबाहेरील रोजगारनिर्मितीवर अवलंबून असेल.उत्पादन उद्योग, बांधकाम, वाहतूक, अन्नप्रक्रिया, पर्यटन, आरोग्य, शिक्षण आणि डिजिटल सेवा यांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करावा लागेल. शेतकऱ्यांना शेती सोडण्यास भाग पाडणे हा विकासाचा मार्ग नाही. शेतीतून बाहेर पडणाऱ्या तरुणांना कौशल्याधारित, स्थिर आणि सन्मानजनक रोजगार मिळाला पाहिजे. शेतीत राहणाऱ्या शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, योग्य बाजारभाव, कर्ज, विमा आणि सामाजिक सुरक्षा उपलब्ध झाली पाहिजे.

शेतीचे स्वरूप बदलेल

भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न पाहत आहे. या प्रवासात शेतीचे योगदान केवळ अन्नधान्य उत्पादनापुरते मर्यादित राहणार नाही. पोषणसुरक्षा, ग्रामीण रोजगार, निर्यात, जैव-अर्थव्यवस्था आणि पर्यावरणीय शाश्वतता या सर्व क्षेत्रांत कृषी क्षेत्राची भूमिका निर्णायक असेल. त्यासाठी कृषी संशोधनात अधिक गुंतवणूक, संशोधक आणि शेतकरी यांच्यात प्रभावी समन्वय, तरुणांना कृषी उद्योजकतेकडे आकर्षित करणे आणि शेतीला बाजारपेठेच्या गरजांशी जोडणे आवश्यक आहे. धोरणांची आखणी करताना लहान शेतकरी, महिला शेतकरी आणि पावसावर अवलंबून असलेल्या प्रदेशांना केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. म्हणूनच, भारत कृषिप्रधान देश राहील की नाही, हा प्रश्न भविष्यात दुय्यम ठरेल. महत्त्वाचा प्रश्न असा असेल की भारतीय शेती किती आधुनिक, उत्पादक, शाश्वत आणि शेतकरी-केंद्रित बनली आहे. शेतीतून रोजगार कमी होणे म्हणजे शेतीचे महत्त्व कमी होणे नव्हे; उलट कमी मनुष्यबळात अधिक उत्पादन, अधिक मूल्यनिर्मिती आणि अधिक समृद्धी निर्माण करणे हे आधुनिक कृषी व्यवस्थेचे ध्येय असले पाहिजे. भारताचे भविष्य केवळ उद्योगांच्या विस्तारात नाही, तर विज्ञान, तंत्रज्ञान आणि शाश्वततेच्या बळावर समृद्ध झालेल्या शेतीतही दडलेले आहे. शेतीचे परिवर्तन हेच विकसित भारताच्या स्वप्नाला बळ देणारे खरे परिवर्तन ठरेल. यासाठी केंद्र-राज्य समन्वय आणि सातत्यपूर्ण सार्वजनिक गुंतवणूक आज अत्यावश्यक ठरते.भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न पाहत आहे. या प्रवासात उत्पादनवाढ पोषणसुरक्षा, ग्रामीण रोजगार, निर्यात, जैव-अर्थव्यवस्था आणि पर्यावरणीय शाश्वतता या सर्व क्षेत्रांत कृषी क्षेत्राची भूमिका निर्णायक असेल.

डॉ. किरण गायकवाड

मो.९९५९२५८२३४

(लेखक भारतीय कृषी संशोधन संस्थेत वरिष्ठ शास्त्रज्ञ आहेत.)

शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संजय नगर येथील नैसर्गिक नाला वळवून जागा हडपण्याचा हेतू..!

मुख्याधिकारी कारवाई कधी करणार?तक्रारकर्ते व नागरिकांचा रोष

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २६ : पुसद नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मधील राज विहारला लागून असलेल्या संजय नगर लेआउट मधील नैसर्गिक असलेल्या मोठ्या नाल्याला वळवून आरसीसी सिमेंट मध्ये विनापरवाना खोलीकरणाचे काम करून नाल्यांमधील जागा हडप करण्याच्या हेतूने लेआउट धारक व संबंधित ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने १६ ऑक्टोंबर रोजी तक्रार दाखल करून कारवाईची मागणी केली आहे.



तक्रारीच्या अनुषंगाने संजय लेआउट धारक भारत तायडे यांना नगरपरिषद कडून दि.२२ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित नाल्याबाबत नोटीस बजावून सदर लेआउटचे कागदपत्रे, मालकी हक्काबाबत पुरावे व ले-आउटचा नकाशा ७ दिवसात सादर करा अन्यथा आपल्या विरुद्ध पुढील कारवाई करण्यात येईल असे कळविले असता अद्याप पर्यंत संबंधित ले-आऊट धारकांनी कोणतेही कागदपत्रे अथवा उत्तर सादर केले नाही. त्यामुळे लेआउट धारक व संबंधित कंत्राटदार यांच्यावर कारवाई होणार की? नाही याकडे तक्रारकर्ते व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

संजय नगर लेआउट हे वासवी नगर कडे जाणाऱ्या मोठ्या डीपी रोड लागत असल्यामुळे या लेआउट मधून वर्षानुवर्षे जुना नैसर्गिक नाला हा वाहत जात असताना या नाल्याची दिशा वळवून या ठिकाणी मोठे सिमेंट काँक्रेटचा नाला बांधून पाणी वळवण्यात आले आहे, या नैसर्गिक नाल्याची जागा ही संबंधित संजय लेआउट डीपी रोडच्या प्लॉटला लागून असल्यामुळे ही जागा हडप करण्याच्या हेतूने नाला वळविण्यात आलेला आहे असा दावा रिपाई पक्षाचे पदाधिकारी तथा तक्रारकर्ते यांनी केला आहे. या संजय लेआउट मध्ये प्लॉटचे भाव गगनाला भिडले असून हा नैसर्गिक नाला वळवल्यामुळे त्यांना दोन ते तीन हजार चौरस मीटर नाल्यातील जागा ही लागून असलेल्या प्लॉटमध्ये समाविष्ट करून विक्री करण्याचा हेतू असल्याचे सांगण्यात येत आहे. हा नैसर्गिक नाला वळवल्यामुळे खाली आदिवासी सोसायटी राजविहार रविराज लेआउट महावीर नगर मंगलमूर्ती नगर पवन नगर या नगराला हा नाला लागत असल्यामुळे या नगराच्या पाण्याचा पुढील येणाऱ्या पावसाळ्यात धोका निर्माण होऊन नागरिकांचे अतोनात नुकसान होऊन ही ठाणी होऊ शकते असा तक्रारीत उल्लेख केला आहे. परंतु सदर तक्रार १६ नोव्हेंबर रोजी मुख्याधिकारी नगरपरिषद, तहसीलदार पुसद, उपविभागीय अधिकारी पुसद, यांना सादर केले असून अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची मुख्याधिकारी अथवा संबंधित नगर अभियंता यांनी कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्यामुळे संबंधित लेआउट व कंत्राटदार हे खुलेआम बांधकाम करून जागा हडप करण्याच्या मार्गावर आहेत यामध्ये येत्या ८ दिवसात लेआऊटधारक तथा कंत्राटदार यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही तर जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करणार असा इशारा रिपाईच्या वतीने देण्यात आलेला आहे.

पुलाखालीच रेतीचा बेकायदा उपसा, राष्ट्रीय संपत्ती धोक्यात!

आर्णी येथे रेती माफियांचा हैदोस,कोट्यवधींचा महसूल बुडत असताना महसूल प्रशासनाची डोळेझाक?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

आर्णी, दि. २६ : तालुक्यात अवैध रेती उत्खननाने अक्षरशः उच्छाद मांडला असून राष्ट्रीय महामार्ग ३६१ वरील मोठ्या पुलासह बाबा कंबलपोष दर्ग्याजवळील पूल, पोलीस स्टेशन परिसरातील पूल आणि अन्य पुलांच्या अगदी जवळून, तसेच पुलाखालूनही रेतीचा उपसा होत असल्याच्या तक्रारी आहेत.

या प्रकारामुळे पुलांच्या सुरक्षिततेसह पर्यावरण आणि राष्ट्रीय संपत्ती धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे. सर्वसामान्य नागरिकांना उघडपणे दिसणारा हा प्रकार संबंधित महसूल अधिकाऱ्यांच्या नजरेस का पडत नाही, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. आर्णी तालुक्यात अवैध उत्खनन, साठवणूक आणि चढ्या दराने रेतीविक्रीचा व्यवसाय खुलेआम सुरू असल्याचे चित्र आहे. रात्रीच्या अंधारात चोरट्या मार्गाने रेतीची वाहतूक होत असल्याच्या तक्रारी असून, या व्यवहारांमुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, अधिकृत मार्गाने रेती मिळत नसल्याने सर्वसामान्य नागरिक आणि प्रधानमंत्री आवास योजनेसह विविध घरकुल योजनांचे लाभार्थी अडचणीत आले आहेत. रेतीअभावी अनेक घरकुलांची बांधकामे अर्धवट राहण्याची वेळ आली आहे. एकीकडे गरजू लाभार्थ्यांना बांधकामासाठी रेती मिळत नाही, तर दुसरीकडे अवैध रेतीसाठे करून ती जादा दराने विकली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या प्रकारामुळे पर्यावरणासह पैनगंगा अभयारण्यालाही धोका निर्माण होण्याची चिंता व्यक्त होत आहे. महसूल प्रशासनाने पुलांजवळील उत्खनन तातडीने थांबवून तालुक्यातील सर्व रेतीसाठ्यांची तपासणी करावी, रात्रीची अवैध वाहतूक रोखावी आणि वाहनांची रॉयल्टी व कागदपत्रे तपासून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत. त्याचबरोबर घरकुल लाभार्थी व सर्वसामान्यांना नियमानुसार मुबलक रेती उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा आहे. पुलाखालून रेती उपसली जात असताना प्रशासनाचे लक्ष नेमके कुठे आहे? महसूल बुडविणाऱ्या आणि सार्वजनिक मालमत्तेला धोका निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी आणखी किती तक्रारींची प्रतीक्षा केली जाणार, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

थोडक्यात



मुकुटबनमध्ये विकासकामांना ब्रेक,सातही आरओ फिल्टर बंद!

दुर्गंधीयुक्त नाल्या,अशुद्ध पाण्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात
ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्क्रियतेवर युवकांचा संताप

मुकुटबन : गावातील मूलभूत सुविधांची दुरवस्था आणि विकासकामांचा ठप्प कारभार यामुळे मुकुटबनवासीयांना समस्यांचा सामना करावा लागत आहे. गावातील सातही आरओ फिल्टर बंद अवस्थेत असून, पाण्याच्या टाकीजवळील फिल्टरमधून अशुद्ध पाणी येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दुसरीकडे, तुंबलेल्या नाल्यांमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. फेब्रुवारीपासून ग्रामपंचायतीवर प्रशासक असल्याने विकासकामांकडे दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नसेल आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत बाबीही मार्गी लागत नसतील, तर ग्रामपंचायत प्रशासन नेमके काय करत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत युवकांनी गुरुवारी ग्रामसेवक वैजनाथ मुंडे यांना निवेदन दिले. बंद आरओ फिल्टर तातडीने सुरू करणे, नाल्यांची स्वच्छता आणि गावात फॉगिंग करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी अविनाश मांढरे, विकास मंदावार, अतुल विधाते, राहुल कल्लुरवार व प्रवीण येरावार उपस्थित होते. आता निवेदनानंतर तरी प्रशासन जागे होणार की नागरिकांना समस्यांशीच झुंजावे लागणार, हा प्रश्न कायम आहे.

अणे महिला महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

यवतमाळ : लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ येथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुर्गेश कुंटे हे होते त्यांनी विद्यार्थिनींना भारतीय संविधानाची निर्मिती, संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये, या तत्त्वांचे महत्त्व समजावून सांगितले. मूलभूत अधिकारांचा अवलंब जसा करतो तसे कर्तव्याचे पालन सुद्धा केले पाहिजे असे प्रतिपादन केले.
या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.वेदिका ठवरे हिने केले तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ.चंद्रशेखर कुडमेथे यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.नारायण वाघमारे व सहकार्य अधिकारी प्रा.कु सपना दाढे व सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

भरदिवसा दुकानासमोरून दुचाकी चोरी,सीसीटीव्हीत चोरटा कैद!

फुलसावंगीतील घटनेने वाहनधारकांमध्ये चिंता.

फुलसावंगी : गावात भरदिवसा दुकानासमोर उभी असलेली दुचाकी चोरट्याने लंपास केल्याने वाहनांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यादव सोनबा देवगडे (वय ५०) यांच्या मालकीची ६० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची स्प्लेंडर प्लस (एमएच २९ बीझेड ३९६८) ही दुचाकी २३ नोव्हेंबर रोजी दुपारी जयस्वाल यांच्या दुकानासमोरून चोरीला गेली. त्यांचा मुलगा पिंटू हा मजुरीसाठी गेला असताना ही घटना घडली. दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता अज्ञात इसम दुचाकी चोरून नेताना दिसून आला. शोध घेऊनही दुचाकी न मिळाल्याने देवगडे यांनी २५ नोव्हेंबरला महागाव पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी बीएनएस कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पोलीस कॉन्स्टेबल केशव चव्हाण तपास करीत आहेत.

मुकुटबनमध्ये ट्रकची दुचाकीला धडक,२५ वर्षीय युवक जखमी

झरी, दि. २६ : येथील वणी मार्गावरील हिमांशू सेलिब्रेशन हॉलजवळ भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकीस्वार युवकाच्या उजव्या पायाला दुखापत झाली असून, त्याला पुढील उपचारासाठी वणी येथे रेफर करण्यात आले आहे. अंकित गजानन सूर (वय २५, रा. अडेगाव) असे जखमी युवकाचे नाव आहे. अंकित हा दुचाकी क्रमांक एमएच २९ बीयू ९२७५ ने अडेगावकडे जात असताना समोरून मुकुटबनच्या दिशेने येणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच ३४ सीक्यू ३१४७ ने मुकुटबनपासून काही अंतरावर असलेल्या सेलिब्रेशन हॉलजवळ त्याच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत अंकितच्या उजव्या पायाला दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच मुकुटबन पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी युवकाला रुग्णवाहिकेद्वारे पुढील उपचारासाठी वणी येथे पाठविण्यात आले. दरम्यान, अपघातातील ट्रक मुकुटबन पोलीस ठाण्यात लावण्यात आला असून, पोलिसांकडून या प्रकरणाची तपासणी सुरू आहे

लाल मातीच्या आखाड्यात विजय शिंदेची अवघ्या दोन मिनिटांत निर्णायक बाजी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २६ : ज्येष्ठ स्वातंत्र्यसंग्राम सेनानी तथा लोकमतचे संस्थापक संपादक जवाहरलाल दर्डा उपाख्य बाबूजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त ऐतिहासिक श्री हनुमान आखाड्यात रंगलेल्या इनामी काटा कुस्ती स्पर्धेत वाशिमच्या विजय शिंदे पहेलवानाने अव्वल स्थान पटकावले. सोलापूरच्या शिवाजी महाडिकला अवघ्या दुसऱ्याच मिनिटाला धोबीपछाड देत विजयने मानाची कुस्ती जिंकली. लाल मातीच्या आखाड्यातील या झटापटीने उपस्थित कुस्तीशौकिनांना अक्षरशः रोमांचित केले. जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित या स्पर्धेत तब्बल १५ लाख रुपयांची पारितोषिके ठेवण्यात आली होती.

पंजाब, हरियाणा, दिल्ली, रोहिलखंडासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून ३५० हून अधिक नामवंत मल्लांनी सहभाग नोंदविला. राज्यसभेचे माजी खासदार डॉ. विजय दर्डा यांच्या हस्ते विजेत्या विजय शिंदेला एक लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. दुसऱ्या क्रमांकाच्या ७१ हजारांच्या कुस्तीत पुण्याच्या शुभम मगरने सोलापूरच्या प्रथमेश अवथडेला चीत केले. तिसऱ्या क्रमांकाच्या ५१ हजारांच्या लढतीत नाशिकच्या गणेश अहिरेने पुण्याच्या श्रीकांत गव्हाणेवर मात केली. चौथ्या क्रमांकाच्या कुस्तीत रोहिलखंडच्या जगदीश राजपूतने गुणांच्या आधारे विजय मिळविला. यजमान यवतमाळच्या अभिषेक दाबेरावने हरियाणाच्या नितीन पहेलवानला तीन मिनिटांत चीत करीत स्थानिक आखाड्याचा दबदबा कायम ठेवला. वाशिमच्या रवी पहेलवानानेही सहाव्या क्रमांकाची कुस्ती जिंकली. माजी खासदार डॉ. विजय दर्डा, माजी शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा, माजी आमदार कीर्ती गांधी आणि हनुमान आखाड्याचे विश्वस्त किशोर दर्डा यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडली. आमदार बाळासाहेब मांगुळकर, जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव अनिल पांडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पंचांच्या निर्णयांपासून धावत्या समालोचनापर्यंत आखाड्यात कुस्तीचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

फॉल्टी मिटरच्या नावाखाली वीजग्राहकांना अवाजवी बिल..!

तालुक्यातील व शहरातील नागरिक त्रस्त!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. २६ : तालुक्यातील शहरांसह ग्रामीण भागात वीज ग्राहकांना मीटर फॉल्टी असल्याचे कारण दाखवून १ हजार ते २ हजार रुपयांपर्यंतची विजबिले दिली जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या प्रकारामुळे सर्वसामान्य वीज ग्राहक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. महावितरणच्या गलथान कारभार व बिल आकारणीबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेष:म्हणजे शासनाकडून महिलांना लाडकी बहीण योजनेअंतर्गत मिळणाऱ्या आर्थिक मदतीतील मोठा हिस्सा वीजबिल भरण्यातच खर्च होत असल्याची चर्चा शहरातील अनेक नगरामध्ये तसेच ग्रामीण भागातील गावागावात सुरू आहे. एका हाताने आर्थिक मदत द्यायची तर दुसऱ्या हाताने वीजबिलाच्या माध्यमातून तीच रक्कम परत घ्यायची. अशी परिस्थिती निर्माण झाल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. या गंभीर प्रकारणात यवतमाळचे अधीक्षक अभियंता यांनी लक्ष घालून ग्रामीण व शहरी भागातील विजग्राहकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची बाब लक्षात घेऊन हा प्रकार तात्काळ थांबवावा आणि नागरिकांना दिलासा द्यावा अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकाकडून येत आहे. होत असलेल्या प्रकरणामध्ये मीटर फॉल्टी असल्याचे कारण देऊन आकारण्यात येणाऱ्या बिलांची सत्यता तपासावी, मीटरची प्रत्यक्ष तपासणी करावी. ग्राहकांना अवाजवी वीजबिलांचा भुर्दंड बसत असल्यास त्यावर योग्य कार्यवाही करुन बिल तात्काळ दुरुस्ती करून देण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.

बाभूळगावात जिल्हा काँग्रेस ओबीसी विभागाची तालुकास्तरीय बैठक..



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

बाभूळगाव, दि. २६ : ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण आणि विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जनगणनेत स्वतंत्र रकाना असणे आवश्यक आहे. समाजाची नेमकी लोकसंख्या समोर आल्याशिवाय अर्थसंकल्पीय तरतुदी आणि हक्कांचा न्याय्य वाटा मिळणे कठीण आहे, असा मुद्दा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष इंजि. प्रकाश जानकर यांनी उपस्थित केला. बाभूळगाव येथे यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाच्या तालुकास्तरीय बैठकीत ते बोलत होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष पी. बी. आडे होते. त्यांनी ओबीसी विभागाची ध्येयधोरणे, संघटनात्मक बांधणी आणि आगामी कार्यपद्धती स्पष्ट करत समाजाच्या प्रश्नांसाठी संघटितपणे लढण्याचे आवाहन केले. यावेळी ओबीसींची स्वतंत्र जनगणना, लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण आणि विकास निधीचा न्याय्य वाटा या मुद्द्यांवर चर्चा झाली. बैठकीचे प्रास्ताविक व संचालन विजय खरोडे यांनी केले, तर पांडुरंग लांडगे यांनी आभार मानले. यावेळी जिनेंद्र ब्राह्मणकर, प्रकाशचंद छाजेड, के. एन. मोरे यांच्यासह जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधान दिनी नगर परिषद प्रशासनाला जाग नाही..!

वंचितने उतरून केली उद्देशिकेची स्वच्छता! नगरपरिषदेच्या निष्क्रियतेवर वंचित बहुजन आघाडीचा संताप.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २६ : संविधान दिनाच्या दिवशीच भारतीय संविधानाच्या उद्देशिका परिसराची दुरवस्था समोर आल्याने यवतमाळ नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिसरात सर्वत्र कचरा आणि अस्वच्छता, तर उद्देशिकेच्या चबुतऱ्यावर भटक्या कुत्र्यांचा वावर दिसून आला. संविधान दिनासारख्या महत्त्वपूर्ण दिवशीही प्रशासनाला या परिसराच्या स्वच्छतेचे भान नसल्याने वंचित बहुजन आघाडीने तीव्र संताप व्यक्त केला.

नगरपरिषद प्रशासनाची वाट न पाहता वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष, नगरपरिषदेचे गटनेते तथा नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वतः पुढाकार घेत उद्देशिका परिसराची स्वच्छता केली. संपूर्ण परिसर पाण्याने धुऊन काढत आकर्षक फुलांची सजावट आणि रांगोळी साकारण्यात आली. अशा प्रकारे प्रशासनाच्या नाकावर टिच्चून आघाडीने संविधानाचा सन्मान प्रत्यक्ष कृतीतून जपला. ज्या भारतीय संविधानाच्या चौकटीत नगरपरिषदेचा कारभार चालतो, त्याच संविधानाच्या उद्देशिकेची स्वच्छता आणि देखभाल करण्यासाठी प्रशासनाला पुढाकार घेता येऊ नये, ही केवळ निष्काळजीपणा नसून संविधानिक मूल्यांविषयीच्या उदासीनतेचे चित्र असल्याची टीका यावेळी करण्यात आली. संविधान दिनी औपचारिक कार्यक्रम आणि अभिवादनापुरताच संविधानाचा सन्मान मर्यादित न ठेवता त्याच्या प्रतीकांची जपणूक करण्याची जबाबदारीही प्रशासनाने पार पाडली पाहिजे, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीने मांडली. या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवत सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेबाबत नगरपरिषद प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष जबाबदारी पार पाडावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी नगरसेविका मीरा वीर यांच्यासह अशोक कयापक, शिवदास कांबळे, प्रसंणजित भवरे, प्रमोद पाटील, संतोष राऊत, केशव भागवत, सचिन मोहोड, गजानन कोकाटे, रामदास वीर, चंद्रकांत वाळके, देवानंद लोणारे, पुष्पाताई सिरसाठ, सुकेशिनी खोब्रागडे, सविता तिडके, शीला वैद्य, बेबी मोडक, करुणा चौधरी, धम्मपाल भीतकर, एस. डी. कळमकर, संतोष आत्राम, संजय कालबांधे, लीला धोंगडे, निर्मला मेश्राम, मालनबाई बारसागडे आदी उपस्थित होते.

ग्रामपंचायतींच्या कारभाराची प्रशासकीय तपासणी करा,मनसेचे प्रशासनाला निवेदन!

अस्वच्छता,खड्डेमय रस्ते, नादुरुस्त नाले आणि पाणीपुरवठ्याच्या समस्या अनियमितता आढळल्यास कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि. २६ : केळापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, गावागावांतील मूलभूत सुविधांची दुरवस्था दूर करण्यासाठी प्रशासनाने आता केवळ कागदी अहवालांवर विसंबून न राहता प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष अश्विन मुठाकरे यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. तालुक्यातील अनेक गावांमध्ये अस्वच्छता, खराब रस्ते, नाल्यांची दुरवस्था, अनियमित पाणीपुरवठा आणि आरोग्य सुविधांचा अभाव असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे सर्व ग्रामपंचायतींची अचानक प्रशासकीय तपासणी करून उपलब्ध निधीतून झालेल्या आणि सुरू असलेल्या कामांचा दर्जा तपासावा, अशी मागणी करण्यात आली आहे. कामांमध्ये अनियमितता किंवा हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, तसेच पाणीपुरवठा योजनांच्या देखभालीची जबाबदारी निश्चित करावी, असेही निवेदनात म्हटले आहे. पाहणीचा अहवाल आणि कार्यवाहीची माहिती मागणीदाराला द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास मनसेच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशाराही मुठाकरे यांनी दिला आहे.

संविधान दिनानिमित्त नशा मुक्त भारताची शपथ..!

पी.एम.श्री.जि.प.शाळेत संविधान दिवस साजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





बाभुळगाव, दि. २६ : बाभुळगाव शहरातील जिल्हा परिषद पीएमश्री उच्च प्राथमिक सेमी इंग्रजी शाळेत २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य च्या वतीने नशामुक्त भारताची शपथ देण्यात आली.

ही शपथ मंडळाचे यवतमाळ जिल्हा संघटक योगेश वानोडे यांनी उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांना दिली. संविधान दिनानिमित्त शहरातून प्रभात फेरी काढण्यात आली.

भारताचा ७७ वा संविधान दिवस सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने बाभुळगाव येथे जिल्हा परिषद मराठी शाळेच्या माध्यमातून प्रभात फेरी काढण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष प्रवीण चेंडकापुरे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून शाळा समिती अध्यक्ष अंकुश सोयाम, मुख्याध्यापिका काशेट्टीवार, प्रमुख मार्गदर्शक म्हणून योगेश वानोडे व्यासपीठावर उपस्थित होते. योगेश वानोडे यांनी संविधानाच्या कलम ४७ व्यसनाधीनता व मादक पदार्थांचे सेवन या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच शिक्षिका बोरकर यांनी संविधानाबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी संविधान दिना निमित्त प्रश्न मंजुषा व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. प्रभात फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी संविधानाबाबत फलक व घोषणा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक श्याम लोखंडे यांनी केले, तर आभार शिक्षक प्रशांत भुराणे यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेचे शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

विद्यापीठात कर्मचा-यांचे कामबंद आंदोलन यशस्वी

अमरावती/का.प्र.

राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी संविधान दिनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांनी एकदिवसीय लाक्षणिक काम बंद आंदोलन पुकारले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आंदोलनस्थळी भेट देवून कर्मचा-यांशी संवाद साधत आपण आपल्या सदैव पाठीशी आहोत व मागण्यांसंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे कुलगुरूंनी कर्मचा-यांना आश्वस्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, व्य.प. सदस्य डॉ. मनिषा कोडापे, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, कैलास चव्हाण यांनी सभामंडपाला भेट दिली.



कुलगुरूंची आंदोलनस्थळी भेट
मागण्यांसंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करण्याचे दिले आश्वासन

१०:२०:३० सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सातव्या वेतन आयोगानुसार लागू करावी, अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांना पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, पात्र शिक्षकेतर कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, रिक्त असलेली शिक्षकेतर पदे भरण्यास तात्काळ मंजुरी द्यावी, सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीनुसार सातवा वेतन आयोग लागू करावा, गोंडवाना विद्यापीठासाठी स्वतंत्र सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालय स्थापन करावे, प्रयोगशाळा परिचरांना कालबध्द पदोन्नतीनंतर ४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू करावी, विनाअनुदानित शाखेतील शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवा अनुदानित शाखेत ग्राह्य धरावी, शिक्षकेतर कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे करावे अशा प्रमुख मागण्या असून यापूर्वी आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात ५ नोव्हेंबर रोजी पुणे येथील उच्च शिक्षण संचालनालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. त्यावेळी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतरही शासन स्तरावर कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने १८ नोव्हेंबर रोजी दुस-या टप्प्यात राज्यभर 'लेखणी बंद' आंदोलन करण्यात आले. शासनाने याउपरही दखल घेतली नाही, तर बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा निर्धार कर्मचा-यांनी केला आहे.

एकलव्याच्या १२ खेळाडूंची राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर

नुकत्याच वाशिम येथे पार पडलेल्या विभागीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये एकलव्य धनुर्विद्या क्रीडा अकादमी व एकलव्य गुरुकुल स्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. या स्पर्धेत एकलव्य क्रीडा अकादमीच्या तब्बल १२ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने नांदगाव खंडेश्वरच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निवड झालेल्या खेळाडूंमध्ये १४ वर्षे वयोगटात एकलव्य गुरुकुल स्कूलचे विद्यार्थी आर्यन म्हात्रे व सर्वज्ञ ठाकरे यांची निवड झाली आहे. तर १७ वर्षे वयोगटात ऋषीराज लायबर, शौर्य चव्हाण, मनस्वी जुनघरे व श्रावणी पवार यांनी



आपल्या कौशल्याच्या जोरावर राज्यस्तरीय स्पर्धेत धडक मारली आहे. १९ वर्षे वयोगटात शिवाजी हायस्कूल, नांदगाव खंडेश्वर येथील राम देशमुख, प्रत्यूष भोयर, सुजल हाडके, तनुश्री श्रीनाथ व सुरभी देवघरे, तर मॉडर्न इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, फुबगाव येथील अनुश्री काळेकर या खेळाडूंची राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विशेष म्हणजे, निवड झालेले सर्व खेळाडू एकलव्य क्रीडा अकादमी, नांदगाव खंडेश्वर येथील मैदानावर नियमितपणे धनुर्विद्येचा सराव करतात. खेळाडूंना राज्य क्रीडा मार्गदर्शक अमर जाधव, धनुर्विद्या प्रशिक्षक ऋषिकेश चांदुरकर व प्रतीक पोकळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. यशाबद्दल एकलव्य क्रीडा अकादमीचे संस्थापक व मार्गदर्शक, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त सदानंद जाधव, एकलव्य क्रीडा अकादमीचे विशाल ढवळे, अनुप काकडे, विलास मारोटकर, अनिल निकोडे, उमेश परसनकर, महेंद्र मेटकर, पवन जाधव, राजेंद्र लवंगे, उत्तम मुरादे, प्रा. गजानन काकडे तसेच एकलव्य गुरुकुल स्कूलचे सर्व शिक्षक व शिक्षिका यांनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

अमरावती मुद्रक संघाच्या बैठकीत कार्यकारिणीची निवड

अमरावती/का.प्र.

अमरावती मुद्रक संघाच्या वतीने साईनगर येथील हॉटेल द स्काय लिफ ईन इन येथे विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला अमरावती शहरातील मुद्रण व्यवसायाशी संबंधित व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संघटनेच्या संघटनात्मक बांधणीसह भविष्यातील कार्याची दिशा निश्चित करण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या सभेमध्ये अमरावती मुद्रक संघाच्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्यात आली. संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने आणि समन्वयाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. अमरावतीच्या मुद्रण व्यवसायासमोरील विविध



■ एकजुटीने काम करण्याचा निर्धार

प्रश्न, व्यावसायिक अडचणी, मुद्रकांमधील परस्पर समन्वय, संघटनेची भविष्यातील वाटचाल तसेच सदस्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर यावेळी चर्चा करण्यात आली. आगामी काळात संघटनेच्या माध्यमातून कोणती कार्ये हाती घ्यावीत, सदस्यांच्या समस्या कशा सोडवाव्यात आणि संघटनेचे कार्य अधिक व्यापक कसे करावे, याबाबत उपस्थित सदस्यांनी विविध सूचना मांडल्या.

विशेष म्हणजे, संघटनेच्या आगामी कार्ययोजना आणि पुढील वाटचालीसंदर्भात मांडण्यात आलेल्या प्रस्तावांना उपस्थित सदस्यांनी एकमताने संमती दर्शविली.

संघटनेच्या बळकटीकरणा साठी सहकार्य, एकजूट आणि सक्रिय सहभाग नोंदविण्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. अमरावतीतील मुद्रण व्यावसायिकांना एका व्यासपीठावर आणणे, त्यांच्या व्यावसायिक प्रश्नांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, व्यावसायिक हितसंबंधांचे संरक्षण करणे तसेच संघटनेच्या माध्यमातून विविध विधायक उपक्रम राबविणे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही सभा अमरावती मुद्रक संघाच्या आगामी वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली.

पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्याला ९ लाखांचे पॅकेज

अमरावती/का.प्र.

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्याल यातील विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची आणि तांत्रिक कौशल्याची चमक दाखवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'अग्युमेंटिक सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड' या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थि क्रिश गुप्ता यांची ९ लाख रुपये वार्षिक पॅकेजवर निवड झाली आहे. क्रिश गुप्ता यांनी महाविद्यालयात आयोजित टेक्निकल ट्रेनिंग, ऑप्टिट्यूड तसेच सातत्यपूर्ण मेहनत, शैक्षणिक गुणवत्ता, विविध प्रकल्पांमधील सक्रिय सहभाग तसेच कार्यशाळांच्या माध्यमातून आत्मसात केलेले अद्ययावत तांत्रिक कौशल्य यांच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली. प्लेसमेंट प्रक्रिये दरम्यान त्याच्या आत्मविश्वासपूर्ण संवादशैली, तांत्रिक ज्ञान, समस्या सोडविण्याची क्षमता आणि प्रभावी सादरीकरणाने परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. अग्युमेंटिक सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड ही भारतातील वेगाने विकसित होणाऱ्या आयटी कंपन्यांपैकी



एक असून, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नाविन्यपूर्ण आणि आधुनिक सेवा प्रदान करण्यासाठी कार्यरत आहे. या कंपनीच्या माध्यमातून सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, वेबसाइट डेव्हलपमेंट, मोबाईल ॲप डेव्हलपमेंट, डिजिटल मार्केटिंग, गेम डेव्हलपमेंट, ॲनिमेशन डिझाइनिंग तसेच ग्राफिक डिझाइनिंग अशा विविध क्षेत्रांतील सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संचालक डॉ. खोडके, प्राचार्य डॉ. जावंधीया कॉर्पोरेट रिलेशन्स डीन प्रा. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड, सीएसई विभागप्रमुख डॉ. विजय गडीचा, प्रा. उमेश आरके, प्रा. मंगेश निचत, प्रा. एस. ए. खान यांनी अभिनंदन केले.

आरक्षणाची सोडत निघताच दिव्यांचा झगमगाट!

आसेगाव पूर्णा/वार्ताहर

ग्रामपंचायत निवडणुकीची आरक्षण सोडत जाहीर होताच आसेगाव पूर्णा येथील राजकीय हालचालींना वेग येऊ लागला आहे. याच पार्श्वभूमीवर आरक्षण सोडतीच्या दुसऱ्याच दिवशी प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांने स्वखर्चातून गावातील बंद पडलेले स्ट्रीटलाईट सुरू करून बसस्थानक परिसरासह आठवडी बाजारात रोषणाई केली. त्यामुळे अनेक दिवसांपासून अंधारात असलेल्या या परिसरात पुन्हा प्रकाश पडल्याचे चित्र दिसून आले.

आसेगावात निवडणुकीचे पडघम

तत्कालीन खासदार आनंदराव अडसूळ यांच्या कार्यकाळात आसेगाव पूर्णा बसस्थानकासह गावातील विविध ठिकाणी गाजावाजा करून स्ट्रीटलाईट लावण्यात आले होते. मात्र, काही दिवसांतच देखभाल व दुरुस्तीअभावी हे दिवे बंद पडले. बसस्थानक परिसरातील स्ट्रीटलाईट सुरू करण्याबाबत ग्रामपंचायतीकडे विचारणा केली असता, त्याच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च ग्रामपंचायत उचलू शकत नसल्याचे उत्तर मिळाल्याचे काही ग्रामस्थांनी सांगितले.

दरम्यान, आसेगाव बसस्थानक हे दिवसभर प्रवासी, व्यापारी आणि नागरिकांच्या वर्दळीचे ठिकाण आहे. मात्र, रात्रीच्या वेळी येथे अंधाराचे साम्राज्य पसरलेले असायचे. काही दिवसांपूर्वीच याच परिसरात चोरट्यांनी पानटपऱ्या, हॉटेल आणि डेली नीड्सचे दुकान फोडून चोरी केली होती. अंधाराचा फायदा घेत घडलेल्या या घटनांमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांने पुढाकार घेत स्वखर्चातून बसस्थानकावरील मुख्य चौकातील बंद स्ट्रीटलाईट सुरू केले. तसेच आसेगावच्या आठवडी बाजारात बंद अवस्थेत असलेल्या दिव्यांचीही दुरुस्ती करून बाजार परिसर प्रकाशमान केला. त्यामुळे नागरिक व व्यापाऱ्यांना रात्रीच्या वेळी मोठा दिलासा मिळाला आहे. स्वखर्चातून सार्वजनिक ठिकाणी प्रकाशाची व्यवस्था करणाऱ्या कार्यकर्त्यांने ग्रामस्थांच्या प्रश्नांना प्राधान्य देत गावात विकासाची गंगा आणण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. येणाऱ्या निवडणुकीत ग्रामस्थांनी सहकाऱ्यांना भरघोस मतांनी निवडून दिल्यास ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध विकासकामे करून आसेगाव ग्रामपंचायतीला आदर्श स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केल्याचे ग्रामस्थांमध्ये बोलले जात आहे.

विद्यापीठात संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे सामूहिक वाचन

अमरावती/का.प्र.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात 'भारतीय संविधान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली संविधान उद्देशिकेचे सर्व संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन केले.

कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, व्यवस्थापन



परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. अरुणा वाडेकर, आय.क्यू.ए. सी. संचालक डॉ. संदिप वाघुळे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी मेणबत्ती प्रज्वलन आणि संविधान उद्देशिका शिल्पाला पुष्पार्पण करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. संचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे व आभार डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. अरुणा वाडेकर यांनी मानले.

मतदानाच्या जनजागृतीसाठी निबंध, प्रश्नमंजुषा स्पर्धा

शाळा व महाविद्यालयांनी सहभागी होण्याचे आवाहन

अमरावती/का.प्र.

तरुण मतदारांमध्ये लोकशाही मूल्ये, मतदानाचे महत्त्व, मतदारांचे अधिकार व कर्तव्ये आणि निवडणूक प्रक्रियेबाबत जनजागृती करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमधील निवडणूक साक्षरता क्लबच्या माध्यमातून निबंध आणि प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार स्पर्धेला १७ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र, निर्भय व जागरूक मतदानाची भावना रुजवून लोकशाहीच्या बळकटीकरणात युवा पिढीचा सक्रिय सहभाग वाढवणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. निवडणूक साक्षरता क्लब समन्वयक हे १८ ते २७ नोव्हेंबर दरम्यान संस्थास्तर व प्रत्येक स्पर्धेतून २ विद्यार्थ्यांची निवड करतील.

मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय हे ७ ते १२ डिसेंबर दरम्यान विधानसभा मतदारसंघ स्तर व प्रति मतदारसंघ १० विद्यार्थ्यांची निवड करतील. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय हे जिल्हा स्तर अंतिम फेरी दि. १४ ते १८ डिसेंबर दरम्यान घेतील. जिल्हा, विधानसभा व संस्था स्तरावर निकाल जाहीर करणे व प्रमाणपत्र वाटप हे दि. १९ ते २२ डिसेंबर दरम्यान करण्यात येईल. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय हे जिल्हास्तरीय अंतिम निकाल हे २३ डिसेंबर २०२६ पर्यंत जाहिर करतील.

जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांनी या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवावा, तसेच विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होऊन लोकशाहीविषयी आपले ज्ञान वाढवावे आणि आपल्या कुटुंबात व समाजात मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी केले आहे.

मराठी भाषा व तत्त्वज्ञान अध्ययन केंद्रात संविधान दिन उत्साहात

अमरावती - महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा अंतर्गत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी मराठी भाषा व तत्त्वज्ञान अध्ययन केंद्र, रिद्धपूर येथे भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी केंद्र प्रभारी डॉ. मेश्राम, प्रा. सावळे तसेच केंद्र कर्मचारी, विद्यार्थी यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

गणेशोत्सव आणि दुर्गोत्सवाला समाजप्रबोधनाची जोड

मेळघाट/वार्ताहर

सण-उत्सव हे केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक न राहता समाजात सकारात्मक विचार रुजविण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकतात, याचा प्रत्यय धारणी पोलीस ठाण्याच्या उपक्रमातून आला आहे.

गणेशोत्सव आणि दुर्गा उत्सवादरम्यान सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करणाऱ्या तसेच पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरे करणाऱ्या मंडळांची निवड करून त्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. उप अधीक्षक माधव गरुड आणि धारणी पोलीस ठाण्याचे ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांनी या उपक्रमात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.



धारणी पोलिसांकडून उत्कृष्ट मंडळांचा सन्मान

धारणी पोलीस स्टेशनमधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनीही पूर्ण सहभाग नोंदवत अभियानाच्या अंमलबजावणीत सहकार्य केले.

उत्सवांच्या काळात मंडळांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये विविध विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. व्यसनमुक्ती, हेल्मेटचा वापर, बालविवाह प्रतिबंधक कायदा, हुंडाबंदी, वाहतूक नियमांचे पालन आणि दारूमुक्त समाज या विषयांवर जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात मंडळांनी डीजे साऊंड सिस्टीमचा वापर टाळून पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरे करण्यास प्राधान्य दिले. त्यामुळे धार्मिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच सामाजिक भान जपण्याचा संदेशही नागरिकांपर्यंत पोहोचला.

धारणी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील गणेशोत्सव मंडळांमधून उत्कृष्ट कार्याच्या आधारे पुढील मंडळांची निवड करण्यात आली. प्रथम क्रमांक – त्रिनेत्र गणेश मंडळ, धारणी. द्वितीय क्रमांक – जय मुठवा बाबा गणेश मंडळ, बैरागड. तृतीय क्रमांक – सार्वजनिक गणेश मंडळ, राणामालूर.

दुर्गा उत्सवादरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मंडळांनाही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक मेळघाट की राणी दुर्गा उत्सव मंडळ, धारणी. द्वितीय क्रमांक-नवदुर्गा उत्सव मंडळ, हरिसाल. तृतीय क्रमांक – न्यू दुर्गेश्वरी मंडळ, टिटंबा. या सर्व मंडळांना अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या वतीने प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

चांदूर रेल्वेच्या शेतशिवारात चोरट्यांचा धुमाकूळ!

■ दोन पाणबुडी, मोटारी, केबल, स्प्रिंकलरचे पितळी नोझल व पाईपही चोरीला ■ शेतकरी दुहेरी संकटात

चांदूर रेल्वे/वार्ताहर

परिसरातील शेतशिवारात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून शेतकऱ्यांच्या शेती उपयोगी साहित्याच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. येथील शेतकरी विजय पुंडलिक गोखे यांच्या शेतातील मागील पंधरा दिवसांत लोबी कंपनीच्या दोन सबमर्सिबल पाणबुडी मोटारी चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे.

केवळ पाणबुडी मोटारीच नव्हे, तर मोटारींच्या केबल,



स्प्रिंकलरचे पितळी नोझल, पाईप तसेच शेतीसाठी लागणारे इतर साहित्यही चोरट्यांकडून चोरले जात असल्याचे समोर येत आहे. शेतीच्या सिंचन व्यवस्थेसाठी आवश्यक असलेले साहित्य चोरीला जात असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून शेतीच्या कामांमध्येही अडथळे निर्माण होत आहेत.

विशेष म्हणजे, अशा चोरीच्या घटनांबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल केली असता अनेकदा केवळ अदखलपात्र स्वरूपात तक्रारींची नोंद केली जात असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे चोरट्यांवर कोणताही वचक निर्माण होत नसल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. वारंवार चोरीच्या घटना घडत असतानाही ठोस कारवाई होत नसल्याने चोरट्यांचे मनोबल वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

पोलिस प्रशासनाने या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन चोरट्यांचा शोध घ्यावा, शेतशिवारात रात्रीची गस्त वाढवावी आणि अशा चोरीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. त्याचबरोबर तहसीलदार व तहसील प्रशासनानेही शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे जातीने लक्ष घालून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधावा.



सोनियांचे आत्मवृत्त

सोनिया गांधींचे आत्मवृत्त 'Belonging' सध्या वाचतोय. यातील सुरुवातीची अर्धीअधिक पाने वाचून झाली. त्यांच्या माहेरच्या कुटुंबाचे वर्णन, राजीवची भेट व प्रेम बहरणे, राजीवचे इटलीत जाऊन सोनियांच्या पालकांना भेटणे, पुढे सोनियांचे भारतात येणे, विवाह, इथल्या चालीरीती शिकणे, अन्नाची सवय करून घेणे, इंदिरा गांधींना व्यक्तिगत कामात मदत करणे इत्यादी मजकूर या भागामध्ये आलेला आहे. तो वाचून जाणवलेले ठळक मुद्दे असे..





राजीवच्या विषयी स्वतःच्या घरी कळविण्याची हिम्मत मात्र सोनिया मध्ये नव्हती. आईला पत्र पाठवू शकली असती. पण आईने लगेच वडिलांना सुद्धा ती माहिती दिली असती आणि संतापलेल्या वडिलांनी सोनियाला ताबडतोब घरी निघून येण्याचा हुकुम दिला असता.इस्टर च्या सुट्यांमध्ये सोनिया इटलीला घरी गेली असताना सुद्धा याबाबत बहिणीखेरीज घरातल्या इतर कोणाशीही बोलण्याची तिची हिम्मत झाली नाही. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि शिस्त यावर तिच्या पित्याचा भर असायचा.ते आधी सैन्यात होते.जर्मन सैन्यासोबत रशियामध्ये जाऊन युद्धात सामील झाले पण १९४३ साली त्यांच्या सैन्याचा पराभव झाला आणि रशियातून माघार घ्यावी लागली. परंतु त्यांनी गाजविलेल्या पराक्रमामुळे त्यांना 'मायनो-द-लॉयन' म्हटले जायचे. रशियन स्त्रियांचा विनयभंग करू पाहणाऱ्या स्वतःच्या सैनिकांना त्यांनी शिक्षा दिली होती. आपल्या मुलींची नावे देखील त्यांनी रशियन मुलींच्या नावांवरून ठेवली. सोनिया आणि अनुष्का ही नावे इटली साठी परकी होती.

टर्म संपल्यानंतर सोनिया पुन्हा घरी आली पण तेव्हाही तिला राजीव संबंधी सांगण्याची हिम्मत होत नव्हती. केम्ब्रिज ला परतण्याचा आग्रह ती धरू लागली तेव्हा वडिलांना संशय येऊ लागला. तिच्या केम्ब्रिज च्या प्राचार्यांचे त्यांना पत्र आले व त्यात सोनिया अभ्यासाबाबत गंभीर नाही असे कळवले होते. वडिलांसाठी ते धक्कादायक आणि अपमानास्पदही होते. तिच्या बेजबाबदारपणाबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला आणि पुन्हा केम्ब्रिजला जायला मनाई केली. आईला वडिलांनी खडसावून विचारल्यानंतर कुठलातरी दूरचा एक मुलगा सोनियाच्या आयुष्यात आल्याचे त्यांना समजले. टेबलावर मुठ आपटून वडील ओरडले 'फार झाले ! आता असलं काही पुन्हा ऐकून घेणार नाही.' सोनियाचे हृदय विदीर्ण झाले. काही दिवस निराश होऊन तिने स्वतःला खोलीत कोंडून घेतले. पण नंतर हिम्मत करून ती सारखी रडत रडत घरभर आईचा पिच्छा करू लागली आणि आमच्या मैत्रीत काहीही चुकीचे नाही असे आईने वडिलांना समजावून सांगावे म्हणून प्रयत्न करत राहिली. आई तर घाबरूनच जायची.

भाग- ३

तिकडे केम्ब्रिज मध्ये राजीवसुद्धा हताश झाला होता. दिवसाआड पत्र लिहून तो सोनियाला पालकांशी बोलण्याचा आग्रह करत असे.इटलीच्या कायद्यानुसार २१ वर्षे वयापर्यंत सोनिया पालकांच्या अनुमतीशिवाय कोणताही निर्णय घेऊ शकत नसे आणि ती तर फक्त १९ वर्षांचीच होती. दोन वर्ष थांबणे भाग होते. सोनियाचा हट्ट वाढत गेला. अखेर वडिलांनी तिला पुन्हा केम्ब्रिजला शिक्षणासाठी परतण्याची परवानगी काही अटींवर दिली.यावेळी तिला विमानाने नव्हे तर ट्रेनमध्ये बसून जावे लागले.तिथे एका नवीन कॉलेज मध्ये दाखला मिळाला. नव्या घरात राहावे लागले. घरमालकीण भाडे घेणार नाही पण नंतर तिची मुलगी सोनियाच्या घरी काही काळ राहायला येईल आणि सोनियाच्या हालचालींची माहिती पत्राने घरी कळविण्यात येईल, असे काहीसे ठरले होते. राजीव आणि सोनिया पुन्हा भेटू लागले, एकत्र फिरू



लागले, संगीताचे कार्यक्रम, नृत्यप्रकार आणि नाटकांचा सोबत आस्वाद घेऊ लागले. राजीवला फोटोग्राफीचा शौक होता. इंजिनीयरिंगच्या शिक्षणासाठी लंडनला त्याने १९६६ साली प्रवेश घेतला. परंतु सोनियाला भेटण्यासाठी केम्ब्रिजला येत जात राहिलाच. संजय सुद्धा त्या वेळी रोल्स रॉईस कंपनीत अॅप्रेंटिसशीप करत होता. तो ही लंडनला अधूनमधून येत असे. जानेवारी १९६६ मध्ये राजीवची आई भारताची पंतप्रधान झाली. दोन्ही मुलांना ते नको होते. आईने आजोबांसोबत खूप काम केले आहे, आता तिने शांत जीवन जगावे असे राजीवला वाटायचे. इतकी मोठी जबाबदारी आईवर येऊन पडल्यामुळे आपण तिच्या सोबत असावे असे राजीवचे मत झाले आणि त्याने इंजिनीयरिंगचे शिक्षण सोडून वैमानिकाचे प्रशिक्षण घेण्याचे ठरविले. भारतात परतल्यानंतर नागरी हवाई सेवेत पायलटची नोकरी धरावी असा त्याचा विचार होता. त्यानंतर विवाह करता येईल. वैमानिक प्रशिक्षणासाठी द्यावे लागणारे शुल्क सुद्धा राजीव छोटी मोठी कामे करून मिळवत असे.भारतात परतण्यापूर्वी इटलीला सोनियाच्या घरी जाऊन तिच्या पालकांना भेटण्याची राजीवची तीव्र इच्छा होती.

आश्चर्याची बाब म्हणजे आपली मुलगी एवढ्या मोठ्या देशाच्या पंतप्रधानांची सून होणार याचे कोणतेही अप्रूप सोनियाच्या पालकांना नव्हते.दूरचा अनोळखी देश, तिथल्या चालीरीती माहित नाहीत. अशा ठिकाणी मुलीला पाठवायची सोनियाच्या वडिलांची मुळीच इच्छा नव्हती. परंतु लाडक्या मुलीचा हा हट्ट त्यांना मानावाच लागला की राजीवला एकदा त्यांच्या भेटीला येऊ द्यावे. सोनियाने २१ वर्षे पूर्ण केल्यानंतरच भारतात जाऊन परिस्थिती पहावी व निर्णय घ्यावा असे वडिलांनी राजीवच्या भेटीनंतर बजावले. सोनियाचा विसावा वाढदिवस तिच्या घरी साजरा करून राजीव भारतात परतला. (क्रमशः)

किशोर देशपांडे
मो.९८८१५७४९५४

लिंबाळेंचे दुःख दुधारी तलवारीसारखे आहे कारण त्यांना सवर्ण समाजातही स्थान नव्हते आणि दलित समाजातही पूर्ण स्वीकार नव्हता; ते दोन्ही बाजूंनी बहिष्कृत आहे. ही अक्करमाशी' स्थिती पुस्तकाच्या मध्यवर्ती वेदनेचे कारण आहे.

'अक्करमाशी' आत्मकथन

मराठी दलित साहित्यातील एक मैलाचा दगड

शरणकुमार लिंबाळे यांची येत्या जानेवारीत होणा-या १००व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यानिमित्याने शरणकुमार लिंबाळे यांच्या गाजलेल्या 'अक्करमाशी'चे समीक्षणात्मक टिपण!

१९८४ मध्ये प्रकाशित झालेल्या 'अक्करमाशी'मधून शरणकुमार लिंबाळेंनी आपली भळभळती जखम शब्दबद्ध केली. आमच्या सोलापूर जिल्ह्यातील हुन्नूर गावचा त्यांचा जन्म. मराठी कानडी बहुभाषिक असणारा हा परिसर. त्यांचा जन्म महार जातीतल्या आईच्या पोटी, मसामाईच्या पोटी झालेला आणि जातीचा हा बाभूळकाटा दुहेरी होता! सवर्ण समाजातील लिंगायत जातीचे हणमंत लिंबाळे हे त्यांचे जन्मदाते. मसामाई आणि हणमंत यांच्या संबंधातुन त्यांचा जन्म. वडील जमीनदार आणि आई भूमिहीन, उपेक्षित! दोन्ही बाजूंच्या समाजाने या संबंधाला अनैतिक ठरवले आणि शरणकुमारला 'अक्करमाशी' म्हणून हिणवले.

'अक्करमाशी' ही शरणकुमार लिंबाळे यांची आत्मकथा. 'अक्करमाशी' म्हणजे अनौरस संतती; ज्याला वडिलांचे नाव धारण करण्याचा अधिकार लाभला नाही, ज्याला समाज मान्य करत नाही. आजही ग्रामीण महाराष्ट्रात हा शद्ब प्रचलित आहे यावरून काय ते ओळखावे. असो. 'अक्करमाशी' वाचताना आपण हताश होतो, दुःखाने गदगदून येतं. पानापानांतून लिंबाळेंच्या आईचा आणि पर्यायाने दलितांचा, महिलांचा आणि हक्काच्या अस्तित्वाशिवाय वाढलेल्या शरणकुमारांचा संघर्ष आपल्याला व्याकुळ करतो.मसामाईसारख्या स्त्रियांना सवर्ण पुरुषांनी लैंगिक शोषण करून पुढे समाजाने 'रांड' ठरवले याचा उद्वेग अस्वस्थ करवतो. लिंबाळे स्वतःला, आईच्या शोषणाचे फळ म्हणवतात! जाती आणि लिंगभेदाचे हे दुहेरी शोषण त्यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडलेय.

आई मसामाईला गावातील पाटीलाने दासीसारखे वागवले. तिला 'रांड' म्हणून हिणवले जायचे याचे सल शरणुच्या मनात कायमचे राहतात. त्यांची आजी संतामाई आणि समाजातील इतर स्त्रियांचे जीवनही तितकेच यातनामय होते, भलेही त्यांच्या नात्यांना नावं होती तरीही त्यांचे आयुष्य कारुण्यात्मकच होतं. भूक, अपमान, जातीय भेदभाव हे लिंबाळेंच्या रोजच्या जगण्याचे भाग होते. शाळेत आणि गावात त्यांना हेतुतः 'अक्करमाशी' म्हणून टोमणे मारले जात. त्यांनी प्राथमिक शिक्षणापासूनच जातीय विषमतेचा सामना केला. त्याचीही कैफियत ह्या पुस्तकात आहे.

'अक्करमाशी' हा केवळ एका जातीचा, एका स्त्रीचा, एका आईचा आणि तिच्या मुलाचा संघर्ष नसून ज्यांचे अस्तित्व अधांतरी राहते त्यांच्या शोधयात्रेची सल आहे,जी कोणत्याही संवेदनशील माणसाला टोकरत राहते. मी कोण आहे, माझे वडील कोण आहेत, माझी जात कोणती आहे हे प्रश्न शरणकुमारना आयुष्यभर सतावत राहिले. त्याची धग आत्मकथेत टोकदारपणे जाणवते.

आपल्याकडे समाजाची उतरंड अनेक स्तरावर मांडली जाते. वर्ण, जात, गोत्र,धर्म, भाषा, प्रांत, लिंग अशा अनेक कॅटेगरीजचा आधार घेतला जातो. मात्र एक गोष्टीवर फोकस करणे चलाखीने टाळले जाते आणि ती म्हणजे कोणत्याही उतरंडीच्या तळाशी जो वर्ग असतो त्याच्याही खाली आणखी एक घटक असतो जो त्या सर्वात खालच्या वर्गातील स्त्रियांचा असतो! लिंबाळेंनी हा मुद्दा अतिशय जोरकसपणे मांडला असला तरी त्याला टिपिकल फेमिनिस्टीक शेडपासून दूर ठेवलेय.

'अक्करमाशी' हे आत्मकथन मराठी दलित साहित्यातील एक मैलाचा दगड मानले जाते. दया पवारांचे 'बलुतं', बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं' यांच्याबरोबरच या पुस्तकाने दलित आत्मकथनाची परंपरा अधिक तीव्र आणि प्रामाणिक बनवली.लिंबाळेंचे दुःख दुधारी तलवारीसारखे आहे कारण त्यांना सवर्ण समाजातही स्थान नव्हते



आणि दलित समाजातही पूर्ण स्वीकार नव्हता; ते दोन्ही बाजूंनी बहिष्कृत आहे. ही 'अक्करमाशी' स्थिती पुस्तकाच्या मध्यवर्ती वेदनेचे कारण आहे. बटबटीतपणाला फाटा देऊन संयत शैलीत लिंबाळे स्वतःला उलगडत जातात आणि वाचणारा सोलून निघतो. त्यांची भाषा अत्यंत साधी, प्रवाही असली तरी तिची शैली थेट भिडणारी आहे. साहित्यिक अलंकार किंवा सुंदर वाक्यरचना येथे दुय्यम आहेत. अनुभव इतके भीषण आहेत की भाषा स्वतःच वेदनेची वाहक बनते. ही शैली दलित साहित्याच्या, अनुभवप्रामाण्याच्या तत्त्वाला पूर्ण न्याय देते.

'अक्करमाशी'वर बरेच घमासान झाल्यावर काहींनी आक्षेप नोंदवला होता की, पुस्तकाच्या शेवटच्या टप्प्यात लिंबाळेंना, शिक्षण आणि नोकरी मिळाल्यानंतरही उच्चवर्णीय स्वीकृतीची अपेक्षा ठेवल्यासारखे काही भाग आहेत. त्याचबरोबर वैयक्तिक लिंबाळेंनी जगलेली वेदना इतकी तीव्र आहे की, व्यापक सामाजिक-राजकीय विश्लेषणाकडे त्यांनी कमी फोकस केलेय. मात्र वास्तवात हेच ह्या पुस्तकाचे भक्कम गुणलक्षण आहेत, ज्यामुळे ते अधिकाधिक सच्चे झालेय.

'अक्करमाशी' हे फक्त एका व्यक्तीचे आत्मकथन नाहीये. जातीव्यवस्थेने निर्माण केलेल्या अमानुषतेचा तो काटेरी दस्तावेज आहे. शरणकुमार लिंबाळे यांनी



आपल्या वैयक्तिक वेदनेला सामूहिक वेदनेत रूपांतरित केलेय. हे पुस्तक वाचल्यानंतर वाचक अस्वस्थ होतो, आणि ही अस्वस्थताच या कलाकृतीचे यश आहे. मराठी दलित साहित्यात या पुस्तकाने 'मी कोण?' हा प्रश्न नव्याने उपस्थित केला आणि तो प्रश्न आजही प्रासंगिक आहे.

'अक्करमाशी'मधील काही हृदयद्रावक प्रसंग एकदा वाचल्यानंतर विसरणे कठीण आहे. ह्या आत्मकथेची सुरुवातच एका अत्यंत वेदनादायी प्रसंगाने होते. शाळेच्या सहलीत सवर्ण मुले आपल्या डब्यातील पदार्थ खातात. उरलेले अन्न ते फेकून देतात. लहान शरणकुमार ते उष्टे खरकटे गोळा करून आपल्या फाटक्या कपड्यात बांधून घरी आणतो. घरी आजी आईसाठी ते अन्न आणणे, हा त्याच्यासाठी आनंदाचा क्षण असतो. भुकेचे हे रौद्र रूप वाचताना कोणताही संवेदनशील माणूस अस्वस्थ होतो.

आठवडे बाजारचा एक प्रसंग असाच अंगावर येणारा आहे. बाजार संपल्यावर केळीच्या हातगाड्यापाशी केळी खाऊन त्यांच्या साली फेकून देतात. शरणकुमारची निरागस बहीण, वानी त्या साली गोळा करून खात बसते. तो रागाने तिला मारतो आणि साली फेकून देतो. पण क्षणार्धात त्याचे मन बदलते. तो स्वतः त्या मातीत माखलेल्या साली घेऊन नदीकिनारी जातो, स्वच्छ करून खाऊ लागतो. शिक्षकांना येताना पाहून तो घाईघाईने साली फेकून देतो. हा प्रसंग अत्यंत हृदयद्रावक आहे.ह्या पुस्तकात शरणकुमारांची आई आपल्याला शब्दशः भेटते. ती विचार करण्यास भाग पाडते. 'आई अस्पृश्य, बाप सवर्ण! आई झोपडीत, बाप माडीत. बाप जमीनदार, आई भूमिहीन. आणि मी अक्करमाशी' असा सल लिंबाळे मांडत असले तरी त्यात विद्रोहापेक्षा कारुण्य अधिक आहे!

आई मसामाईला पाटलाने दासीसारखे वागवले, गावाने तिला हिणवले ह्याविषयी लिंबाळे नेमके भाष्य करतात. ते लिहितात की, 'आईला दोन गोष्टींमध्ये अडकवले होते, भाकर आणि लैंगिक शोषण!' पोटासाठी अस्तित्व पणाला लावणाऱ्या आईचे दुःख त्यांना आयुष्यभर सतावते. तरुण शरणकुमार शेवंता नावाच्या मुलीच्या प्रेमात पडतो. पण तो अक्करमाशी असल्याने ते नाते पुढे जाऊ शकत नाही. एकदा पाणी उधळताना शेवंता म्हणते, 'शरण, मला भिजवू नकोस. माझ्याकडे बदलण्यासाठी दुसरे कपडे नाहीत.' हे साधे वाक्य त्याच्या मनाला तीव्र वेदना देऊन जाते.

लिंबाळेंची आजी संतामाई दारोदार फिरून जोगवा मागत असे. कधी कधी मृत जनावरांचे मांस किंवा शेणातून गोळा केलेले ज्वारीचे दाणे भाजून भाकर करून खावी लागे. भुकेपोटी अशा टोकाच्या गोष्टी कराव्या लागल्याची वर्णने अत्यंत तीव्र आहेत. एका प्रसंगातले वर्णन अगदी भेदक आहे. खेड्यांनी गुरांनां जुंधळ्याची टाटं खाऊ घातली जातात. बऱ्याचदा त्यांच्या शेणातून ज्वारीचे कण जसेच्या तसे पडतात. लहानगा शरणु शेणातली ज्वारी गोळा करण्याचे काम करत असतो. ती ज्वारी भाकरी करण्यासाठी वापरली जाते, मात्र भाकर खाताना तिला शेणकुटाचा वास येतो!

हा दर्प लिंबाळेंचा पिच्छा सोडत नाही. लिंबाळेंनी त्यामागच्या गंधभारित जगाला शब्दात पकडलंय! ती त्यांच्या आयुष्याची सल आहे, जगण्याची वीण आहे, जन्मखूण आहे आणि सरतेशेवटी त्यांच्या कारुण्याष्टकाचे मातृस्तोत्र आहे! कदाचित यामुळेच, त्यांच्या लेखनाचा बाज विद्रोहाचा अथवा आक्रमकतेने सवाल करण्याचा नसून कारुण्यात्मकतेने ते अन्यायाचे, दुःखाचे पदर उलगडत जातात. प्रस्थापितांना थेट टक्कर देण्याची भाषा त्यांची पात्रे क्वचित करतात, विषमता आणि शोषण ह्यावर ते बोलतात मात्र त्यांनी लिपी जवळिकीची आणि क्षमेची आहे!

१०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली ही गोष्ट निश्चितच आनंदाची आहे.शरणकुमार लिंबाळेंना मनःपूर्वक शुभेच्छा!

-समीर गायकवाड

बालविवाह निर्मूलन विशेष दिन

मुलींच्या स्वप्नांना लग्नाची बेडी!



महाराष्ट्रातील वसमत तालुक्यातील एका जिल्हा परिषद शाळेत दहावीत शिकणाऱ्या अवघ्या १५ वर्षांच्या मुलीचा विवाह तिच्या पालकांनी २५ वर्षांच्या तरुणाशी ठरविला होता. मात्र,या अन्यायाविरुद्ध मुलीने थेट मुख्याध्यापकांकडे धाव घेत,'मला खूप शिकायचे आहे,माझे लग्न थांबवा!'अशी आर्त विनंती केली.तिच्या धाडसामुळे नियोजित बालविवाह रोखण्यात यश आले.ही घटना केवळ एका मुलीच्या संघर्षाची नाही,तर बालविवाहाच्या विरोधात उभे राहण्याची प्रेरणा देणारी आहे. दुर्दैवाने प्रत्येक मुलीला असा आवाज उठविण्याचे धाडस किंवा अनुकूल परिस्थिती मिळतेच असे नाही.

बालविवाहाची समस्या केवळ एखाद्या गावापुरती किंवा राज्यापुरती मर्यादित नाही. बालविवाह,कमी वयातील विवाह आणि जबरदस्तीने विवाहाच्या निर्मूलनासाठी संयुक्त राष्ट्रांने २७ नोव्हेंबर हा दिवस बालविवाह निर्मूलन विशेष दिन म्हणून घोषित केला तर २७ नोव्हेंबर २०२४ मध्ये याच दिवशी भारत सरकारने देशव्यापी बालविवाह मुक्त भारत अभियान सुद्धा सुरू केले होते.संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक स्तरावर झालेल्या प्रयत्नांनंतरही भारतासमोर हे मोठे आव्हान कायम आहे. देशात राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार, २०१९-२१ मध्ये २० ते २४ वयोगटातील २३.३ टक्के महिलांचे विवाह वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झाले होते. २०२३-२४ मधील सहाव्या सर्वेक्षणात हे प्रमाण घटून २०.१ टक्क्यांवर आले.ही घट समाधानकारक असली तरी समस्या संपलेली नाही.देशातील दर पाच मुलीपैकी जवळपास एकीचा विवाह बालवयात होत असल्याचे वास्तव अस्वस्थ करणारे ठरते.

महाराष्ट्रातही बालविवाहाचे प्रमाण १७.७ टक्के असल्याचे वृत्त आहे.देशातील सर्वाधिक बालविवाह होणाऱ्या देशातील ७० जिल्ह्यांपैकी १७ जिल्हे महाराष्ट्रातील आहेत. आदिवासी भागात मागील तीन वर्षांत १५ हजार बालमाता झाल्याची माहिती बालविकास मंत्र्यांनी अधिवेशना दरम्यान सभागृहात प्रश्नोत्तरांच्या काळात दिली होती.बालविवाहाच्या समस्येची गंभीरता आणि आकडेवारी केवळ संख्यात्मक माहिती नाही,तर हजारो मुलींचे हिरावले गेलेले बालपण आणि धोक्यात आलेले आरोग्य आहे.

बालविवाह रोखण्यासाठी कायदे आहेत.मुलींच्या विवाहाचे किमान वय १८ वर्षे आणि मुलांच्या विवाहाचे २१ वर्षे निश्चित करण्यात आले आहे.संयुक्त राष्ट्रांनी २०३० पर्यंत बालविवाहाचे पूर्ण निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.मात्र,केवळ कायदे करून किंवा जनजागृतीचे दिवस साजरे करून ही समस्या संपणार नाही.शाळाबाह्य मुलींची नोंद ठेवणे,त्यांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी शिष्यवृत्ती,सुरक्षित वसतिगृहे आणि वाहतुकीची सुविधा उपलब्ध करणे, ग्रामपंचायत स्तरावर बालसंरक्षण समित्या सक्रिय करणे आणि बालविवाह घडविणाऱ्यांवर कठोर कारवाई करणेआवश्यक आहे.त्याचबरोबर पालकांचे समुपदेशन आणि मुलींना स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शशिकांत तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ मो:९१३०८३५४५८

■ शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

अकोला
जिल्हा विशेष

पाणीटंचाईच्या नियोजनासाठी आ. देशमुख आक्रमक ; अधिका-यांना कामे पूर्ण करण्याचे निर्देश

पातूरला तीन दिवसांतून पाणी देण्याचे आदेश

१५ जानेवारीपूर्वी २४ आणि १६ खेडी पाणीपुरवठा योजना पूर्ण करा

■ प्रतिनिधी | पातूर ■

उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांनी दिले. पातूर तहसील कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित पाणीटंचाई आढावा बैठकीत पिण्याच्या पाण्याचे नियोजन, धरणांतील पाणीसाठा, टँकर व्यवस्था, विहीर अधिग्रहण आणि प्रलंबित पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

तालुक्यातील सहा जलप्रकल्पांमधील उपलब्ध पाण्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. सिंचनासाठी पाणी सोडताना पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे देशमुख यांनी स्पष्ट केले. रब्बी हंगामातील पिके आणि फळबागांसाठी आवश्यक पाणी सोडण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

तालुक्यातील २४ खेडी आणि १६ खेडी पाणीपुरवठा योजना येत्या १५ जानेवारीपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले. बंद असलेले हातपंप दोन दिवसांत दुरुस्त करण्याचे आदेश देतानाच, जानेवारीपूर्वीच विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव तयार करून सादर करण्याच्या सूचना ग्रामसेवकांना देण्यात आल्या. प्रशासक नियुक्त असलेल्या ग्रामपंचायतींच्या हद्दीतील बंद पाणीपुरवठा पाइपलाइनची तातडीने दुरुस्ती करावी.



निधीची अडचण असल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तो उपलब्ध करून घ्यावा, असेही त्यांनी बजावले.

पातूरला तीन दिवसांतून पाणीपुरवठा

पातूर शहरातील नागरिकांना पाणीटंचाईची झळ बसू नये, यासाठी दर तीन दिवसांनी नियमित पाणीपुरवठा करण्याचे निर्देश आमदार देशमुख यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तालुक्यातील संभाव्य टंचाई लक्षात घेता पिण्याच्या पाण्यासाठी १७२ टँकरचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या टँकरसाठी पाणी उपलब्ध व्हावे, याकरिता तालुक्यातील तलावांवर पाणी भरण्याची व्यवस्था करावी. गरज भासल्यास धरणातील पाणी कालव्याद्वारे सोडून तलावांमध्ये साठा उपलब्ध करून द्यावा, अशी सूचनाही करण्यात आली.

दरम्यान, आलेगाव येथील दोन वॉर्डांमधील पाणीसमस्या सोडविण्यासाठी आमदार निधीतून पाच लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. मोर्णा धरणाच्या पाण्याच्या आरक्षणासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारांचा मुद्दाही यावेळी उपस्थित करण्यात आला.

मोर्णा धरणाचे पाणी महानमध्ये वळविण्यास शेतकऱ्यांचा विरोध

मोर्णा धरणातील पाणी महान धरणात वळविण्याच्या प्रस्तावाला परिसरातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. मोर्णा धरणातील पाणी अन्यत्र वळविण्याऐवजी पातूर तालुक्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी आमदार नितीन देशमुख यांच्याकडे केली. स्थानिक गरजा पूर्ण झाल्यानंतरच पाण्याच्या अन्य नियोजनाचा विचार व्हावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या बैठकीला उपविभागीय अधिकारी परतणे, तहसीलदार राहुल वानखडे, गटविकास अधिकारी गुजर, सिंचन विभागाचे अधिकारी, कृषी अधिकारी वाशिमकर, तालुका पाणीपुरवठा अधिकारी मिलिंद जाधव, ग्रामसेवक आणि तलाठी उपस्थित होते. विविध विभागांच्या कामांचा आढावा घेताना आमदार देशमुख यांनी प्रलंबित कामांबाबत अधिकाऱ्यांना जाब विचारला. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा त्यापूर्वीच उपाययोजना पूर्ण करा, असा स्पष्ट इशारा त्यांनी प्रशासनाला दिला.

'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियान प्रभावीपणे राबवा!

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच शासकीय आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियान प्रभावीपणे राबवावे, असे निर्देश आमदार रणधीरभाऊ सावरकर यांनी दिले. या अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव व प्रोत्साहन करण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्याची सूचनाही त्यांनी केली.



ग्रामपंचायतींच्या गौरवासाठी विशेष कार्यक्रम घेण्याच्या सूचना

जिल्हा प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे गुरुवारी तालुकास्तरीय एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची सभा आमदार रणधीरभाऊ सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी तालुक्यातील शासकीय आरोग्य सेवांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय साधून आरोग्यविषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला.

सभेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल, तहसीलदार कुणाल झाल्टे, गटविकास अधिकारी मिलिंद मोरे, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापूराव पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सायली कांबळे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता मृणाली ढंगारे, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता गोपाल अग्रवाल, गटशिक्षणाधिकारी वर्षा कल्याणकर, बालविकास प्रकल्प अधिकारी वैशाली सांगळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

माता-बाल आरोग्य आणि लसीकरणाचा आढावा

सभेत माता व बाल आरोग्य, गरोदर मातांची नोंदणी, नियमित लसीकरण, एचपीव्ही लसीकरण तसेच क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत अभियानाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करताना कोणतीही पात्र लाभार्थी व्यक्ती शासकीय सुविधांपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे आणि आयुष्मान आरोग्य मंदिरांमधील सुविधांचा दर्जा उंचावण्याची गरज आमदार सावरकर यांनी अधोरेखित केली. आरोग्य संस्थांमधील औषधसाठा, अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, माता-बाल संगोपन सेवा, लसीकरण आणि असंसर्गजन्य आजारांची तपासणी या बाबींवर विशेष लक्ष देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा

शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजना आणि सुविधांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागासह शिक्षण, महिला व बालविकास आणि अन्य संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. केवळ योजनांची अंमलबजावणी न करता त्यांचा प्रत्यक्ष लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आमदार सावरकर यांनी तालुक्यातील विविध आरोग्य संस्थांमधील अडीअडचणी तसेच आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्याही जाणून घेतल्या. आवश्यक त्या ठिकाणी संबंधित विभागांच्या माध्यमातून सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. ग्रामीण आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करणे, आरोग्य सुविधांचा दर्जा सुधारणे आणि विविध विभागांच्या समन्वयातून आरोग्य संपन्न गावांची निर्मिती करणे, या उद्देशाने झालेली ही सभा सकारात्मक वातावरणात पार पडली.

पुणे-हावडा दुरंतोला अकोल्यात थांबा मंजूर



खा. अनुप धोत्रे यांच्या पाठपुराव्याला यश २८ नोव्हेंबरपासून थांबा सुरू होणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला रेल्वे स्थानकावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. पुणे-हावडा दुरंतो एक्सप्रेसला अखेर अकोला जंक्शनवर थांबा मंजूर झाला आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार अनुप संजय धोत्रे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत या महत्त्वपूर्ण निर्णयाला हिरवी झेंडी दिली आहे. येत्या २८ नोव्हेंबरपासून या गाडीचा अकोला स्थानकावरील थांबा सुरू होणार असल्याची माहिती आहे.

पुणे-हावडा दुरंतो एक्सप्रेसला अकोल्यात थांबा मिळावा, अशी मागणी रेल्वे प्रवाशांकडून सातत्याने केली जात होती. या मागणीसाठी खासदार अनुप संजय धोत्रे यांनी ९ जून २०२६ रोजी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र पाठवून अकोला जंक्शनवर थांबा देण्याची मागणी केली होती. या पत्राची दखल घेत रेल्वेमंत्र्यांनी गाडी क्रमांक १२२२१/१२२२२ पुणे-हावडा दुरंतो एक्सप्रेसला अकोला येथे थांबा मंजूर केल्याचे उत्तराद्वारे कळविले आहे. या निर्णयामुळे अकोला जिल्ह्यासह वऱ्हाडातील प्रवाशांना पुणे आणि हावडा या महत्त्वाच्या शहरांकडे जाण्यासाठी अधिक सोयीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. विशेषतः व्यावसायिक, नोकरदार, विद्यार्थी आणि नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांना या थांब्याचा मोठा फायदा होणार आहे.

अकोला रेल्वे स्थानकाचे महत्त्व लक्षात घेता दुरंतोसारख्या महत्त्वाच्या रेल्वेगाडीला थांबा मिळणे ही प्रवाशांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपलब्धी मानली जात आहे. खासदार अनुप धोत्रे यांच्या पाठपुराव्याला यश आल्याने रेल्वे प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

अ.भा.गुरुदेव सेवा मंडळास युनिव्हर्सल ब्रदरहूड पुरस्कार

अकोला : अ भा गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज मोझरी (जिल्हा अमरावती)' यांची पहिल्या 'युनिव्हर्सल ब्रदरहूड' (विश्वबंधुत्व) पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. 'विश्वबंधुत्व' आणि 'सर्व मानवांचे एकत्व' या संकल्पनांच्या प्रसारासाठी या संस्थेने दिलेल्या समर्पित योगदानाची दखल घेऊन हा पुरस्कार दिला जाणार आहे, अशी माहिती 'मराठी थिओसोफिकल फेडरेशन'चे अध्यक्ष ॲड. संजय पोते यांनी दिली.थिओसोफिकल सोसायटीच्या १५१ व्या स्थापना वर्षाच्या निमित्ताने, 'मराठी थिओसोफिकल फेडरेशन' आणि 'पुणे लॉज थिओसोफिकल सोसायटी' यांनी संयुक्तपणे या पुरस्कारांची घोषणा केली आहे. स्थापना दिनानिमित्त, ॲड. संजय पोटे अध्यक्ष, मराठी थिओसोफिकल फेडरेशन यांनी ही घोषणा अकोला येथे केली.

जाहीर नोटीस

लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ

(मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिट्रेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा. क्र. ९९१ दि. २६/११/२०२६

रेणुका भवन
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं ३५ / २अ - २व पुष्पक हॉटेल जवळ
पाईप लाईन रोड सावेडी अ. नगर
अहमदनगर ४१४००१
श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट
सोसायटी लि., अहमदनगर

विरूध्द **अर्जदार**

लवाद अर्ज क्रमांक	सामनेवाला क्रमसंक	सामनेवाला यांचे नाव व पत्ता
२६११/२०२६	**कर्जदार १.**	श्री श्रीमती इमरान अहमद जाफर अहमद मु.पो. ताज चौक इंदिरा नगर अकोट फैल शिवाजी पार्क अकोला ता जि अकोला
	जामीनदार २.	श्री श्रीमती शेख शकील शेख कमाल मु.पो. इंदिरा नगर अकोट फैल शिवाजी पार्क अकोला ता जि अकोला
	जामीनदार :	३. श्री / श्रीमती शेख जाहेद शेख समद मु.पो. भारत नगर अकोट फैल नायगाव अकोला ता जि अकोला
२६७१/२०२६	**कर्जदार :**	१. श्री श्रीमती दशरथ महादेव गायकवाड मु.पो. नवीन वस्ती पो. दोनवाडा अकोला ता जि अकोला
	जामीनदार :	२. श्री श्रीमती सुभाष गुलाबराव पवार मु.पो. दोनवाडा अकोला ता जि अकोला
	जागीनदार :	३. श्री श्रीमती शंकर संतराम गायकवाड मु.पो. दोनवाडा अकोला ता जि अकोला

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व साम्नेवाले यांना कळविण्यात येते की अर्जदार यांनी तुमचेविरुध्द वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कमी आपण दिनांक १२/१२/ २०२६ रोजी ठिक सकळी ११.०० वा. लवाद कार्यलयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी / एकतर्फी हुकुम करण्यात येईल याची नोद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्यानीशी दिले असे.

शिक्का **ॲड. तनपुरे गोविंद दशरथ लवाद अधिकरी**

Change In Name

Old passport no P4224006
I have chenge my name from
MOHAMMAD TAUSIF MOHAMMAD TAUFIQUE GAZI -To-
MOHAMMAD TAUSIF MOHAMMAD TAWFIQUE GAZI
My Residential Address is KAYANAT COTTAGE KHARAP ROAD GANGA NAGAR WASHIM BYEPASS AKOLA-444003

जनमाध्यम प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३४१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

पोदार प्रेप स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन

अकोला : पोदार प्रेप, अकोला येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात, पार पडले. यंदाच्या स्नेहसंमेलनाची संकल्पना 'जम्बोज आयुर्वेद ?डक्वेंचर' अशी होती. या अनोख्या संकल्पनेच्या माध्यमातून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा असलेल्या आयुर्वेदाचे महत्त्व आपल्या नृत्य आणि नाटिकांमधून प्रभावीपणे सादर केले.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपअधीक्षक सुदर्शन पाटील उपस्थित होते.

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१५७७/२०२६ प्रोसेस नं.११९११/२०२६
चौ.ता. ०४/१२/२०२६ दिनांक : १९/०९/२०२६

अर्जदार : निलकंठ संपत आगळे रा. पातूर नंदापूर, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल
मयताचा पत्ता :- मयत : सरोजीनी आत्माराम गिलबिले
पत्ता :- रा. पातूर नंदापूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सरोजीनी आत्माराम गिलबिले उर्फ सरोजीनी संपत आगळे यांचे दि. २२/०८/२०२६ रोजी पातुर नंदापूर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), बार्शिटाकळी जि. अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.२२३/२०२६ प्रोसेस नं.१४१७५/२०२६
चौ.ता. २२/१२/२०२६ दिनांक : २३/१०/२०२६

अर्जदार : १. सुधाकर नामदेव सिरसाट, वय ४६ वर्ष, धंदा - खाजगी नोकरी २. अनिल नामदेव सिरसाट, वय ५३ वर्ष, धंदा - शेती ३. मधुकर नामदेव सिरसाट, वय ४६ वर्ष, धंदा- शेती क. १ ते ३ रा. टेंभी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला ४. राजकन्या प्रकाश तायडे वय ५२ वर्ष, धंदा - गृहीणी रा. दगडपारवा ता. बार्शिटाकळी जि. अकोला ५. रंजना आनंद कांबळे, वय ४९ वर्ष, धंदा - गृहीणी रा. पांडव उमरा, पो. तांदळी शेवाई, ता. जि. वाशिम

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक
मयताचा पत्ता :- मयत : १. नामदेव आकाराम सिरसाट २ सिंधुबाई आकाराम सिरसाट रा. टेंभी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की. मयत १. नामदेव आकाराम सिरसाट, यांचा दिनांक २२/०९/२०२५ रोजी केअर हॉस्पीटल, कंडीया प्लॉट, जठारपेठ, अकोला व २. सिंधुबाई नामदेव सिरसाट यांचे दिनांक २१/०८/२०२६ रोजी टेंभी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दि २२/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार**
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), बार्शिटाकळी जि. अकोला

सावरखेड शिवारात गांजाच्या शेतीवर पिंजर पोलिसांचा छापा; ३७ लाखांचा मुद्देमाल जप्त!

■ प्रतिनिधी | पिंजर ■

अकोला जिल्ह्यात अवैध अमली पदार्थांच्या लागवड आणि विक्रीविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत नार्को स्ट्राईक मोहिमेत पिंजर पोलिसांनी सावरखेड शिवारात गांजाच्या शेतीवर धडक कारवाई केली. या कारवाईत गांजाची तब्बल ४४ झाडे जप्त करण्यात आली असून, त्यांचे एकूण वजन ७३ किलो ९५० ग्रॅम आहे. जप्त गांजाची अंदाजे किंमत ३७ लाख ४७ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी शेतमालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली २६ नोव्हेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. पिंजर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन राठोड यांना सावरखेड येथील शेतशिवारात गांजाची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून त्यांनी दोन पंच, राजपत्रित अधिकारी म्हणून नायब तहसीलदार आणि पोलीस पथकासह संबंधित शेतात छापा टाकला.



यावेळी शेतमालक देवराव काढनुजी अंभोरे (वय ५५, रा. सावरखेड, ता. बार्शीटाकळी) यांच्या शेतात गांजाची ४४ झाडे आढळून आली. पोलिसांनी पंच आणि राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाडांचा पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर नियमानुसार गांजा सीलबंद करण्यात आला. या प्रकरणी पिंजर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४७९/२०२६ अन्वये एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, प्रभारी

४४ गांजाची झाडे हस्तगत
७३ किलो ९५० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त
शेतमालक पोलिसांच्या ताब्यात

अपर पोलीस अधीक्षक निलेश पांडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत ठाणेदार गजानन राठोड, पोलीस उपनिरीक्षक अनिल इंगोले, सहायक पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल गजानन काळे, नागसेन वानखडे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल देवकते, भागवत गंजवे, राजेंद्र सावळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल मनीषा कांबळे, वैष्णवी भांडे आणि चालक होमगार्ड सूरज गावंडे सहभागी होते.

जाहीर सूचना

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. निखिल प्रल्हाद गिर्हे, रा. येवता रोड, मलकापूर, ता. आणि जि. अकोला यांच्या मालकी व अताब्यातील मौजे - मलकापूर, येथील शेत सर्वे नं. ३/३/३ (खरेदीने ३/३), अकृषक लेआउत मधील प्लॉट नं. ३, एकूण क्षेत्रफळ ५२५.०० चौ. मी. यावरील 'संकेत टावर अपार्टमेंट' इमारतीतल तळमजल्यावरील 'दुकान नं. ३' ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ १७.७५ चौ.मी. (म्हणजेच १९१.०० चौ. फूट) जमिनीतील अविभाजित हिस्सासह, ता आणि जि. अकोला; हे सदर मालमत्ता रजिस्टर बक्षिसपत्रने ज्याचा र. द. क्र. १७०४, दि. २७/०३/२०२६ अन्वये स्वप्निल प्रल्हाद गिरहे यांच्या कडून बक्षीस मिळाले आहे. सदर मालमत्तेची श्री पुरुशोत्तम रतनलालाजी महेश्वरी आणि श्री विजयकुमार पिखराज चौधरी यांच्या मधील जुनी मूळ खरेदी ज्याचा र. द.क्र. ३६२३, दिनांक २२/०७/२०१३ हि खदान ते सिंधी कॅम्प परिसरात त्यांच्या पिशवीतून पडून गहाळ झाला आहे. तसेच माझे पक्षकार सदर मालमत्तेवर JM Financial Home Loans Limited, अकोला शाखा मार्फत कर्ज घेत असून त्याकरिता नमूद मालमत्ता गहाण देत आहेत, म्हणून सदर गहाळ दस्ताची अत्यन्त अवशक्त आहे.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुटल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुटलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; अन्यथा सदर मालमत्तेवर कोणाचाही कुटल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.

तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुटलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- २६/११/२०२६

ॲड. गौरव शि. देशमुख
'वैष्णवी कॉम्प्लेक्स', फ्लॅट क्र. S4 (दुसरा मजला), गौरक्षण रोड, ता व जिल्हा - अकोला
संपर्क: ९०२८२३२२४६ / ९४०४०९२०२४ (W)

शनिवारी विदर्भ चेंबर सभागृहात जीएसटी चर्चासत्र

■ प्रतिनिधी | अकोला ■

विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री व अकोला अकाउंटंट असो.च्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि २८ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता विदर्भ चेंबर हॉल, श्रावगी टॉवर्स, टिळक रोड येथे ५७ व्या जीएसटी कौन्सिल बैठकीतील महत्त्वाच्या निर्णयांचा व्यवसायावर होणारा परिणाम या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.यात बिना जीएसटी नोंदणी असलेल्या पुरवठादाराकडून माल किंवा सेवा खरेदी करताना आरसीएम अंतर्गत ई इन्व्हाइसिंग ची नवीन व्यवस्था व त्याचे परिणाम' या प्रमुख विषयावर या सत्रात सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. या चर्चासत्रात तज्ज्ञ वक्ते म्हणून अँड गिरीश धाबलिया,सीए दीपक अग्रवाल व अँड धनंजय पाटील मार्गदर्शन करणार आहेत.हे सत्र व्यावसायिक ,उद्योजक आणि अकाउंटंट्स साठी विशेष उपयुक्त असून यामध्ये विना जीएसटी नोंदणी असलेल्या पुरवठादाराकडून खरेदी करताना आता काय करावे लागेल?,ई इन्व्हाइसिंग म्हणजे काय आणि ते तयार करण्याची सोपी प्रक्रिया कोणती?, खर्च, जीएसटी इनपुट आणि कर अनुपालनावर काय परिणाम होईल?, व्यवसाय आणि अकाउंट्समध्ये होणाऱ्या बदलांसाठी आत्तापासून कोणती तयारी करावी? आदींवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

दुष्काळी परिस्थितीनुसार पशुधनासाठी चारा नियोजन करा-ॲड.निलेश हेलोंडे

सिंचन प्रकल्पाच्या गाळपेर क्षेत्रातही चारा लागवड करावी

वर्धा/जनमाध्यम



संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी उपलब्ध सिंचन प्रकल्पाच्या गाळपेर क्षेत्रातही चारा पिकांची लागवड करून चारा उत्पादन वाढवावे, असे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी दिले.

ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांनी सेलू तालुक्यातील आमगाव येथील मदन उन्नई तलाव सिंचन प्रकल्पाच्या गाळपेर क्षेत्रास अधिकाऱ्यांसमवेत भेट देऊन पाहणी केली.पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ.जगदीश बुकतरे, तहसीलदार डॉ.शकुंतला पराजे, मृद संधारण अधिकारी तुरकाणे, गटविकास अधिकारी शीतल हिरवाळे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सहायक आयुक्त डॉ. निरंजन शेटे यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मदन उन्नई तलाव सिंचन प्रकल्पाचे सुमारे १० एकर गाळपेर क्षेत्र उपलब्ध असून, या क्षेत्रात चारा पिकांची लागवड केल्यास मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध होऊ शकतो. सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनीवर अधिकाधिक चारा लागवड करावी. त्यामुळे जिल्ह्यातील पशुधनाची चाऱ्याची गरज पूर्ण होण्यास मदत होईल आणि पशुधनाचे आरोग्य व उत्पादन टिकून राहील, असे ॲड. हेलोंडे पाटील म्हणाले. शेतकऱ्यांनी निराश न होता चारा उपलब्धतेचे नियोजन करावे. चाऱ्याअभावी जनावरांची गैरसोय होऊ नये, यासाठी जिल्ह्यातील कृषी, जलसंधारण व पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने सकारात्मक नियोजन करावे. तसेच जुलै २०२७ पर्यंत चारा उपलब्धतेबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. ज्वारी पिकाची कापणी केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या कडब्यातून नवीन अंकुरणाऱ्या गवतामध्ये हायड्रोसायनिक ॲसिड तयार होत असल्याने असे गवत जनावरांनी खाल्ल्यास विषबाधा होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी विशेष सतर्कता व खबरदारी घ्यावी. अधिकाधिक चारा उत्पादनासाठी नेपियर गवत किंवा न्युट्रीफिड बियाण्यांची लागवड करावी, असे आवाहनही ॲड.हेलोंडे पाटील यांनी केले.

कर्मचाऱ्यांचे केस उतरले, तरी कस्तुरबा प्रशासनाचे डोळे उघडेनात

ठिय्या आंदोलनाचा सहावा दिवस; २७ नोव्हेंबरपासून बेमुदत उपोषणाचा इशारा

वर्धा/जनमाध्यम



प्रलंबित सेवाविषयक आणि आर्थिक मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाकडे कस्तुरबा हेल्थ सोसायटीच्या व्यवस्थापनाने सहा दिवस उलटूनही दुर्लक्ष केल्याने कर्मचाऱ्यांचा संताप आता उफाळून आला आहे. व्यवस्थापनाच्या उदासीनतेचा निषेध करण्यासाठी बुधवारी आंदोलनकर्ते रोहित मेश्राम आणि अमोल कर यांनी चक्क मुंडन करून प्रशासनाचा निषेध नोंदविला. सहा दिवसांपासून सुरू असलेल्या ठिय्या आंदोलनाची दखल घेण्यास व्यवस्थापन तयार नसल्याने आता आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार संघटनेने केला आहे. २७ नोव्हेंबरपासून कर्मचारी बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचा इशारा संघटनेचे अध्यक्ष तुषार उमाळे यांनी दिला आहे.

कस्तुरबा हेल्थ सोसायटी, महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था आणि कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी संभाजी ब्रिगेड प्रणित कस्तुरबा हेल्थ सोसायटी नियमित कामगार संघटनेच्या वतीने २० नोव्हेंबरपासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले आहे. मात्र, आंदोलनाचा सहावा दिवस उजाडला तरी व्यवस्थापनाकडून चर्चेची किंवा निर्णयाची कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी मुंडन करून आपला रोष व्यक्त केला.

संघटनेने १६ ऑक्टोबर रोजी तब्बल ८२७ कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांसह सात प्रमुख मागण्यांचे निवेदन व्यवस्थापनाला सादर केले होते. यामध्ये पीएफ आणि सीपीएफची कपात पूर्ववत सुरू करणे, सर्व कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता लागू करून थकबाकी अदा करणे, प्रोबेशन आणि कन्फर्मेशनमधील अनियमितता दूर करणे, सार्वजनिक सुट्ट्यांचा लाभ देणे, निवृत्त कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे, सेवा पुस्तिकांच्या प्रमाणित प्रती देणे तसेच टाईम बाऊंड प्रमोशनमधील अनियमितता दूर करून प्रलंबित लाभ मंजूर करण्याच्या मागण्यांचा समावेश आहे.

या मागण्यांवर ३० ऑक्टोबरपर्यंत निर्णय घेण्याची मुदत व्यवस्थापनाला देण्यात आली होती. मात्र, मुदत संपल्यानंतरही कोणताही ठोस निर्णय झाला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला.संस्थेचे व्यवस्थापन आपण चॅरिटेबल ट्रस्ट आणि स्वायत्त संस्था असल्याने शासनाचे कायदे लागू होत नसल्याची भूमिका घेत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. दरम्यान, व्यवस्थापनाला २६ नोव्हेंबरपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत सर्व प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन लेखी आश्वासन द्यावे, अन्यथा २७ नोव्हेंबरपासून कर्मचारी बेमुदत उपोषणाला बसतील, असा निर्वाणीचा इशारा अध्यक्ष तुषार उमाळे यांनी दिला आहे. त्यामुळे आता कस्तुरबा प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन तोडगा काढणार की कर्मचाऱ्यांचे आंदोलन आणखी तीव्र होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

रब्बीच्या धांदलीत बिबट्याचे दर्शन; शेतकऱ्यांचा जीव मुठीत

किन्ही-जखाळा शिवारातील मुख्य रस्त्यावर बिबट्याचा वावर

सेलू/जनमाध्यम

रब्बी हंगामातील शेतीकामांची लगबग सुरू असतानाच सेलू तालुक्यातील किन्ही-जखाळा शिवारात बिबट्याचा वावर आढळून आल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास सेलू-हिंगणी मार्गावरील नन्यायला पेट्रोलपंपाजवळ बिबट्या थेट मुख्य रस्त्यावरून जाताना दिसला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

भाजपचे सेलू तालुका महामंत्री विकास मोटेमवार हे हिंगणी येथून सेलूच्या दिशेने येत असताना त्यांना अचानक बिबट्या रस्त्यावरून जाताना दिसला. बिबट्या समोर आल्याने त्यांना काही काळ वाहन थांबवावे लागले. काही क्षणांतच बिबट्याने लगतच्या शेतातून शिवाराच्या दिशेने धाव घेतली.सध्या रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्याची कामे सुरू आहेत. अनेक शेतकऱ्यांना सिंचनासाठी रात्रीच्या वेळी शेतात जावे लागते. अशातच सायंकाळी मुख्य रस्त्यावर बिबट्याचे दर्शन झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

जखाळा शिवारात मोठ्या प्रमाणात ओलिताची शेती असून, केळीचे पीकही घेतले जाते. या परिसरातून बोर नदी वाहत असल्याने पाण्याची उपलब्धता आणि दाट पिकांमुळे वन्यप्राण्यांना अनुकूल अधिवास मिळत असल्याचे सांगितले जाते. गेल्या काही वर्षांपासून या भागात बिबट्याचा वावर असल्याची चर्चा आहे. मात्र, आता थेट मुख्य रस्त्यावरच बिबट्या दिसल्याने नागरिकांमध्ये अधिक धास्ती निर्माण झाली आहे.वन विभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवावे. तसेच परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा देऊन आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी किन्ही-जखाळा परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.



समुद्रपूरनंतर आर्वीत गर्भाशयाच्या कर्करोगाविरोधात 'कॅन्सर कवच'

आर्वी, आष्टी, कारंजा व वर्धा तालुक्यांत मोफत एचपीव्ही लसीकरण मोहीम; खा. अमर काळे यांचा पुढाकार

वर्धा/जनमाध्यम



गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून मुली आणि महिलांचे संरक्षण करण्यासाठी वर्धा जिल्ह्यात मोफत एचपीव्ही लसीकरण मोहिमेला वेग आला आहे. समुद्रपूर तालुक्यात यशस्वीपणे मोहीम राबविल्यानंतर आता आर्वी आणि आष्टी तालुक्यांतही या उपक्रमाचा विस्तार करण्यात येत आहे. पुढील टप्प्यात कारंजा आणि वर्धा तालुक्यांचाही समावेश करण्याचे नियोजन असून,संपूर्ण वर्धा लोकसभा मतदारसंघात ही मोहीम राबविण्याचा मानस खा. अमर काळे यांनी व्यक्त केला.

मॅनकाइंड फार्माच्या सीएसआर उपक्रमांतर्गत काइंडकेअर फाउंडेशन आणि स्वस्थ वृक्ष फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'कॅन्सर कवच' ही मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ९ ते २६ वयोगटातील मुली व महिलांसाठी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबाबत जनजागृती आणि एचपीव्ही लसीकरण करण्यात येणार आहे. यासंदर्भात आर्वी व आष्टी येथील पंचायत समिती सभागृहात तसेच आर्वीतील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृहात जनजागृती बैठका पार पडल्या. लसीबाबत कोणतीही शंका असल्यास नागरिकांनी प्रथम कौटुंबिक डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि संपूर्ण माहिती जाणून घेतल्यानंतर निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. विशेष म्हणजे, संबंधित मुली किंवा महिलांच्या पालकांचे लेखी संमतीपत्र घेतल्याशिवाय लसीकरण केले जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.आर्वी तालुक्यातील पहिल्या टप्प्यात २० गावांची निवड करण्यात आली असून, या गावांतील ३६५ लाभार्थ्यांना लसीकरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. खासगी रुग्णालयात या लसीचे तीन डोस घेण्यासाठी साधारणतः १० ते १२ हजार रुपये खर्च येतो. मात्र, या मोहिमेत पात्र लाभार्थ्यांना ही लस विनामूल्य उपलब्ध करून दिली जाणार आहे.गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करून प्रतिबंधात्मक लसीकरणाचा लाभ अधिकाधिक मुलींपर्यंत पोहोचविणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

१ डिसेंबरपासून संसद भवनावर सिटूचे ठिय्या आंदोलन

वर्धा- केंद्र सरकारने जुन्या कामगार कायद्यांमध्ये बदल करून लागू केलेल्या चार नवीन श्रमसंहितांविरोधात कामगार संघटनांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. या श्रमसंहिता कामगारांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या असून उद्योगपती आणि कारखानदारांच्या हिताच्या असल्याचा आरोप सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सिटू)ने केला आहे. या विरोधात १ ते ३ डिसेंबरदरम्यान दिल्लीतील संसद भवनावर विराट मोर्चा आणि ठिय्या आंदोलन करण्यात येणार असून वर्धा जिल्ह्यातून एक हजारावर महिला-पुरुष कामगार सहभागी होणार आहेत.

नवीन श्रमसंहितांमुळे आठ तासांऐवजी १२ तास कामाची सक्ती, कंत्राटी पद्धतीला प्रोत्साहन, किमान वेतनाबाबत अनिश्चितता आणि कामगारांना सेवेतून कमी करण्याचे अधिकार व्यवस्थापनाला मिळाल्याचा आरोप सिटूने केला आहे. यावेळी यशवंत झाडे, भैय्या देशकर, सुनील घिमे, अर्चना मोकाशी, अर्चना घुगरे आणि संदीप मोरे उपस्थित होते.

दरमहा ४२ हजार रुपये किमान वेतनाची मागणी

नवीन चारही श्रमसंहिता रद्द कराव्यात, किमान वेतन दरमहा ४२ हजार रुपये करावे, सार्वजनिक पेन्शन किमान वेतनाच्या ५० टक्के म्हणजे २१ हजार रुपये निश्चित करावी, कंत्राटी व योजना कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे, तसेच आशा, अंगणवाडी, शालेय पोषण आहार व अन्य कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करावी, अशा प्रमुख मागण्या आंदोलनातून मांडण्यात येणार आहेत.

पांढरकवडा पारधी बेड्यावर पोलिसांचा छापा; ८.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त

गावठी मोहाच्या दारूभट्ट्यांवर 'वॉशआऊट' मोहीम

वर्धा/जनमाध्यम



अवैध गावठी मोहाच्या दारू निर्मितीविरोधात सावंगी मेघे पोलिसांनी गुरुवारी (२६ नोव्हेंबर) धडक कारवाई केली. पांढरकवडा येथील पारधी बेड्यावर राबविण्यात आलेल्या 'वॉशआऊट' मोहिमेत पोलिसांनी मोठ्या प्रमाणात कच्चा मोहाचा सडवा, गावठी मोहाची दारू आणि दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य जप्त केले. या कारवाईत एकूण ८ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, चार आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये चार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पांढरकवडा पारधी बेड्यावर अवैधरीत्या गावठी मोहाची दारू तयार केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर सावंगी मेघे पोलिसांनी ही मोहीम राबविली. यावेळी दारू निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात कच्चा मोहाचा सडवा तयार करणाऱ्यांसह हातभट्ट्या चालविणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईमुळे अवैध दारू निर्मिती करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक गोपाल शिंदे, मधुकर सामलवार तसेच पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय पंचभाई, अनिल वैद्य, राजेश राठोड, निलेश इंगोले, निखिल फुटाणे, हर्षवर्धन मून, अमोल जाधव, राहुल नागपुरे, वैभव जगणे, श्याम सलामे आणि संजय पटले यांनी सहभाग घेतला.

गिधाडाच्या शोधात निसर्गाचा दुर्मिळ पाहुणा वर्धेत दाखल

'एक्स ९८' भारतीय गिधाडासोबत दिसला युरेशियन ग्रिफॉन, जिल्ह्यात प्रथमच नोंद, पक्षीनिरीक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण

वर्धा/जनमाध्यम

निसर्गाच्या स्वच्छतेची जबाबदारी आपल्या पंखांवर घेणारी गिधाडे आज नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचली असताना त्यांच्या अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या पक्षीनिरीक्षकांना वर्ध्याच्या निसर्गाने एक अनपेक्षित भेट दिली. मेळघाटातून निसर्गमुक्त करण्यात आलेल्या 'एक्स ९८' क्रमांकाच्या भारतीय गिधाडाचा माग काढताना वर्धा परिसरात चक्क दुर्मिळ युरेशियन ग्रिफॉन गिधाडाचे दर्शन घडले. विशेष म्हणजे, उपलब्ध माहितीनुसार या प्रजातीची वर्धा जिल्ह्यात प्रथमच नोंद झाली आहे. गिधाड संवर्धनाच्या दृष्टीने ही बाब महत्त्वपूर्ण मानली जात असून पक्षीप्रेमी आणि निसर्ग अभ्यासकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

२२ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे ८ वाजता बहार नेचर फाउंडेशन वर्धाचे माजी अध्यक्ष प्रा. किशोर वानखेडे यांनी वनरक्षक मनेशकुमार सज्जन यांना मेळघाटातून सोडण्यात आलेले एक्स ९८ क्रमांकाचे भारतीय गिधाड वर्धा परिसरात असल्याची माहिती दिली. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या (बीएनएचएस) माध्यमातून या गिधाडाला जीपीएस टॅग लावून निसर्गमुक्त करण्यात आले होते. २२ नोव्हेंबरच्या सकाळी ६ वाजता हे गिधाड आदिलाबाद परिसरात होते. सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास त्याचे लोकेशन वर्धा परिसरात आढळून आले.

माहिती मिळताच वनरक्षक सज्जन यांनी पहाटे ५ वाजता आवश्यक साहित्य घेऊन गिधाडाच्या शोधासाठी मोहीम सुरू केली. सकाळी ५.३० वाजता ते नियोजित ठिकाणाजवळ पोहोचले. परिसरात मृत प्राण्याचा तीव्र दुर्गंध पसरला होता. जीपीएस लोकेशननुसार गिधाड अवघ्या ३० मीटर अंतरावर असल्याचे दिसून आले. दिवस उजाडू लागताच पळसाच्या झाडावर दोन मोठे पक्षी बसलेले दिसले. छायाचित्रांचे बारकाईने निरीक्षण केले असता एका पक्ष्याच्या पायावरील पिवळ्या रंगाच्या रिंगवर 'एक्स ९८' असे स्पष्ट दिसले. त्यामुळे मेळघाटातून सोडण्यात आलेल्या भारतीय गिधाडाची ओळख पटली.या पक्ष्याचा मागोवा घेताना तो सावंगी (मेघे) परिसरातून नागठाणा भागातील शेताकडे गेल्याचे दिसून आले. एका उंच झाडावर बसलेल्या या पक्ष्याची दूरवरून छायाचित्रे घेण्यात आली. अधिक स्पष्ट छायाचित्रे गिधाडांच्या संख्येत झालेली प्रचंड घट ही केवळ एका पक्ष्याची संख्या कमी होण्याची बाब नाही, तर संपूर्ण परिसंस्थेसाठी गंभीर इशारा आहे. एक्स ९८ या जीपीएस टॅग केलेल्या भारतीय गिधाडाचा शोध घेताना युरेशियन ग्रिफॉनसारखा दुर्मिळ पक्षी वर्ध्यात दिसणे हा माझ्यासाठी आनंदाचा आणि अभ्यासाचा अनुभव आहे. गिधाडे वाचली तर निसर्गातील अत्यंत महत्त्वाची स्वच्छता यंत्रणाही वाचेल.

मनेशकुमार सज्जन,
पक्षीनिरीक्षक तथा वनरक्षक, वनसंशोधन केंद्र, वर्धा.



गिधाडे वाचली तर निसर्गाची स्वच्छता वाचेल

गिधाडे म्हणजे निसर्गाचे खरे स्वच्छतादूत. मृत जनावरांचे मांस आणि हाडे वेगाने खाऊन पर्यावरण स्वच्छ ठेवण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम ही पक्षीप्रजाती करते. मृत जनावरांमुळे पसरणाऱ्या संभाव्य रोगांचा धोका कमी करण्यातही गिधाडांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. मात्र, गेल्या काही वर्षांत गिधाडांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. त्यामुळे त्यांच्या संवर्धनाचा प्रश्न केवळ एका पक्ष्याच्या अस्तित्वापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो संपूर्ण पर्यावरण आणि मानवी आरोग्याशी जोडला गेला आहे. अशा परिस्थितीत वर्ध्यात दुर्मिळ गिधाडाची झालेली नोंद ही केवळ पक्षीनिरीक्षकांसाठी आनंदाची बाब नसून निसर्ग संवर्धनाची गरज अधोरेखित करणारी आहे.

मिळविण्यासाठी सुरक्षित अंतर राखून त्याचा मागोवा घेण्यात आला. याचदरम्यान मधुबाज आणि शिकरा या शिकारी पक्ष्यांकडून त्याचा पाठलाग होत असल्याचेही निदर्शनास आले.

टिपलेल्या स्पष्ट छायाचित्रांचे निरीक्षण केल्यानंतर हा पक्षी भारतीय गिधाड नसून युरेशियन ग्रिफॉन गिधाड (Gyps fulvus) असल्याचे निश्चित झाले. ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. जयंत वडतकर यांच्याकडूनही या ओळखीची पुष्टी करून घेण्यात आली. भारतीय गिधाडाच्या शोधात निघालेल्या या मोहिमेत जिल्ह्यासाठी दुर्मिळ पक्ष्याची पहिली नोंद होणे, हा निसर्गप्रेमींसाठी आनंदाचा दुहेरी क्षण ठरला आहे.

जिल्ह्यात प्रथमच नोंद

युरोप आणि मध्य आशियातून हिवाळ्याच्या दिवसांत भारतीय उपखंडात स्थलांतर करणाऱ्या युरेशियन ग्रिफॉन गिधाडाच्या महाराष्ट्रात यापूर्वी सातारा, गडचिरोली, नाशिक, मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग आणि रायगड या भागांत नोंदी झाल्या आहेत. आता या यादीत वर्धा जिल्ह्याची भर पडली आहे. उपलब्ध माहितीनुसार जिल्ह्यात या प्रजातीचे हे पहिलेच दर्शन आहे. त्यामुळे वर्ध्याच्या पक्षीवैविध्याच्या दृष्टीने ही नोंद महत्त्वाची ठरणार आहे.

सेवाग्राम- जुन्या वादातून तिघांनी घरासमोर येत शिवीगाळ करून विटांनी हल्ला केल्याची घटना खरांगणा गोडे येथे २१ नोव्हेंबर रोजी घडली. या हल्ल्यात संदीप सुधाकर सिरस्कार (४८) जखमी झाले असून त्यांच्या घराच्या खिडक्यांच्या काचा आणि दरवाजाचेही नुकसान करण्यात आले. याप्रकरणी पांडू राऊत, दिनेश परचाके आणि अक्षय उईके यांच्याविरुद्ध सेवाग्राम पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१५ अंक २
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

मेळघाटातील अदानींच्या प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पाची सखोल चौकशी करा

-खासदार बळवंत वानखडे -वन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक

अमरावती/प्रतिनिधीः- मेळघाटातील चिखलदरा तालुक्याच्या आडनदी-कामापूर परिसरात अदानी समूहाकडून प्रस्तावित उदंचन जलविद्युत (पंप स्टोरेज) प्रकल्पाच्या अनुषंगाने आज (दि.२६) अमरावती येथे खासदार बळवंत वानखडे यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत प्रकल्पाच्या वैधानिक मंजुऱ्या, सर्वेक्षणाच्या अटींचे कथित उल्लंघन, वृक्षतोड, वन्यजीवांचे अधिवास, आदिवासींचे वनहक्क, ग्रामसभांची संमती आणि स्थानिक जलस्रोतांवरील संभाव्य परिणाम यासंदर्भात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले.

मेळघाटातील समृद्ध जैवविविधता, पर्यावरणीय संतुलन आणि आदिवासींच्या जल-जंगल-जमिनीवरील हक्कांना या प्रस्तावित प्रकल्पामुळे धोका निर्माण होण्याची भीती स्थानिक नागरिकांमध्ये आहे. विकासाच्या नावाखाली आदिवासींचे जीवन आणि उपजीविका उद्ध्वस्त होणार नाही, याची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे, अशी भूमिका खासदार वानखडे यांनी बैठकीत मांडली.

अदानी हायड्रो एनर्जी टेन लिमिटेड या कंपनीला दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ आणि २ मार्च २०२६ च्या पत्रांन्वये वनखंड क्रमांक ६, ७, ८, १२, १३, १४ आणि १५ मध्ये नकाशा मोजणी तसेच वनखंड क्रमांक १२, १३ आणि १४ मधील ३.४६७ चौरस किलोमीटर क्षेत्रात ५४.७ ते ७५.७ मिलिमीटर व्यासाचे केवळ २४ बोअरहोल करण्याची परवानगी देण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

या सर्व बाबींची वन विभागाने प्रत्यक्ष स्थळपाहणी करून पंचनामा करावा. भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ आणि वन संवर्धन अधिनियम १९८० मधील लागू तरतुदींचे पालन होत आहे किंवा नाही, याची तपासणी करावी. अटींचे उल्लंघन सिद्ध झाल्यास संबंधित परवानगी रद्द करून नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी केली. तसेच सर्वेक्षणासाठी खोदलेले खड्डे बुजवून जंगल पूर्ववत करण्यात आले आहे किंवा नाही, याबाबत जिओ-टॅग छायाचित्रांसह सविस्तर



चौकशी अहवाल सादर करण्याची मागणी करण्यात आली.

एवढ्या मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र बाधित झाल्यास वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास, भ्रमणमार्ग, स्थानिक जलस्रोत, जैवविविधता, जमिनीची धूप आणि सूक्ष्म हवामानावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्यक्ष वृक्षगणना, वनक्षेत्राचे प्रमाणित नकाशे आणि पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास सादर करून वन विभागाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी जयोती बॅनर्जी, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) , वन विभाग अमरावती , के अर्जुना , उपवनसंरक्षक ,अमरावती योगेश तपस , पाटील , भाडं व वन विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

आवश्यक आहे!

कोर्ट परिसर कॅम्प, अमरावती येथील झेरॉक्स सेंटरसाठी झेरॉक्स आणि प्रिंटच्या कामासाठी एका होतकरू मुलीची किंवा मुलगा उमेदवाराची अत्यंत आवश्यकता आहे.

कामाची वेळः सकाळी १०:३० ते संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत

पत्ताः कोर्ट परिसर कॅम्प, अमरावती इच्छुक उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क

साधावाः
९८९०४८६९१२
कॉल करण्याची वेळ दुपारी पाच नंतर

पाहिजेत

रात्रपाळीत पार्ट टाईम मशीन वर कामासाठी होतकरु मुले पाहिजे

संपर्क

९९७५३१३५९६

प्रो.नं.२८७६/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२४.११.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील एस.डी.कमलाकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र./४६३/२०२६ दिनांक २३.१२.२०२६

जाहीर नोटीस

अर्जदार - १. निता माधव गणोरकर, वय ८५ वर्षे, धंदा - काही नाही रा.भवानी वेश, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
२. संजय माधवराव गणोरकर, वय ६४ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त रा.चिन्मय, बाजीराव पेशवे रोड, तिर्थाकर हॉस्पीटलजवळ, मुद्दाम प्लॉट अकोला
३. कमलेश माधवराव गणोरकर, वय ६२ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त रा.घर नं.२८४, अमरावती रोड, जानकी किराणा स्टोअर्स जवळ, गजानन सोसायटी दत्तवाडी वाडी नागपूर
४. रोहिणी मुकूंद पावडे, वय ५९ वर्षे, धंदा - घरकाम रा.केशर धाम रोड, फ्लॅट नं.३०१, मन्ना सदन ६, लोकमान्य न गर, सुदामा नगर, इंदौर (म.प्र.)

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वाना कळविण्यात येते की, **माधव त्र्यंबक गणोरकर** हे दिनांक **२४.०९.२०२६** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

मालमत्तेचे वर्णन मयत **माधव त्र्यंबक गणोरकर** यांचे नांवे मौजा दर्यापूर ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नगर भूमापन क.१९३०, शिट नं.१३, प्लॉट नं.१९३०, क्षेत्रफळ १३४.३० चौ.मी.ज्याचा नगर परिषद मालमत्ता नं.DARY००००१४०१D७-२०२७, वार्ड नं.७, झोन नं.०२ हे राहते घर असून त्याची बाजारभावाने किंमत ५००००/- इतकी आहे.

आज दि.**२४.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

प्रो.नं.२८७७/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२४.११.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील एस.डी.कमलाकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र./४५३/२०२६ दिनांक २२.१२.२०२६

जाहीर नोटीस

अर्जदार - १. पुष्पा सुभाष उमाळे, वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम
२. अमोल सुभाषराव उमाळे, वय ३९ वर्षे, धंदा - नोकरी दोन्ही रा.माळीपुरा, येदवा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. छाया दिलीप ताथोड, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम रा.माहेगांव, पो.घोडगांव, ता.तेल्हारा, जि.अकोला
४. ममता दिलीप आकोत, वय ४६ वर्षे, धंदा - घरकाम रा.गांधी चौक, वाडेगांव, ता.बाळापूर, जि.अकोला
५. सरिता अरविंद आखरे, वय ४४ वर्षे, धंदा - घरकाम रा.कुटासा, ता.अकोट, जि.अकोला

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **सुभाष रामभाऊ उमाळे** हे दिनांक २८.०८.२०२५ रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

मालमत्तेचे वर्णन मयत **सुभाष रामभाऊ उमाळे** यांचे नांवे मौजा येवदा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नगर भूमापन क.१३७१, शिट नं.७, प्लॉट नं.१३७१ हे राहते घर असून त्याची बाजारभावाने किंमत ५००००/- इतकी आहे.

आज दि.**२४.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४३६/२०२६
Smt.Sindhu Jaraoji Gawner+3 **-वि- निरंक**
पुढील ता.१९.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
1. Smt.Sindhu Janraoji Gawner, Age about 80 Yrs. Occu.: Housewife
2. Prashant Janraoji Gawner, Age about 48 Yrs. Occu.: Service
3. Nishant Janraoji Gawner, Age about 46 Yrs. Occu.: Business
4. Meena Janraoji Gawner (After Marriage Mina Dilip Gadhave) Age about 51 Yrs. Occu.: Service
All R/o Vilas Nagar Line No.5, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Janrao Marotrao Gawner हे दिनांक 19.09.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Sindhu Janraoji Gawner+3 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Sindhu Janraoji Gawner+3 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२१.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ८४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२३९१/२०२६
Nitin Lakhanlal Gupta Hasan + 4 Versus NIL
पुढील ता.२३.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. **Nitin Lakhanlal Gupta,** Aged 46 yrs. Occ.- Labour R/o. Bajrang Tekdi, Saubag Amravati, Tq. & Dist. Amravati- 444 601
2. **Urmila Vijay Gupta,** Aged 41 yrs.,Occ.- Housewife R/o. 701, Near Sahubag Gate,, Sahubag Bajrang Tekdi, Masanganj, Amravati, Tq. & Dist. Amravati - 444 601
3. **Aniket Vijay Gupta**, Aged 25 yrs.,Occ.- Education R/o. C/o. Vijay Gupta, Bajrang Tekdi, Amravati, Tq. & Dist. Amravati
4. **Aditya Vijay Gupta**, Aged 25 yrs.,Occ.- Education R/o. C/o. Vijay Gupta, Bajrang Tekdi, Amravati, Tq. & Dist. Amravati- 444 601
5. **Sakshi Vijay Gupta**, Aged 24 yrs.,Occ.- Education R/o. C/o. Vijay Gupta, Sahubag, Bajrang Tekdi, Amravati, Tq. & Dist. Amravati- 444 601

...Versus...

Non- Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Manjubai Lakhanlal Gupta** हे दिनांक **२४.०९.२०२५** रोजी, **Lakhanlal Kishor Gupta** हे/हया दिनांक ०८.०७.१९९४ रोजी आणि **Vijay Lakhanlal Gupta** हे/हया **दिनांक** ०२.०२.२०२२ रोजी सर्व **अमरावती** येथे मयत झाले. **Nitin Lakhanlal Gupta + 4 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Nitin Lakhanlal Gupta + 4 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती

वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१७८३/२०२६
सपना +१ वि.निरंक
पुढील ता.०३.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार
1. **Sapana Sachinkumar Majethiya,** Age 41 yrs. Occ.- Household
2. **Sachi Sachinkumar Majethiya,** Age 11 yrs., Occ.- Education Applicant no.2 being minor through legal guardian mother i.e. applicant no.1, Both R/o. Baccharaji Plot, House No. 28594, Behind Chitra Talkies, Infront of Rakesh Marketing, Amravati

...Versus...

गैरअर्जदार - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Sachin Vilasbhai Majethiya** हे दिनांक **०५.११.२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Sapana Sachinkumar Majethiya+ 1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sapana Sachinkumar Majethiya+ 1** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३४०/२०२६
Manish Krushnappa Elgunde+4 **-वि- निरंक**
पुढील ता.१७.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
1. Manish Krushnappa Elgunde, Age 54 Yrs. Occu.: Pvt.Job R/o Near Homeopathic College, Rajapeth, Amravati.
2. Nitin Krushnappa Elgunde, Age 55 Yrs. Occu.: Pvt.Job. R/o Plot No.307, E-Wing Janaranjani B, Sinhgad Road, Nanded City, Pune,City, Dist.Pune
3. Sunita Rajkumar Hatole, Age 63 Yrs. Occu.: Housewife R/o Telephone Staff Quarter Ekta Nagar, Buldhana, Dist.Buldhana
4. Varuna Sunil Vaidya, Age 44 Yrs. Occu.: Housewife R/o Plot No.52, Builder Housing Society, Near Shri Krishna Kirana Store, Nandanvan Colony, Aurangabad
5. Nilima Vijay Nagarkar, Age 58 Yrs. Occu.: Housewife R/o Ashoka Park, Andh Shale Javal, Ward No.7, Tq.Shrirampur, Dist.Ahmadnagar

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Krushnaappa Gangadharappa Elgunde हे दिनांक 26.03.2017 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. आणि Pushpatai Krushnappa Elgundeहे दिनांक 24.09.2014 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Manish Krushnappa Elgunde+4 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Manish Krushnappa Elgunde+4 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२२४/२०२६
Sunita Sharad Dharmatti+1 **-वि- निरंक**
पुढील ता.१९.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
1. Sunita Sharad Dharmatti, Age about 79 Yrs. Occu.: Household R/o Shree Rukhmini Apartment, 1st Floor, Infront of Rajurkar Furniture, Rukhmini Nagar, Amravati.
2. Shashank Sharad Dharmatti, Age about 52 Yrs. Occu.: Job R/o J-304, Rajaveer Palace Kunal Icon Road, Pimple Saudagar, Pune City, Aundh Camp Pune City (M.S.)

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sharad Pralhad Dharmatti हे दिनांक 01.04.2011 रोजी **नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार Sunita Sharad Dharmatti+1 -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sunita Sharad Dharmatti+1 -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **38/2026 कलम ५० अ (१)** **पु.ता.०३.१२.२०२६**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री साईबाबा चॅरीटेबल ट्रस्ट, अमरावती, ता.जि.अमरावती ई- ७७०/अम.**
बाबत अर्जदार - **श्री प्रमोद राजारामजी घुरडे व इतर.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मा.धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० चे कलम ५० अ (१) अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत - परिशिष्ट १ प्रमाणे
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) ः- परिशिष्ट १ प्रमाणे

सदर प्रकरण महा.सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ५० अ (१) अन्वये न्यायिक बोर्डवर दाखल झालेले आहे.

प्रस्तावित योजनेप्रमाणे प्रथम विश्वस्त मंडळ -
०१. श्री अविनाश अमरसिंह गौर- अध्यक्ष ०२. श्री प्रल्हाद लक्ष्मणराव कपले- उपाध्यक्ष
०३. श्री प्रमोद राजारामजी घुरडे- सचिव ०४. श्री प्रमोद पंजाबराव धंन्दर- सहसचिव
०५. श्री श्रीकांत रमेश शिमगेकर- कोषाध्यक्ष ०६. श्री भाऊराव महादेवराव हिवे- विश्वस्त
०७. श्री दिपक रमेशपंत जड - विश्वस्त
वरील सर्व रा.मोहन नगर, वि.म.वि.रोड, अमरावती, ता.जि.अमरावती
गैरअर्जदार- कोणी नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उपआयुक्त, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २०.११.२०२६ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधीक्षक, (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती विभाग, अमरावती

प्रो.नं.४८९५/२०२६
दि. . .२०२६

श्री.के.एम.मुंढे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
यांचे न्यायालय, यवतमाळ

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४२७/२०२६
शुभांगी- वि-कोणीही नाही
नेमलेली ता.२१.१२.२०२६

जाहीरनामा

अर्जदार ः- १. **शुभांगी नरेंद्र सौंउळकर**
२. **त्रिशा नरेंद्र सौंउळकर**
वरील सर्व रा.सुरभी नगर, पिंपळगाव रोड, ता.जि.यवतमाळ

-- विरुध्द --

गैरअर्जदार- कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार हे मयताचे वारस आहे. **मयत नरेंद्र सुर्यभान सौंउळकर** यांचा मृत्यू दिनांक १५/०९/२०२३ रोजी झाला. मयताचे वारस या नात्याने वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा वरील अर्जदार हे **मयत नरेंद्र सुर्यभान सौंउळकर** यांचे वारस नव्हे व वारसाचे प्रमाणपत्र देवु नये असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात प्रत्यक्ष स्वतः किंवा आपले वकिलामार्फत हजर राहून आपला उजर अथवा आपला लेखी स्वरुपात दाखल करावा. सदरच्या तारखेनंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर अथवा आक्षेप नाही असे ग्राहय धरले जाईल व सदर्हु अर्ज नियमानुसार निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१९ माहे नोव्हेंबर २०२६रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली आहे.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), यवतमाळ
ता.जि.यवतमाळ

प्रो.नं.२८८९/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२५.११.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती येथील एम.ए.शिलार, दिवाण न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र./४३६/२०२६ दिनांक ०२.१२.२०२६

जाहीर नोटीस

अर्जदार - १. शांता दशरथ जामनिक, वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम
२. किरण दशरथ जामनिक, वय ५२ वर्षे, धंदा - मजुरी
दोन्ही रा.अशोक नगर, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वाना कळविण्यात येते की, **दशरथ महादेवराव जामनिक** हे दिनांक **०७.११.२०२५** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२५.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४०५/२०२६
Deepali Rajesh Tembhurkar **-वि- निरंक**
पुढील ता२४.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
1. Deepali Rajesh Tembhurkar Age about 41 Yrs. Occu.: Household R/o Ward No.14, Patipura, Yavatmal, Tq. Dist.Yavatmal

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ramchandra Balwant Angal हे दिनांक 08.09.2024 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Deepali Rajesh Tembhurkar -Vs-Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Deepali Rajesh Tembhurkar -Vs-Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

Change in Name

(OLD NAME)
SULTANA B SHAIKH ISRAIL
(NEW NAME)
SULTANA BI HABIB KHAN
- Address -
NEAR MASJID E NOOR, KASAD PURA, THU

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



विभागीय आयुक्त कार्यालयात संविधान दिन

अमरावती-विभागीय आयुक्त कार्यालयात आज संविधान दिन साजरा करण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात सामान्य प्रशासन विभागाचे अपर आयुक्त संजय जाधव, नियोजन विभागाच्या सहआयुक्त कावेरी नाखले, मागासवर्ग कक्षाच्या सहायक आयुक्त वैशाली पाथरे, सामान्य प्रशासन विभागाच्या तहसीलदार अनिता झाडे यांच्यासह उपस्थित विविध विभागांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

न्यू एकविरा दुर्गात्सव मंडळाचा पोलिसांकडून सन्मान

तिवसा-अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या उत्कृष्ट सार्वजनिक दुर्गा देवी उत्सव २०२६ स्पर्धेत तिवसा येथील न्यू एकविरा दुर्गोत्सव मंडळाने प्रथम पारितोषिक पटकावत शहराचा गौरव वाढविला. सांस्कृतिक जतन, शिस्त, कायदा व सुव्यवस्था, पर्यावरणपूरक उत्सव, ध्वनीप्रदूषण नियंत्रण, सामाजिक सलोखा आणि 'ऑपरेशन कवच' अंतर्गत जनजागृती या निकषांवर मंडळाने बाजी मारली. उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीश थातोड यांच्या हस्ते मंडळाला प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले. यावेळी अध्यक्ष मंगेश हिमाने, उपाध्यक्ष अमोल चिंचळोकर यांच्यासह मुकुंद पाटील, अजय बेलूरकर, विनोद बाखडे, प्रमोद सातपुते, दिलीप खेडकर, प्रमोद बाखडे, अनिल वानखडे, बच्चू वानखडे, वैभव वानखडे, योगेश हिमाने, आकाश खेडकर, धीरज वानखडे व अंकुश खेडकर तसेच पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानतर्फे सत्कार

अमरावती-फॉरेस्ट कॉलनी, साईनगर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान सेवा समिती ट्रस्टच्या वतीने आयोजित काकडा उत्सवातील कालाकीर्तन प्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी स्वेच्छेने उपस्थिती लावून दर्शन घेतले.यावेळी शिवसेना बडनेरा मतदारसंघ प्रमुख प्रशांत जाधव,अमरावती महानगरपालिकेचे माजी महापौर तथा विद्यमान स्थायी समिती सभापती चेतन गावंडे आणि श्री देवीचे देवस्थान, जालना येथील अध्यक्ष दिलीपजी उदासी यांनी भेट दिली.याप्रसंगी श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान सेवा समिती ट्रस्टच्या वतीने सर्व मान्यवरांचा श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने मान्यवरांच्या उपस्थितीमुळे भक्तिमय वातावरणात उत्साहाची भर पडली.



टायटन्स पब्लिक स्कूलचे सुवर्णमय यश

अंजनगाव बारी-जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय (DSO), अमरावती यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय सिलंबम (Silambam) क्रीडा स्पर्धेत विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीद्वारे संचालित टायटन्स पब्लिक स्कूल, बडनेरा येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. शाळेच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तब्बल १० सुवर्णपदकांची कमाई केली असून, सर्व दहा खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या स्पर्धेत शाळेचे वंश शेंडे, प्रिन्स जैन, जियान खान, रणवीर श्रीवास, गुरुराज सोळंके, आनंदी दातीर, आर्या जैन, आराध्या लाहे, समृद्धी दुर्गे आणि तन्वी घाटोळ या दहा विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याच्या जोरावर सुवर्णपदक पटकावले.या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक तथा प्रशिक्षक जाफर खान यांचे मोलाचे मार्गदर्शन, नियमित सराव आणि सातत्यपूर्ण मेहनत लाभली.विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कोषाध्यक्ष प्रा. हेमंत देशमुख, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, पंकज देशमुख, विनय गोहाड, डॉ. पूनम चौधरी व गजानन काळे तसेच शाळेचे प्राचार्य अजय चौबे यांनी सर्व विजयी खेळाडू, क्रीडा प्रशिक्षक आणि क्रीडा विभागाचे अभिनंदन केले.

भटकंती मेंढपाळांच्या पशुधनासाठी विशेष चारा छावण्या सुरू करा

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे संतोष महात्मे यांची मागणी

अमरावती/का.प्र.

महाराष्ट्रातील विविध भागांत निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे स्थलांतर व भटकंती करणाऱ्या मेंढपाळांच्या मेंढ्या, शेळ्या व इतर पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर मेंढपाळ कुटुंबांच्या पशुधनाच्या संरक्षणासाठी राज्य शासनाने विशेष चारा छावण्या सुरू कराव्यात, तसेच चारा, पाणी व पशुवैद्यकीय सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी आग्रही मागणी मेंढपाळ धनगर विकास मंच, महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष संतोष महात्मे यांनी केली.यासंदर्भात आज मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृह येथे महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.



राज्यातील अनेक भागांत अपुऱ्या पावसामुळे आणि पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेतीसह पशुधनावरही दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झाले आहे. विशेषतः मेंढपाळ व धनगर समाजातील कुटुंबांना आपल्या मेंढ्या आणि पशुधनाच्या चाऱ्यासाठी गावोगावी तसेच जिल्ह्यांदरम्यान स्थलांतर करावे लागत आहे. मात्र भटकंतीच्या मार्गावर हिरवा चारा, वाळलेला चारा आणि पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसल्याने पशुधनाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.या निवेदनाद्वारे मेंढपाळांच्या स्थलांतर मार्गावर व मुक्कामाच्या ठिकाणी विशेष चारा छावण्या सुरू करणे, मेंढ्या-शेळ्यांसाठी हिरवा चारा, वाळलेला चारा, कडबा व पशुखाद्य उपलब्ध करणे, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, स्थलांतरित मेंढपाळ कुटुंबांची नोंदणी करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देणे, नियमित पशुवैद्यकीय तपासणी, औषधोपचार व लसीकरणाची सुविधा उपलब्ध करणे, तसेच अन्य जिल्ह्यांतून येणाऱ्या मेंढपाळांच्या पशुधनासाठीही मदतीचे स्पष्ट धोरण निश्चित करणे, अशा महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत.

याशिवाय, वनविभागाच्या अखत्यारीतील उपलब्ध चारा नियमानुसार कटाई करून मेंढपाळांना उपलब्ध करून द्यावा. चारा खरेदी, पशुधन वाहतूक आणि तात्पुरत्या निवाऱ्याचा खर्च पेलणे अशक्य असलेल्या पात्र मेंढपाळ कुटुंबांसाठी विशेष आर्थिक मदत अथवा अनुदान योजना राबवावी, अशीही मागणी करण्यात आली.या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मदत व पुनर्वसनमंत्री ना. मकरंद आबा पाटील, कृषिमंत्री दत्तामामा भरणे आणि पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांच्याकडेही निवेदनाद्वारे मागण्या मांडण्यात आल्या आहेत. तसेच सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



शासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागांना तातडीने निर्देश द्यावेत आणि राज्यातील स्थलांतरित मेंढपाळ व त्यांच्या पशुधनासाठी विशेष मदतकार्य सुरू करावे, अशी अपेक्षा मेंढपाळ धनगर विकास मंचाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

'मेंढ्या हे मेंढपाळ कुटुंबांचे केवळ पशुधन नसून त्यांच्या संसाराचा आणि आर्थिक सुरक्षिततेचा मुख्य आधार आहे. दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांप्रमाणेच भटकंती करणाऱ्या मेंढपाळांचाही विचार होणे गरजेचे आहे. मेंढपाळांना चाऱ्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येऊ नये आणि चाऱ्याअभावी एकही पशुधन दगावू नये, यासाठी शासनाने तातडीने विशेष उपाययोजना कराव्यात,' अशी भूमिका मांडली.

-संतोष महात्मे

भगवंत शिवाजीराव पाटील महाविद्यालयात संविधान दिन



परतवाडा - भारतीय संविधान हे देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा भक्कम आधारस्तंभ असून, संविधानाने दिलेली स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये प्रत्येक नागरिकाने आपल्या आचरणात आणणे आवश्यक आहे. संविधानातील मूलभूत तत्त्वांचे जतन करणे आणि लोकशाही मूल्यांची जोपासना करणे ही प्रत्येक भारतीय नागरिकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन बी. एस. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल खांडेकर यांनी केले. बी.एस.पाटील महाविद्यालयात २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे उपस्थित होते.यावेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांनी भारतीय संविधानाचे महत्व विशद करताना संविधान निर्मितीचा इतिहास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान आणि भारतीय लोकशाहीच्या जडणघडणीत संविधानाची भूमिका यावर विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले होते. प्रा. सारंग धारस्कर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी सांभाळली.याप्रसंगी संविधान प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अवैध गौण खनिज वाहतुकीवर महसूल विभागाची धडक कारवाई; चार वाहने जप्त

अंजनगाव बारी/का.प्र.

अमरावती तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने गुरुवार, २६ नोव्हेंबर रोजी धडक कारवाई केली. उपविभागीय अधिकारी अनिल भटकर तसेच तहसीलदार संतोष आठरे यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती तहसील कार्यालयाचे अवैध गौण खनिज पथक सकाळपासून तालुक्यात कार्यान्वित करण्यात आले होते.या मोहिमेदरम्यान अवैध वाहतूक करणारे MH27BX2050 क्रमांकाचे टिप्पर पकडून अमरावती तहसील कार्यालयात जमा करण्यात आले. तसेच उपविभागीय अधिकारी नांदगाव खंडेश्वर येथील सूर्यवंशी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली MH27EF1259 क्रमांकाचा अवैध रेती वाहतूक करणारा हायवा,MH27DT0854 क्रमांकाचा अवैध मुरूम वाहतूक करणारा टिप्पर आणि MH27L8481 क्रमांकाचा ट्रॅक्टर व मिनी एक्स्कॅव्हेटर जप्त करण्यात आले.संबंधित वाहनांचा पंचनामा करून पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी ती अमरावती तहसील कार्यालयात लावण्यात आली आहेत. या कारवाईमुळे अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.ही कारवाई निवासी नायब तहसीलदार कृष्णा गाडेकर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली.



यामध्ये मंडळ अधिकारी सुनील उगले, गजानन हिवसे, अभिजीत देशमुख, ज्ञानेश्वर गावनेर तसेच ग्राम महसूल अधिकारी पवन बोंडे, आशिष निचित, आशिष सराफ, रामकृष्ण इंगळे, सौरभ वानखडे,राहुल आवारे,आदेश गजभीये,धीरज बोबडे, राजेश दंदे, सज्जन चक्रे व विजय देशमुख उपस्थित होते.महसूल विभागाच्या या धडक मोहिमेमुळे अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

धोत्रा सिंचन तलावातील अनधिकृत पाणी उपसा भोवला

दुष्काळी परिस्थितीत नियमांचे उल्लंघन; शेतकऱ्याविरुद्ध तक्रार दाखल

तिवसा/वार्ताहर

शासनाच्या मालकीच्या धोत्रा सिंचन तलावातून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्या शेतकऱ्याविरुद्ध अखेर तिवसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वारंवार समज आणि ताकीद देऊनही संबंधित शेतकऱ्याने पाणी उपसा सुरूच ठेवल्याने महसूल प्रशासनाने पोलिसांत धाव घेतली.यात ९१ स्प्रिंकलर पाईप,३ इलेक्ट्रिक मोटर व ४७० मीटर केबल वायर जप्त करण्यात आला.

मंजीत शेंडे (रा. तळेगाव ठाकूर, ता. तिवसा) असे शेती साहित्य जप्त केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. प्राप्त एफआयआरमधील माहितीनुसार, मौजा तिवसा भाग-२ येथील शासकीय धोत्रा सिंचन तलावातून विनापरवानगी पाणी उपसा केला जात असल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आली होती. यानंतर १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी पंचांसमक्ष घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी शेतकरी मंजीत शेंडे यांनी तलावात १२ ते १५ फूट खोल खड्डा खोदून अनधिकृत पाणी उपसा सुरू ठेवल्याचे आढळून आले.



या पाहणीदरम्यान ५ एचपीची पाणबुडी मोटार, ३५ स्प्रिंकलर पाईप आणि २०० मीटर केबल वायर जप्त करण्यात आली. संबंधितांना शासनाच्या आदेशाचे पालन करण्याबाबत सक्त ताकीदही देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही २३ नोव्हेंबर आणि २५ नोव्हेंबर रोजी पुन्हा त्याच तलावातून अनधिकृत पाणी उपसा सुरू असल्याचे आढळले.

२५ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता पंचांसमक्ष पुन्हा घटनास्थळाची पाहणी करण्यात आली. यावेळी ३ एचपीची सोलर इलेक्ट्रिक मोटार पंप, ३१ स्प्रिंकलर पाईप आणि अंदाजे १५० मीटर थ्री-फेज केबल वायर जप्त करून तहसील कार्यालय, तिवसा येथे जमा करण्यात आली.एकूण या कारवाईदरम्यान अनधिकृत पाणी उपशासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. यामध्ये ५ एचपी क्षमतेचे तीन इलेक्ट्रिक मोटार पंप, ९१ स्प्रिंकलर पाईप तसेच ४७० मीटर थ्री फेज केबलचा समावेश आहे.या प्रकरणी तिवसा तहसीलदार मयुर कळसे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी चंद्रशेखर आगरकर यांनी तिवसा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल नीलेश जामनिक करीत आहे.

विदर्भ वैभव मंदिर, मुंबईतर्फे गोपाळकृष्ण उर्फ भैयासाहेब निचळांचा सत्कार

अमरावती/का.प्र.

दादर येथील सांस्कृतिक आणि कलात्मक स्पंदनांचे केंद्र असलेल्या रवींद्र नाट्यगृहाच्या सभागृहात ऐतिहासिक सोहळा पार पडला. 'विदर्भ वैभव मंदिर, मुंबई' या संस्थेच्या वतीने आयोजित वार्षिक आम सभेत विदर्भाची परंपरा आणि संस्कृती जपणारे ज्येष्ठ सभासद तसेच आदरणीय ज्येष्ठ नागरिक गोपाळकृष्ण उर्फ भैयासाहेब निचळ यांचा सभागृहाच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

रवींद्र नाट्यगृहातील मंचावर मान्यवरांच्या हस्ते भैयासाहेब निचळ यांना सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.या स्नेहादर सोहळ्याला आ. प्रताप सरनाईक,आ.संजय खोडके, विक्रम बोके,प्रकाश पोहरे,संजय हावरे यांसारख्या दिग्गज व्यक्तिमत्त्वांनी आपल्या मार्गदर्शनातून व उपस्थितीतून या सोहळ्याचे सौंदर्य अधिकच द्विगुणित केले.



विदर्भ वैभव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अशोक बारबदे, सरचिटणीस गजानन नागे, आणि कोषाध्यक्ष संजय बारबदे यांच्या आयोजनाखाली हा सोहळा झाला.आपल्या विदर्भाच्या मातीचा सुगंध मुंबईसारख्या महानगरीत जपण्याचे कार्य 'विदर्भ वैभव मंदिर' अखंडपणे करत आहे.उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून भैयासाहेबांच्या निरोगी दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. संस्थेच्या प्रगतीत ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन हेच खरे अधिष्ठान आहे, असा सूर याप्रसंगी उमटला.हा सोहळा विदर्भ वैभव मंदिर मुंबईच्या इतिहासात एका सुवर्ण अक्षराने नोंदवला गेला आहे.

ऑनलाईन कामांच्या अतिरेकाविरोधात प्राथमिक शिक्षकांचा असहकाराचा निर्धार

१ डिसेंबरपासून अशैक्षणिक ऑनलाईन कामे बंद

अमरावती/का.प्र.

प्राथमिक शिक्षकांवर लादण्यात येणाऱ्या अशैक्षणिक ऑनलाईन कामांचा वाढता अतिरेक आणि प्रशासनिक व्हॉट्सॲप ग्रुपवरील सततच्या संदेश व आदेशांच्या निषेधार्थ राज्यातील प्राथमिक शिक्षक संघटनांनी असहकार आंदोलनाचा निर्धार केला आहे. येत्या १ डिसेंबर २०२६ पासून अशैक्षणिक ऑनलाईन कामे न करण्यासह प्रशासनिक व्हॉट्सॲप ग्रुपमधून बाहेर पडण्याचा निर्णय पुणे येथील शिक्षक भवनात झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत घेण्यात आला.संचमान्यता धोरणाचे दुष्परिणाम, टीईटीबाबत शासनाची भूमिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचे अस्तित्व,शाळांच्या मूलभूत समस्या आणि शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी बैठकीत व्यक्त करण्यात आली.



या बैठकीला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (पाटील गट), महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (थोरात गट), अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक भारती संघटना, महाराष्ट्र राज्य पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य पदवीधर व केंद्रप्रमुख शिक्षक संघटना, अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटना, स्वतंत्र समता शिक्षक संघ, कास्ट्राईब शिक्षक संघटना, कास्ट्राईब शिक्षक महासंघ, डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना, प्रहार शिक्षक संघटना आणि महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी व अधिकारी संघटना या संघटनांचे राज्य पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीस संभाजीराव थोरात, उदयराव शिंदे, विजय कोंबे, केशवराव जाधव, कल्याण लवांडे, मधुकर कठोळे,सुनील तेलतुंबडे, नवनाथ गेंड,साजिद निसार अहमद, मनोज मराठे, गोविंद उगले, पुरुषोत्तम जाधव,प्रभाकर पारवे,मिलिंद खंडिझोड,संजय कुर्डुकर, आनंदा कांदळकर, राजन सावंत, नंदकुमार होळकर, संदीप जगताप,परशराम सरदेसाई, पुरुषोत्तम बावणे, बापू खरात, उमेश देशमुख, बाळासाहेब झावरे, हनुमंत शिंदे, सुधीर सगणे,राजेश महाबुधे, महादेव माळवदकर, चंद्रकांत सलवदे, राजेंद्र ठोकळ, सुरेश पवार,डॉ. मनियार मोईनुद्दीन,अमोल माने आणि विनोद चव्हाण उपस्थित होते.'शिक्षकांना शिकवू द्या, विद्यार्थ्यांना शिकू द्या!' या घोषवाक्याखाली सर्व संघटना एकत्रित लढा उभारणार असून, सामाजिक, विद्यार्थी व पालक संघटनांसह लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून आंदोलनाची पुढील दिशा निश्चित केली जाणार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

प्रेमप्रकरणातून तरुणीवर धारदार शस्त्राने वार; युवकानेही प्राशन केले विष

दोघांची प्रकृती चिंताजनक, अमरावतीत उपचार सुरू

-आष्टीतील इंदिरानगर परिसरात थरार





वर्धा/प्रतिनिधीः- आष्टी शहरातील इंदिरानगर झोपडपट्टी परिसरात प्रेमप्रकरणातून एका २५ वर्षीय तरुणीवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची खळबळजनक घटना गुरुवारी (२६ नोव्हेंबर) दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेनंतर संबंधित २२ वर्षीय युवकानेही विषारी औषध प्राशन केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत दोघेही गंभीर जखमी झाले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही अमरावती येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अजय राऊत (वय २२)☞(पान २ वर)

चांदूर रेल्वेचे २ तरूण पुण्यात २५० किलो गांजासह ताब्यात

१.५१ कोटींचा माल जप्त

-शिरूरमध्ये पोलिसांची फिल्मी स्टाईल कारवाई





अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील दोन युवकांना पुणे शहर गुन्हे शाखेच्या पथकाने गांजा तस्करीच्या एका मोठ्या प्रकरणात अटक केली आहे. पुणे शहर गुन्हे शाखेच्या अँटी नार्कोटिक्स स्क्वॉड-२ ने शिरूर भागात फिल्मी स्टाईलने पाठलाग करून २५० किलो गांजाची मोठी खेप पकडली. या कारवाईत महिंद्रा ७०० कार सह एकूण १ कोटी ५१ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.समीर पुरुषोत्तम राऊत (वय २४, सांगोल वाडा) आणि अजय जगदीश ☞(पान २ वर)

जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात मानवी अवयव आढळल्याने खळबळ



अमरावती/प्रतिनिधीः- जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) परिसरात गुरुवार २६ नोव्हेंबर रोजी सकाळी मानवी शरीराचे वेगवेगळे अवयव आढळून आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली. वॉर्ड क्रमांक ९ समोर श्वान मानवी पायाचे लचके तोडत असल्याचे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. परिसरात शोधमोहीम राबविल्यानंतर दोन हात, एक पाय आणि डोके असे अवयव आढळून आले. हे अवशेष एका भिकाऱ्याचे असून चार दिवसांपूर्वी नाल्यात पडून त्याचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे रुग्णालय परिसर आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कोतवाली पोलिसांनी पंचनामा करत अवशेष उत्तरीय तपासणीसाठी (पोस्टमार्टम) पाठविले आहेत.दरम्यान अशा प्रकारे एकाच ☞(पान २ वर)

बँड पार्टीचे वाहन रिव्हर्स घेताना वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू

अपघातानंतर चालक फरार ,वाहन पोलिसांच्या ताब्यात

-अचलपूर शहरातील हिरापुरा येथील घटना



अचलपूर/प्रतिनिधीः- अचलपूर शहरातील हिरापुरा परिसरात गुरुवारी २६ नोव्हेंबर रोजी श्री प्रभू डीजे बँड पार्टीचे वाहनाचा चालक रिव्हर्स घेत असताना या अपघातात शंकर नारायणराव नवलकर (वय ७५) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. घराजवळच अपघात घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अचलपूर पोलिस स्टेशनमधून मिळालेल्या माहितीनुसार ,शंकर नवलकर हे घराजवळ असताना एमएच ४३ एफ ४३९६ क्रमांकाच्या डीजे वाहनाचा चालक वाहन रिव्हर्स घर असताना हा अपघात घडला. या जोरदार अपघातात त्यांच्या पोटाला, पायांना व शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्यांना अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच अचलपूर पोलिसांनी संबंधित डी.जे वाहन ताब्यात घेतले असून फरार चालकाचा शोध सुरू केला आहे. वृत्त लिहेपर्यंत अचलपूर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलिस तपासानंतर या अपघाताबाबत संपूर्ण माहिती ☞(पान २ वर)

फिनले मिलच्या आणखी एका कामगाराची आत्महत्या

तीन दिवसांत दोन कामगारांनी संपविले जीवन

-आतापर्यंत १८ कामगारांचा बळी



अचलपूर/प्रतिनिधीः- अचलपूर शहरातील रोजगाराचे एकमेव केंद्र असलेली फिनले मील कोरोना काळापासून बंद आहे .यामुळे कामगारांना विविध अडचणीचा सामना करावा लागत आहे .कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुद्धा कामगाराच्या समोर निर्माण ☞(पान २ वर)

मील कामगार विजय हदाले यांच्या आत्महत्येच्या अवघ्या तीन दिवसांपूर्वी फिनले मिलमधील आणखी एक कामगार सुनील दाभाडे यांनी ही आत्महत्या करून जीवन संपविले होते .या दोन्ही घटनेमुळे खळबळ उडाली आहे . कामगाराचे थकित वेतन ,बोनस , बंद मील कधी सुरू होणार ? असे अनेक प्रश्नांचा सामना कामगार गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे.यामुळे केंद्र शासनाने तत्काळ ठोस निर्णय घेण्याची मागणी कामगार वर्गाकडून होत आहे.

३ लाख २४ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात १६२ कोटी जमा

-शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजाराची मदत

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ५० टक्के पाऊस झाला आहे. याचा परिणाम शेतपिकांवर झाला आहे. कमी पावसामुळे उत्पादन कमी येणार असल्याने दिलासा देण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांना ५ हजार रुपये बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. त्यानुसार आतापर्यंत ३ लाख २४ हजार ९७१ शेतकऱ्यांच्या खात्यात १६२ कोटी ४८ लाख ५५ हजारांची रक्कम जमा करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कमी पर्जन्यमानामुळे त्याचा परिणाम कापुस, सोयाबीन, तुरीसह अन्य पिकांवर झाला. बहुतांश भागात शेतकऱ्यांना उत्पन्नात घट आली. येत्या रब्बी पिकांच्या पेरणीवर परिणाम होणार आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने दुष्काळी परिस्थिती☞(पान २ वर)

दारूच्या नशेत शिवीगाळ केल्याचा राग अनावर

संतापलेल्या लहान भावाने कुऱ्हाडीने वार करून मोठ्या भावाचा केला खून!

बाभूळगाव तालुक्यातील तरोडा येथील घटना



बाभूळगाव/प्रतिनिधीः- दारूच्या नशेत घरी आलेल्या मोठ्या भावाने लहान भावाला शिवीगाळ केल्याने संतापलेल्या लहान भावाने कुऱ्हाडीने वार करून मोठ्या भावाची हत्या केल्याची धक्कादायक घटना बाभूळगाव तालुक्यातील तरोडा येथे बुधवार, २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, मृतक जगदीश राठोड (वय २७) आणि त्याचा लहान भाऊ प्रमोद राठोड (वय २४) हे दोघेही एकाच घरात राहत होते. दोघेही रोजमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. बुधवारी सायंकाळी जगदीश हा दारू पिऊन घरी आला. यावेळी त्याने लहान भाऊ प्रमोद याला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वारंवार होणारी शिवीगाळ असह्य झाल्याने संतापाच्या भरात प्रमोदने कुऱ्हाड उचलली आणि स्वतःच्या घराच्या अंगणातच जगदीशवर वार केले.या हल्ल्यात गंभीर ☞(पान २ वर)

घरात ठेवलेला ६० क्विंटल कापूस जळून खाक

शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान



अमरावती/प्रतिनिधीः- बडनेरा पोलीस ठाणे अंतर्गत भातकुली तालुक्यातील हातूर्णा पुनर्वसन पांढरी येथे एका अल्पभूधारक शेतकऱ्याच्या घरात ठेवलेल्या ८० क्विंटल कापसाच्या गंजीला आग लागली. यामध्ये ६० क्विंटल कापूस जळून खाक झाला आहे. या आगीत शेतकरी महादेव रताळे यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. माहिती नुसार शेतकरी महादेवराव रताळे ☞(पान २ वर)

बंडू घोम यांचे उपोषणाला आमदार बच्चू कडू यांनी दिली भेट

तत्काळ कारवाई करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश



अचलपूर/प्रतिनिधीः- अमरावती रोडवरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शॉपिंग कॉम्प्लेक्स समोरील अतिक्रमण हटविण्यासह मिल स्टॉप परिसरातील रस्त्याच्या मध्यभागी असलेले जीवघेणे दुभाजक काढण्याच्या मागणीसाठी शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख बंडू घोम यांनी गेल्या बुधवारपासून (दि. २५) बाजार समितीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. काल दुसऱ्या दिवशी विधानपरिषद आमदार बच्चू कडू यांनी उपोषण स्थळी भेट दिली आणि सर्व मागण्या जाणून संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले.यानंतर ☞(पान २ वर)

१६५ लाख खर्चून बांधलेले विश्रामगृह उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

तीन वर्षांपासून सुसज्ज इमारत धूळखात पडून



अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- अंजनगाव सुर्जी येथील शासकीय विश्रामगृहाच्या विस्तारीकरणासाठी मंजूर झालेल्या १६५.१७ लक्ष रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेली नवीन सुसज्ज इमारत पूर्ण होऊन तीन वर्षे उलटली आहेत. मात्र, अद्याप या इमारतीचे उद्घाटन न झाल्याने कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली वास्तू वापराविना पडून आहे.

मंत्र्यांना उद्घाटनासाठी वेळ मिळत नसल्याने हा लोकार्पण सोहळा रखडल्याची चर्चा शहरात रंगली असून, नागरिक आणि अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.अंजनगाव सुर्जी येथे सध्या इंग्रजकालीन जुन्या इमारतीमध्ये शासकीय विश्रामगृह कार्यरत आहे. या जुन्या वास्तूमध्ये खोल्यांची संख्या अत्यंत कमी ☞(पान २ वर)

अनिल शाह यांचे निधन



अचलपूर/प्रतिनिधीः- परतवाडा शहरातील व्यवसायीक व तिलकचंद कुटुंबातील अनिल नवीनभाई मंडेरा (शाह) यांचे गुरुवारी, २६ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने मंडेरा (शाह) परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी सकाळी ११.३० वाजता बाजार येथील सदर निवासस्थानातून निघाली. ते तिलकचंद जगजीवनदास मंडेरा (शाह) परिवारातील सदस्य होते. त्यांच्या निधनाबद्दल परिसरात शोक व्यक्त करण्यात येत आहे.

वीणाताई शिरभाते यांचे निधन



अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती शहरातील खरकाडीपुरा येथील रहिवाशी वीणाताई प्रकाशराव शिरभाते यांचे गुरुवार दिनांक २६ नोव्हेंबर रोजी सकाळी अल्प आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, मुलगा, जावई, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्थानिक हिंदू स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.याप्रसंगी परिसरातील गणमान्य नागरिक व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजीपाला अडते प्रकाशराव शिरभाते यांच्या त्या पत्नी होत.

ॲड. गणेश गंधे यांचे निधन



अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती येथील युवा, मनमिळाऊ आणि शांत स्वभावाचे विधिज्ञ ॲड. गणेश गंधे यांचे बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथे उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. ते अवघे ३५ वर्षांचे होते. चार महिन्यांपूर्वी त्यांच्यावर किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया झाली होती.

ॲड. गणेश गंधे हे आपल्या शांत, मनमिळाऊ आणि उमद्या स्वभावामुळे सर्वपरिचित होते. वकिली व्यवसायात त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. ते अमरावती वकील संघाचे तसेच अंबापेठ क्रीडा मंडळाचे सक्रिय सदस्य होते. त्यांच्या निधनाने विधी क्षेत्रासह क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

अल्पवयातच त्यांची जीवनयात्रा संपल्याने मित्रपरिवार, सहकारी व परिचितांमधून तीव्र दुःख व्यक्त करण्यात येत आहे. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंबापेठ येथील त्यांच्या राहत्या घरून निघणार आहे.

लग्नाच्या बँड-बेंजोला परवानगीचा नियम मग अवैध धंद्यांवर कारवाईचा बडगा कधी?

चांदूर रेल्वे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नागरिकांतून प्रश्नचिन्ह



चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः- चांदूर रेल्वे शहरातील पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरून सध्या नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे. लग्नसमारंभात वाजविण्यात येणाऱ्या बँड पथक आणि बेंजो वादनासाठी परवानगी घेण्याची आवश्यकता भासत असताना, शहरात सुरू असल्याचा आरोप असलेल्या अवैध दारू व्यवसाय, अवैध वाहतूक आणि अवैध सट्टा व्यवसायाकडे मात्र पोलीस प्रशासनाचे लक्ष आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

लग्नसमारंभ हा प्रत्येक कुटुंबासाठी आनंदाचा आणि महत्त्वाचा प्रसंग असतो. अशा वेळी बँड-बेंजो वादनासाठी परवानगीच्या प्रक्रियेमुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची चर्चा आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नियमांची अंमलबजावणी होणे आवश्यकच आहे; मात्र ही☞(पान २ वर)